# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ जानेवारी, २०१६ ◆
◆ किंमत १५ रुपये ◆

अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक

२०१६

नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!




आमची नवीन पुस्तके

# वाचलेच पाहिजे असे काही

## अ नोट फ्रॉम इचियो

पैशाअभावी हलाखीचे जीणे जगणाऱ्या इचियोचा चेहरा जपानच्या ५००० येनच्या नोटेवर कसा झळकला, याची सत्यकथा.




मूळ लेखिका
**रेई किमुरा**
अनुवाद
**सुनीता कट्टी**

किंमत : ₹ २२०/-

## कालाय नमः

काळ आपल्या शरीरावर, मनावर, संस्कृतीवर प्रभाव टाकतो. काळाला वेग आलाय, काळ कसा बदललाय, आपल्याला किती प्रमाणात वेळेची व उत्तेजनाची गरज आहे याचा विचार करायला लावणारी एक चिंतनपर संकल्पना...




मूळ लेखिका
**इव्हा हॉफमन**
अनुवाद
**प्रा. पुरुषोत्तम देशमुख**

किंमत : ₹ १६०/-

# मेहता मराठी ग्रंथजगत

। जानेवारी २०१६ । वर्ष सोळावे । अंक पहिला ।

**मांडणी-अक्षरजुळणी**

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर,
पुणे - ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४
२४४७५४६२
Extension
(ग्रंथजगत विभाग) - २२४/२२५

E-mail : info@mehtapublishinghouse.com

संपादक
**सुनील मेहता**

कार्यकारी संपादक
**शंकर सारडा**

अंकाची किंमत **१५ रु.**

वर्गणी
**मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.**

प्रसिद्धी
**दरमहा ११ तारखेस**

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| संपादकीय | ४ |
| साहित्यवार्ता | ८ |
| पुरस्कार | ३६ |
| पुस्तक परिचय | |
| पारखा | ५० |
| डेज् ऑफ गोल्ड ॲन्ड सीपिया | ६८ |
| स्मरण | ८२ |
| श्रद्धांजली | ८६ |
| चिंतन | ८८ |
| बालनगरी | ९६ |

**डिजिटल अंकाची वर्गणी : तीन वर्षांची ३००रु., पाच वर्षांची ४००रु.**

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.




## ई-बुक्सचा प्रभाव वाढत आहे!

ई-बुक्सची मागणी २०१५मध्ये वाढल्याचे आकडेवारीवरून लक्षात येते. ही स्वागतार्ह बाब म्हणावी लागेल. गेल्या दशकात जागतिक ग्रंथ व्यवहारात मोठ्या प्रमाणावर उलथापालथ चालू आहे. पुस्तकाच्या पारंपरिक जुळणीच्या आणि मुद्रणाच्या केंद्रस्थानी असलेल्या अक्षरमुद्रणाच्या जागी इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल तंत्रज्ञान स्थानापन्न झाल्यावर या क्षेत्रात आमूलाग्र क्रांती घडून आली. त्यातच ई-बुक आणि किंडलसारखे वाचनयंत्र (ई-रीडर) या कल्पनेची भर पडली आणि संगणक, टॅब्लेट, आयपॅड, मोबाईल, स्मार्टफोन यांसारख्या साधनावर हवे ते पुस्तक डाऊनलोड करून घेऊन घरी वा प्रवासात ते वाचण्याची अल्पखर्ची सुविधा व्यावहारिक दृष्ट्या आटोक्यात आल्याने, ई-बुकचा पर्याय लोकप्रिय ठरला. आरंभीचे तांत्रिक अडथळे दूर करीत ॲमेझॉनने किंडल सुटसुटीत बनवण्यात यश मिळवले. इंग्रजीप्रमाणे इतर कोणत्याही भाषेत ई-बुक्स आणता येतील, कागदावर छापलेल्या पुस्तकाप्रमाणे ती वाचता येतील, अक्षराची लांबी-रुंदी चुटकीसरशी बदलता येईल, ओळीची लांबी कमी-जास्त करता येईल, एकाच वेळी शेकडो पुस्तके त्यात साठवून ठेवता येतील....ऐकावे ते नवलच! अद्‌भुत! आणि हे सर्व स्वस्त- कोणालाही परवडेल इतके स्वस्त!

त्यामुळे आताआतापर्यंत ई-बुक्सकडे लक्ष न देणारे प्रकाशक, मुद्रक, विक्रेते, वाचक- सर्व जण या नव्या तंत्राकडे आवर्जून, आदराने बघू लागले. गेल्या सात-आठ वर्षांत ॲमेझॉनने ई-बुक्स वापरताना

येणाऱ्या अनेकानेक अडचणी दूर करून ती वाचण्यासाठी खास डेडिकेटेड रीडरची गरज नाही, येथवर मजल मारली. छापील पुस्तकाच्या किमतीपेक्षा ई-बुक कमी किमतीत विकत घेता येईल किंवा वाचता येईल, अशी व्यवस्था केली. अमेरिकेत कुठलेही पुस्तक वीस डॉलरच्या दरम्यान विकले जाते; तेच दोन ते दहा डॉलरमध्ये ई-बुकच्या रूपात उपलब्ध होऊ शकते. छापील पुस्तकाच्या किमती कमी-जास्त झाल्या तरी ई-बुकच्या किमती बदलणार नाहीत यासाठी मुख्य प्रकाशन संस्थांशी चर्चा केली गेली. छापील पुस्तक घेताना एक वस्तू आपल्या हातात येते; ई-बुक घेताना फक्त त्याचा मजकूर वाचण्याचा हक्क प्राप्त होतो. त्यामुळे वाचक छापील पुस्तकाला प्राधान्य देतील असे काही जणांना वाटत असे. परंतु छापील पुस्तकाला जशी जागा लागते, तशी ई-बुक्सना लागत नाही. त्यामुळे किंडल ई-बुक रीडरमध्ये हजार पुस्तकेही राहू शकतात आणि ती हवी तेव्हा वाचता येतात. त्यामुळे जागेची अडचण असत नाही. ई-बुक्स छापील पुस्तकांच्या तुलनेत कमी किमतीत मिळायला हवीत आणि तशी ती मिळाली तरच वाचकांचा प्रतिसाद मिळेल, हे स्पष्ट आहे. त्यामुळे ॲमेझॉन आपल्या पुस्तकांची आणि किंडल वाचनयंत्राची किंमत कमी करत आहे.

पूर्वी छापील पुस्तके हार्डबाऊंड (पुठ्ठाबांधणी) असत. त्यामुळे त्याच्या किमती जास्त असत. त्यावर तोडगा म्हणून पेपरबॅकच्या स्वरूपात ती कमी किमतीत वाचकांना मिळू शकतील, अशी यंत्रणा निर्माण करण्यात आली. ई-बुक्स म्हणजे आधुनिक पेपरबॅक होत. ई-बुक्सची पायरसी होण्याची शक्यताही त्यामुळे कमी असते. भारतातही आता प्रादेशिक भाषांमधील पुस्तके कमी किमतीत उपलब्ध करून देण्यात येत आहेत. दिल्लीतील एका प्रकाशकाने हिंदीतून इंग्लिश शिकण्यासाठी अग्रगण्य असलेले स्पोकन इंग्लिश डायजेस्ट हे ई-बुकच्या स्वरूपात २५ रु.ला उपलब्ध केले. त्याच्या एका आठवड्यात एक लाख प्रती डाऊनलोड केल्या गेल्या. डेली हंट या संस्थेमार्फत हे डाउनलोडिंग होत असल्याने ७०% डिस्ट्रिब्यूटर म्हणून मिळतात.

प्रतींची संख्या मोठी असल्याने प्रकाशकालाही चांगला फायदा होतो.

टॅब्लेट आल्यानंतर ई-बुक्सचा खप एकदम उसळी घेईल, अशी स्वप्ने पाहणाऱ्या भारतीय प्रकाशकांची मात्र काहीशी निराशा झाली. कारण किंडलची अधिकृतपणे विक्री ॲमेझॉनने भारतात नुकतीच सुरू केली आहे. त्यामुळे तीन-चार हजार रुपयांपासून किंडलच्या वेगवेगळ्या आवृत्त्या आता मिळू शकतात. ई-बुक्सची विक्री अजून मोठ्या प्रमाणावर होण्यास काही वेळ जावा लागेल. प्रादेशिक भाषांत ई-बुक्स फार कमी उपलब्ध आहेत. तीही अधिक उपलब्ध झाली म्हणजे हा ग्रंथ व्यवहार अधिक व्यापक होईल. 'डेली हंट' नावाची कंपनी भारतीय भाषांमधील ई-बुक्सची वितरक म्हणून आज आघाडीवर आहे. तिच्या संग्रहात ७०हजार पुस्तके असून, एक हजार शहरांमध्ये शाखा उघडण्याची तिची तयारी चालू आहे. या संस्थेतर्फे इंग्रजी पुस्तकेही मोठ्या प्रमाणावर विकली जातात. वाचकांना जी पुस्तके हवी आहेत, ती जसजशी ई-बुक्सच्या रूपात मिळू लागतील, तसतसा ई-बुक्सचा प्रसार वाढत जाईल. 'फेसबुक के चॅम्पियन बनिए!' आणि 'व्हॉटस् अप के चॅम्पियन बनिए!' ही त्यांची पुस्तके ई-बुक्सच्या माध्यमातून दरमहा पाच हजार ग्राहक खरेदी करतात. ही संख्या लाखाच्या घरात जायला हवी, अशी त्यांची अपेक्षा आहे. 'डेली हंट'चा वाचक वर्ग १८ ते ३०वयोगटातील मध्यमवर्गीय असून, त्यात स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे. अहमदाबादची सिग्नेट इन्फोटेक ही कंपनी गुजराथी ई-बुक्स ई-शब्दाच्या बॅनरखाली वितरित करत आहे. दरमहा २५हजार ग्राहक त्याचा फायदा घेतात. ई शब्दातर्फे गुजराथीप्रमाणेच इतर भाषांतील पुस्तकेही उपलब्ध करून दिली जातात. मल्याळी, कानडी, तेलगू, मराठी या भाषांतील ई-बुक्सनाही चांगली मागणी आहे.

भारतीय प्रकाशन क्षेत्रात पुढच्या काही वर्षांत ई-बुक्सच्या उलाढालीचे प्रमाण वाढत जाईल, अशी अपेक्षा करणे गैर ठरणार नाही.



## वाचकांसाठी सुवर्णसंधी!

# WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

## बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे. सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे
पहिला मजला, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, खानापूर रोड, टिळकवाडी, बेळगाव-५९०००६. टेलिफोन क्र. (०८३१)-४२००६७६
शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पाअर, ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६
शॉप नं. - जी/१५, प्रोझन मॉल, चिखल ठाणा, एमआयडीसी, औरंगाबाद - ४३१००६.

अधिक माहितीसाठी www.wordpowerbookshop@gmail.com येथे संपर्क साधा.

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse




## ग्रंथ उद्योगात भारत जगात सहावा

भारतात निरक्षरतेचे प्रमाण सर्वाधिक आहे किंवा हल्ली सोशल मीडियामुळे पुस्तक वाचनाचे प्रमाण कमी आहे असे म्हटले जाते. मात्र, हा सूर चुकीचा असल्याचे नेल्सन इंडिया मार्केटने केलेल्या पाहणीत दिसून आले. भारतातील पुस्तक बाजाराची उलाढाल २६१ अब्ज रुपये आहे, ती २०२० पर्यंत ७३९ अब्ज रुपयांपर्यंत पोचेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

जागतिक पातळीवरील ग्रंथ बाजारपेठेत भारताचा सहावा क्रमांक आहे. आश्चर्याची बाब म्हणजे इंग्रजी पुस्तकांबाबत भारत दुसऱ्या स्थानावर आहे.

'असोसिएशन ऑफ पब्लिशर्स इन इंडिया' आणि 'द फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स' या दोन संघटनांनी 'नेल्सन इंडिया बुक मार्केट रिपोर्ट २०१५ : अंडरस्टँडिंग द इंडिया बुक मार्केट' हा अहवाल सादर केला आहे. ग्रंथ बाजारातील संधी व आव्हाने, तसेच भवितव्य याविषयीची पाहणी करण्यात आली. दोन हजार वाचकांचा सर्व्हे करण्यात आला. त्यात १८ वर्षांपुढील शहरी वाचकांचा समावेश होता. ग्रंथ उद्योगात सरकारची प्रत्यक्ष गुंतवणूक नाही, तरी पुढील पाच वर्षांत ग्रंथ उद्योगाचा वार्षिक विकासदर १९.३ टक्के असेल. पुस्तक प्रकाशन व विक्रीची विस्कळित व्यवस्था, संथ वितरण व्यवस्था आणि रोख रकमेची कमतरता, पायरसी ही आव्हाने प्रकाशकांपुढे आहेत, असे अहवालात म्हटले आहे.

भारतात इंग्रजी भाषेतील पुस्तके प्रकाशित करणारे नऊ हजार प्रकाशक आहेत. भारताचा जगात दुसरा क्रमांक असल्याची माहितीही अहवालात दिली आहे. सध्याच्या ई जमान्यात देशातील ७० टक्के प्रकाशकांनी त्यांची पुस्तके ऑनलाइन उपलब्ध केली आहेत. ऑनलाईन उद्योगात पुस्तकविक्रीचा वाटा १५ टक्के आहे. इलेक्ट्रॉनिक्स वस्तू व कपड्यांच्या खरेदी-विक्रीनंतर

पुस्तकांचाच क्रमांक लागतो, असेही पाहणीत दिसून आले आहे.

या अहवालातून महत्त्वाचे निष्कर्ष हाती आले आहेत. त्यांचा उपयोग प्रकाशकांना होणार आहे, शिवाय देश १०० टक्के साक्षर करण्यासाठी सरकार व शिक्षण तज्ज्ञांनाही यामुळे दिशा मिळेल.

## गायतोंडे यांच्या चित्राची विक्री २९ कोटींना !

सुप्रसिद्ध चित्रकार वासुदेव गायतोंडे यांच्या १९९५ सालच्या अमूर्त चित्राने आतापर्यंतची सर्व रेकॉर्ड्स तोडत कलाजगतामध्ये नवा विक्रम घडवला आहे. ख्रिस्तीजच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या लिलावात वासुदेव गायतोंडे यांचे चित्र तब्बल २९ कोटी ३० लाख रुपयांना विकले गेले. हे चित्र एका आंतरराष्ट्रीय संग्राहकाने विकत घेतले आहे.

एकीकडे गायतोंडे यांच्यासारख्या कलाकारांच्या चित्राला कोट्यवधींची किंमत येत असताना दुसरीकडे, चित्रकार मात्र दुर्लक्षितच राहतात, अशी खंत चित्रकारांकडून व्यक्त करण्यात येत आहे. या चित्रांचा फायदा चित्रकाराला, त्यांच्या कुटुंबीयांना किंवा संबंधित चित्रकारांना घडवणाऱ्या कला संस्थांनाही होत नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

ज्येष्ठ चित्रकार वासुदेव कामत यांनी गायतोंडे यांच्या चित्राला लिलावात मिळालेली किंमत हा बाजारपेठेचा भाग असून, केवळ कोट्यवधी रुपयाची बोली लागल्यानंतर त्या चित्रांना महत्त्व का प्राप्त होते, असा प्रश्न उपस्थित केला आहे. चित्राला कोट्यवधींची किंमत मिळते; पण यातील वाटा त्या चित्रकाराच्या कुटुंबीयांना मात्र मिळत नाही, ही गोष्ट खरोखरच कला क्षेत्रासाठी अभिमानास्पद नाही.

## साहित्य अकादमीतर्फे दुसरं 'मेट्रो बुकशॉप' सुरू

साहित्य अकादमी आणि डीएमआरसी यांच्या संयुक्त पुढाकाराने, साहित्य अकादमीने नुकतेच दुसरे 'मेट्रो बुकशॉप' सुरू केले. विश्वविद्यालयाच्या मेट्रो स्टेशन येथे साहित्य अकादमीचे अध्यक्ष विश्वनाथ प्रसाद तिवारी यांच्या हस्ते या बुकशॉपचे उद्‌घाटन करण्यात आले.

## डागरनॉर!

रँडम हाऊस इंडियाचे मुख्य संपादक चिघ्मी सरकार यांनी एक नवीन

प्रकाशन संस्था सुरू केली आहे- ‘डागरनॉर’! त्यांना दुर्गा रघुनाथ यांची साथ लाभली आहे.

सरकार हे इं चे तरुण ग्लोबल लीडर म्हणून परिचित आहेत. देशातल्या अनेक लेखकांबरोबर त्यांनी काम केले आहे.

दुर्गा रघुनाथांनी पुस्तक प्रकाशन व्यवसाय सुरू केला. भारतातल्या ‘मिंट’साठी डिजिटल ऑपरेशन प्रमुख म्हणून काम केले. त्यानंतर ‘डिजिटल न्यूजरूम’ ‘फर्स्ट पोस्ट’ तसेच ‘नेटवर्क १८’ डिजिटल केंद्र सुरू केले.

‘डागरनॉट’ ही कंपनी लेखकांना डिजिटल, तसेच प्रत्यक्ष सहभागासाठी व्यासपीठ मिळवून देईल. मोबाईलसाठीही पुस्तकनिर्मिती करून पुस्तक वितरण आणि अर्थकारण याचाही विचार करील. एप्रिल २०१६ पासून ‘डागरनॉट’ वर्षाला पन्नास पुस्तकं प्रकाशित करेल.

## दिल्ली बुक फेअरमध्ये पारितोषिक

सर्वोत्तम पुस्तकासाठी पहिले प्राईज या वेळी प्रसिद्ध चित्रपटनिर्माते राकेश रोशन यांची कन्या सुनयना रोशन यांनी लिहिलेल्या ‘To Dad with Love' या चरित्राला मिळाले आहे. ‘ओम बुक्स इंटरनॅशनल’ने तिचे हे पुस्तक प्रकाशित केले आहे.

## बारा वर्षांच्या लेखिकेचे पुस्तक

‘टीचर्स डे’च्या अनुषंगाने सपना बुक हाऊसने कोईमतूर इथल्या जे.मनस्विनी या बारा वर्षांच्या बाललेखिकेचे ‘जाका इन काकून’ हे पुस्तक प्रकाशित केले. बीव्हीएम ग्लोबल स्कूलची ही आठव्या इयत्तेतली विद्यार्थिनी असून, भविष्यातल्या शंभर वर्षांत हे जग कसे असेल याविषयी तिने हे पुस्तक लिहिलेय.

अध्यक्ष म्हणून आर्टस् कॉलेजचे प्राध्यापक डॉ. मणिवन्नन म्हणाले, ‘‘सध्याच्या तंत्रज्ञानाच्या जगात लेखन, वाचन थोडेसे मागे पडलेले आहे. केवळ पस्तीस पानांमध्ये या मुलीनं केवढीतरी झेप घेतली. या प्रसंगी हजर असलेले वर्ल्ड स्टोरी टेलिंगचे संस्थापक आणि डायरेक्टर डॉ. एरीक मिलर म्हणाले, ‘‘मनस्विनीचं हे पुस्तक म्हणजे वैज्ञानिक गोष्ट असून ‘टाईम मशिन’चा त्यात समावेश आहे. शिवाय सध्याच्या शिक्षणपद्धतीबद्दलचा दृष्टिकोनही आहे.

मनस्विनीने सांगितले, ''वयाच्या सातव्या वर्षापासून मी लिहीत आहे. त्या त्या वेळी मी माझे दृष्टिकोन मांडत गेले; परंतु आता मात्र फक्त पुस्तकं लिहिणं हा माझा हेतू नाही, तर लोकांना लिहायला प्रवृत्त करणं, हे मला जास्त आवडेल.''

## कॅलिग्राफीची जादू

सुलेखनाच्या दुनियेत मग्न झालेली युवा पिढी... चित्रांच्या माध्यमातून उलगडलेले कॅलिग्राफीचे अनोखे जग... विविध भाषांमधील सुलेखनाशी लहानग्यांची झालेली ओळख अन् जगभरातल्या सुलेखनकारांच्या कॅलिग्राफीच्या दुनियेची तरुणाईने केलेली सफर, असे कॅलिग्राफीने भारलेले वातावरण 'कॅलिफेस्ट २०१५'मध्ये पाहायला मिळाले.

'स्वयंभू फाउंडेशन' आणि 'अच्युत पालव स्कूल ऑफ कॅलिग्राफी' या संस्थांतर्फे आयोजित 'कॅलिफेस्ट'ला तरुण पिढीबरोबरच ज्येष्ठांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या फेस्टचे उद्‌घाटन गृहमंत्री डॉ. रणजित पाटील यांच्या हस्ते झाले. फाउंडेशनचे अध्यक्ष सिद्धार्थ शिरोळे, सुलेखनकार अच्युत पालव, कलाकार प्रा. मुकुंद गोखले, महापालिकेचे आयुक्त कुणाल कुमार, भाजपचे गटनेते गणेश बिडकर या वेळी उपस्थित होते. सुलेखनकार मनोहर देसाई यांनी तरुणाईला 'अक्षर कुटुंब' या कॅलिग्राफी प्रकाराची माहिती दिली. 'कॅलिफेस्ट'चे हे तिसरे वर्ष असून, या वर्षी देशभरातील १७ अधिकृत भाषा या उत्सवाच्या माध्यमातून सर्वसामान्यांपर्यंत आणण्याचा प्रयत्न होत आहे. त्यामध्ये रशियन, जर्मन, उर्दू, पर्शियन, जपानी, तिबेटियन या परदेशी भाषांबरोबरच देवनागरी, गुजराथी, गुरुमुखी, बंगाली, मल्याळम, तमीळ, तेलुगू, कन्नड ओरिया, आसामी या भारतीय भाषांचाही समावेश आहे. चित्रे, भित्तिपत्रके, कार्यशाळा, चर्चासत्र अशा कार्यक्रमांतून विविध सुलेखनकारांनी कॅलिग्राफीचे महत्त्व व त्यातील वैविध्यपूर्ण विश्व लोकांसमोर उलगडले आहे. फाउंडेशनचे अध्यक्ष सिद्धार्थ शिरोळे यांनी या फेस्टचे संयोजन केले आहे. आतापर्यंत सुलेखनकार व कलाकार साउंड व लाइटवर लिप्यांचा आगळावेगळा म्युझिक कॉन्सर्ट, जपानच्या ज्योती इरी यांनी घेतलेली कार्यशाळा, सॅल्वा रसूल (अरेबिक, उर्दू  लिपीचे सादरीकरण), अशोक परब (लिपी- अ मार्क ऑफ फायनेस), अस्लम किरातपुरी (उर्दू लिपी), हिरेन मित्रा (बंगाली लिपी), प्रा. संतोष क्षीरसागर (देवनागरी), यावर

मार्गदर्शन केले. लिपी अभ्यासक प्रा. सिद्धार्थ वाकणकर, प्रा. मनोहर देसाई, रवी पांडे, मनीष सोनी, कल्पेश गोसावी, मनोज गोपीनाथ आणि अरविंद मुखेडकर आदींनी माहिती दिली. पोथी, ताडपत्री, भूर्जपत्र, मेटल प्लेट या जुन्या लिखित स्वरूपातील लिप्यांचे प्रदर्शन, हेही महोत्सवाचे एक वैशिष्ट्य होते.

## अखेरच्या चित्रपटात अमरापूरकर जगले बालपण

हिंदी व मराठी चित्रपटसृष्टीवर सदाशिव अमरापूरकर यांनी आपल्या अभिनयाचा वेगळा ठसा उमटवला. 'धनगरवाडा' चित्रपटातील त्यांनी साकारलेली 'झिमू' ही व्यक्तिरेखा शेवटची ठरली आहे. प्रकृती साथ देत नसतानाही अमरापूरकर यांनी हे चित्रीकरण पूर्ण केले. 'झिमू' हाच या चित्रपटाचा खरा नायक आहे. शेतकरी कुटुंबातील अमरापूरकर लहानपणी घरच्या शेळ्यांना चरायला रानात घेऊन जात. त्यामुळे 'झिमू' साकारताना बालपणीच्या आठवणी आठवत होते. दिवसाला २० गोळ्या खाऊन ते कॅमेऱ्यासमोर नव्या दमाने उभे राहत. मग त्यांच्यात 'झिमू' संचारत असे, असे दिग्दर्शक व छायालेखक समीर आठल्ये यांनी सांगितले. विजयकुमार दळवी यांच्या 'धनगरवाडा' कादंबरीवर तो आधारित आहे.

## इफ्फी चित्रपट महोत्सव

ॲमेझॉनच्या जंगलातला कारामाटाके, आइसलँडमधला गुम्मी, ग्रीसमधली डिडो, स्वीडनमधली स्टेला, अमेरिकेतला जेम्स व्हाइट..... चहूबाजूंनी 'माणसे' भेटत राहतात.

आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात फक्त तीन तासांच्या चित्रपटांपुरते त्यांचे आयुष्य. हे आयुष्य ही सगळी माणसे पडद्याआड जगतात; पण तो पडदा भेदून प्रेक्षकांच्याही काळजाला भिडतात.

आयनॉक्स आणि गोमंतक कला अकादमीच्या आवारात चित्ररसिकांची पडद्याआडच्या, तसेच सगळ्या पात्रांचीही एक दुनिया तयार झाली आहे. राग, लोभ, आनंद, दुःख अशा कितीतरी भावना, उत्कटपणे जगणाऱ्या 'माणसां'ची दुनिया. दोन प्रतलांवरच्या या दुनिया दोन-तीन तासांच्या चित्रपटापुरत्या एकत्र येतात आणि पडद्यासमोरच्या माणसांना विलक्षण अनुभव देऊन जातात.

नवं कोरं

# मॅस्वी कान्हेरे

*एका कल्पक उद्योजकाच्या*
*१९४५-१९७८ या ३३ वर्षांच्या*
*जिद्दी वाटचालीची कहाणी*

लेखक
आनंद कान्हेरे

किंमत - १८०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.




१९६२च्या युद्धानंतर मॅस्वीने सेनादलांसाठी साधनसामग्री उतरवण्या-चढवण्यासाठी मुद्दाम लोडर बनवला, त्याप्रसंगी सुब्बुने मला मिठी मारली व रडू लागला; ते आनंदाश्रू होते.
मी त्याला इतके काय झाले? म्हणून विचारल्यावर तो म्हणाला, 'बॉर्डरवर सामान नाही, दारूगोळा नाही; रसद नाही म्हणून मृत्युमुखी पडलेले अनेक शहीद जवान पाहिलेत. आता तसे होणार नाही.'

'सोलनेस' चित्रपटातल्या आर्किटेक्टला भूतकाळाने पछाडले आहे, तर 'रॅम्स' चित्रपटातल्या गुम्मीची मेंढ्यांना वाचवण्याची धडपड चालू आहे. 'सायलेंट' चित्रपटातील डिडोला स्वतःचा आवाज परत मिळवायचा आहे, तर जेम्स व्हाइटला कर्करोगाच्या शेवटच्या स्टेजमध्ये असलेल्या आईबरोबरचे नाते ठीक करायचे आहे. कारामाटाकेला निसर्गाशी कसे वागायचे हे लोकांना सांगायचे आहे, तर स्टेलाला भूक मारून नृत्यात पारंगत व्हायचे आहे. प्रत्येकाचे जग वेगळे, प्रत्येकाच्या भावना वेगळ्या, प्रत्येकाची सांगायची रीत निराळी. दोन-तीन तासांच्या चौकटीत ही सगळी माणसे आपल्या कहाण्या उलगडत राहतात आणि प्रेक्षकांनाही झपाटून टाकतात; आयुष्याकडे नव्याने पाहायला लावतात.

'टॅक्सी' या खमंग, खुसखुशीत चित्रपटाने प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर हसू फुलवले. आपल्या छोट्या भाचीला शाळेतून आणायला निघालेल्या एका इराणी दिग्दर्शकाची ही गोष्ट. त्याच्या कारमध्ये कितीतरी जण योगायोगाने येतात आणि गमती करत राहतात. हीच माणसे हास्याचे मंद शिडकावे पसरवतात. मॉरिशसमध्ये कितीतरी वर्षांनंतर तयार झालेल्या 'शुगरकेन शॅडोज' या चित्रपटानेही दाद मिळवली. साखर कारखाना बंद झाल्यावर तेथील कामगारांचे आयुष्य दाखवणाऱ्या या चित्रपटाने भारताचेही प्रतिबिंब दाखवले. या चित्रपटाला प्रेक्षकांचाही भरभरून प्रतिसाद मिळाला.

## स्वामी चिन्मयानंद शताब्दी- लघुपट

जीवनातील घटनांचे केवळ निरीक्षण नव्हे, तर यंदा जगभरात स्वामी चिन्मयानंदांची जन्मशताब्दी साजरी होत आहे. या निमित्ताने 'चिन्मय क्रिएशन्स'ने त्यांच्या जीवनावर आधारित 'ऑन अ क्वेस्ट' या चित्रपटाची निर्मिती केली आहे. सूक्ष्म परीक्षण करून कोणताही पूर्वग्रह न ठेवता एका माणसाने ईश्वरीय अस्तित्वाचा, पर्यायाने स्वतःचा शोध कसा घेतला, याची कथा यातून मांडण्यात आली आहे.

ही गोष्ट बाळकृष्ण मेनन नावाच्या एका असामान्य माणसाची आहे. त्याचा प्रवास एका श्रीमंत व स्वच्छंद आयुष्य जगणाऱ्या; पण अतिशय बुद्धिमान व नास्तिक असलेल्या युवकापासून सुरू होतो. पुढे स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारक, बातमीदार आणि अंतिम टप्प्यात सत्याचा शोध घेणाऱ्या स्वामी चिन्मयानंदांपर्यंत येऊन ठेपतो.

## ‘शरद पवार : अ मास लीडर’ पुस्तकाचे प्रकाशन

‘पवार : अ मास लीडर’ या इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशन डॉ. माशेलकर यांच्या हस्ते झाले. महापौर दत्तात्रेय धनकवडे, काँग्रेसचे नेते डॉ. पतंगराव कदम, ‘सकाळ’चे अध्यक्ष प्रतापराव पवार, विधानसभेचे माजी अध्यक्ष दिलीप वळसे-पाटील, ॲड. राम कांडगे, विजय कोलते उपस्थित होते.

डॉ. माशेलकर म्हणाले, ‘‘राजकारणात दूरदृष्टी असलेले नेते म्हणून शरद पवार यांच्याकडे पाहिले जाते; पण केवळ राजकारणच नव्हे, तर वेगवेगळ्या विषयांचा त्यांचा गाढा अभ्यास शास्त्रज्ञ या नात्याने मी वेळोवेळी अनुभवला आहे. आम्हाला विज्ञान तंत्रज्ञान विषयातील जितकी माहिती आहे, त्यापुढची पवार यांना आहे. त्यांच्या या अभ्यासाचा आजवर अनेकांना फायदा झाला आहे. म्हणून तर वेगवेगळ्या स्तरांवर पवार लोकप्रिय आहेत.’’

डॉ. कदम म्हणाले, ‘यशवंतरावांकडून प्रेरणा घेऊन पवार राजकारणात आले. त्यांच्यात जबरदस्त आत्मविश्वास आहे. त्यामुळे ते राज्याच्याच नव्हे, तर देशासमोरील विविध प्रश्नांना सामोरे गेले. संघर्षातून सुरू झालेला त्यांचा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी आहे.’’ कौटुंबिक आठवणींना उजाळा देऊन प्रतापराव पवार म्हणाले, ‘शरद पवार : अ मास लीडर’ हे पुस्तक नव्या पिढीसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. अलीकडच्या घटना यात सामावून घेऊन हे पुस्तक अद्ययावत व्हायला हवे.’’

## ‘मराठी मॅन्युस्क्रिप्ट सेंटर’ तर्फे डिजिटायझेशन

तुकोबांची गाथा इंद्रायणीच्या पाण्यावर तरल्याची आणि तिला नवसंजीवनी मिळाल्याची कथा सांगितली जाते. आता डिजिटायझेशन आणि मायक्रो फिल्मिंगमुळे १ हजार ३०० हस्तलिखितांनाही नवी झळाळी मिळाली आहे.

हस्तलिखितांचे संकलन, संगोपन आणि संस्करण करण्यासाठी २००५ मध्ये ‘मराठी मॅन्युस्क्रिप्ट सेंटर’ची पुण्यात स्थापना झाली. या सेंटरने हे काम केले. दरम्यान, ‘नामदेवाची तीर्थावळी’, ‘संत तुकाराम महाराजांचे अभंग’, ‘शकूनवंती- आणि ‘शिवस्वरोद्य’, ‘शिवलीलामृत’, ‘रामविजय’, ‘विठ्ठल सहस्त्रनामस्तो,’ अशा काही नवीन सापडलेल्या दुर्मिळ हस्तलिखितांची समग्र सूची अभ्यासक डॉ. वा. ल. मंजुळ यांनी तयार केली आहे. या नोंदीची पहिली आवृत्ती चार खंडांत छापून प्रसिद्ध करण्यात येणार आहे. यातील १ हजार ८०० नोंदींचा एक खंड पूर्वीच प्रसिद्ध झाला असून, दोन हजार नोंदींचे

आणखी तीन खंड प्रसिद्ध होणार आहेत. यातील दुसरा खंड मार्च २०१६ पर्यंत प्रसिद्ध होईल.

हस्तलिखितांचे अभ्यासक डॉ. मंजूळ यांनी महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा आणि मध्य प्रदेशातून संस्कृत भाषेतील १२ हजार, तर १ हजार १०० मराठी हस्तलिखिते गोळा केली. त्यातील मराठी हस्तलिखिते केंद्राच्या माध्यमातून जपली आहेत, तर संस्कृत हस्तलिखिते भांडारकर संस्थेकडे सुपूर्त केली आहेत.

१५८५ मधील 'नामदेवाची तीर्थावळी' हे हस्तलिखित आहे. तसेच तुकाराम महाराजांचे लेखक संत संताजी जनागडे (सुदुंबरे, मावळ) यांचा मुलगा बाळाजी जनागडे याची १६५३ मधील वही आहे. संताजी हे तुकाराम महाराजांचे लेखक होते. या वहीत त्यांनी महाराजांचे अभंग लिहिले असून, त्यांच्या निधनानंतर बाळाजी यांनी वहीत संत नामदेव यांचे काही अभंग लिहिले आहेत. 'शकूनवंती' आणि 'शिवस्वरोद्य' ही हस्तलिखिते १६९० मधील असून, यात श्रद्धा-अंधश्रद्धा आणि शुभ-अशुभ आदी विषयांचे नियम स्पष्ट केले आहेत. 'सहदेव भाडळी' हे ३०० वर्षांपूर्वीचे हस्तलिखित असून, ते शेतकऱ्यांना हवामानासंबंधी मार्गदर्शन करते.

## ज्येष्ठांचे साहित्य संमेलन

''ज्येष्ठ नागरिकांनी लेखन व विविध कलांमधून व्यक्त होण्याचा प्रयत्न करावा, त्यामुळे त्यांच्या अनुभवाचा समाजाला लाभ होईल आणि त्यांना साहित्यनिर्मितीचा आनंद मिळेल. दलित व स्त्री आत्मकथनांप्रमाणेच ज्येष्ठांचे साहित्यही थेट काळजाला हात घालेल,'' असे मत साहित्यिक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी व्यक्त केले.

मध्यवर्ती ज्येष्ठ नागरिक संघटनेतर्फे (ॲस्कॉप) औंध येथील पं. भीमसेन जोशी कला मंदिरामध्ये एक दिवसीय 'ज्येष्ठांचे साहित्य संमेलन' आयोजित केले होते. संमेलनाचे उद्‌घाटन डॉ. कोत्तापल्ले यांच्या हस्ते झाले. या वेळी माजी महापौर दत्तात्रेय गायकवाड, नगरसेविका संगीता गायकवाड, संघटनेचे अध्यक्ष डॉ. आर. टी. वझरकर, कार्याध्यक्ष मधुकर पवार, सुरेश मुळे, डॉ. प्रभाकर उलंगकर, प्राचार्य पद्माकर पुंडे आदी उपस्थित होते. ग्रंथदिंडीनंतर 'ज्येष्ठ प्रज्योत' या दिवाळी अंकाचे प्रकाशन करण्यात आले. डॉ. कोत्तापल्ले म्हणाले, ''ज्येष्ठ नागरिकांकडे आयुष्यभराच्या अनुभवांची शिदोरी असते. त्यांच्या समृद्ध जीवनातून त्यांनी काढलेल्या निष्कर्षांचा तरुण

पिढीने उपयोग करून घेतला पाहिजे. शहरांच्या तुलनेत ग्रामीण भागातील ज्येष्ठांचे प्रश्न गंभीर आहेत. ज्येष्ठ नागरिक लेखनामधून व्यक्त झाल्यास त्यांची आत्मकथने व साहित्य मराठी साहित्यामध्ये मोठी भर घालू शकेल.'' माजी महापौर दत्तात्रेय गायकवाड म्हणाले, ''साहित्यातून समाज घडत असतो, त्यामुळे ज्येष्ठांची संमेलनेही दर वर्षी झाली पाहिजेत. त्यासाठी आमच्यासारख्या व्यक्ती तुमच्या पाठीशी नक्कीच उभ्या राहतील. एकत्र कुटुंबपद्धती जाऊन सध्या विभक्त कुटुंबपद्धती अस्तित्वात आली आहे; परिणामी वृद्धाश्रमांची संख्या वाढत आहे. आर्थिक पाठबळ असणाऱ्यांनी आपल्या आई-वडिलांना वृद्धाश्रमांमध्ये पाठवू नये; निराधार असणाऱ्यांना वृद्धाश्रमांशिवाय पर्याय नाही. 'वृद्धाश्रमांची आवश्यकता आहे/नाही' या विषयावरील परिसंवादामध्ये उपस्थितांनी आपले मनोगत व्यक्त केले. संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात झालेल्या कविसंमेलनात कवी विठ्ठल वाघ, नारायण सुमंत आदींनी भाग घेतला.

## कवितासंग्रह प्रकाशित

'कविता आयुष्याला भिडली पाहिजे. कवी-कवयित्रींचे लिहिणे व जगणे हे एकच असले पाहिजे. शब्दसंपदा, सूक्ष्म निरीक्षण, लेखन, वाचनाचा व्यासंग कवी-कवयित्रींचे आयुष्य समृद्ध करतो,' असे मत कवी गझलाकार रमण रणदिवे यांनी व्यक्त केले. काव्यशिल्प संस्था परिवारातील ज्योती सरदेसाई, श्यामला तांबोळी, डॉ. नंदा हरम, विजया देव व सुनीता महाबळ या कवयित्रींच्या संग्रहांचे प्रकाशन त्यांनी केले.

## रश्दींच्या पुस्तकावर बंदी घालणे हा चुकीचा निर्णय

'आंतरराष्ट्रीय ख्यातीचे लेखक सलमान रश्दी यांच्या 'सॅटॅनिक व्हर्सेस' या कादंबरीवर बंदी घालण्याचा तत्कालीन राजीव गांधी सरकारने घेतलेला निर्णय चुकीचा होता, तसेच देशावर आणीबाणी लादणे ही आपली घोडचूक होती, अशी कबुली खुद्द इंदिरा गांधी यांनीही नंतर दिली होती,' असा गौप्यस्फोट माजी केंद्रीय गृहमंत्री आणि काँग्रेस नेते पी. चिदंबरम यांनी केला.

राजीव गांधी पंतप्रधान असताना चिदंबरम गृहराज्यमंत्री होते. याच विषयावर माध्यमांनी वीस वर्षांपूर्वी प्रतिक्रिया विचारली असती तरीदेखील ती हीच असती असेही त्यांनी नमूद केले.

खुद्द इंदिरा गांधी यांनी१९८० मध्ये याची कबुली दिली होती. पुन्हा

आपण सत्तेवर आलो तर कधीच आणीबाणी लादणार नाही, असे त्यांनी म्हटले होते. लोकांनीही त्यांच्यावर विश्वास ठेवून पुन्हा त्यांनाच निवडून दिले, असेही चिदंबरम यांनी नमूद केले.

## ज्ञानेश्वर, तुकारामांचे साहित्य अभ्यासक्रमात असायला हवे.

'संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराज यांचे अमृतमय साहित्य शालेय अभ्यासक्रमात नाही. आजची पिढी तंत्रज्ञान शिकते; पण अर्धवट शिक्षण व्यवस्थेमुळे या पिढीला हे संत, आपली संस्कृती माहीत नाही,' अशी टीका कॉम्प्युटरतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांनी केली.

विश्वशांती केंद्र व एमआयटी यांच्या वतीने युनेस्को अध्यासनांतर्गत आयोजित व्याख्यानमालेच्या समारोपप्रसंगी एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड, डॉ. मंगेश कराड, विश्वशांती संघाचे डॉ. संजय उपाध्ये, प्राचार्य डॉ. एल. के. क्षीरसागर, डॉ. मिलिंद पांडे, ललिता सबनीस वगैरे उपस्थित होते.

'आजच्या पिढीला इतिहास, संस्कृती माहीत नाही, तर ही पिढी काय शिकणार,' असा सवाल उपस्थित करून डॉ. भटकर म्हणाले, "शिक्षणात भाषा अत्यंत महत्त्वाची असून, त्याशिवाय ज्ञानाचे ग्रहण करता येणार नाही. चैतन्य असेल तिथं भाषा असतेच. मधमाश्या, मुंग्या कोणत्या भाषेत संवाद साधत असतील, हे एक कुतूहलच आहे. सत्याचे दर्शन ज्ञानेश्वरी, गीता या ग्रंथातूनच होते, त्याशिवाय ज्ञान अपूर्ण आहे."

"भारताचा एकात्मिक वारसा, भारतीय संस्कृती जगात सर्वश्रेष्ठ आहे. भारतीय अध्यात्म जागतिक शांततेसाठी आकार देईल," असे मत डॉ. सबनीस यांनी मांडले.

## आता आंबेडकरांच्या नावाने भाजपच्या यात्रा !

राज्यघटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षाच्या निमित्ताने जानेवारी-फेब्रुवारीत देशभर यात्रांचा बार उडवून देण्याचे भाजपने ठरविले आहे.

डॉ. आंबेडकरांच्या आयुष्यातील किमान पाच महत्त्वाच्या ठिकाणांपासून निघणाऱ्या या यात्रांची सांगता नवी दिल्लीत होईल आणि त्या वेळी एक आंतरराष्ट्रीय मेळावा भरवून पंतप्रधानांच्या हस्ते या यात्रापर्वाची सांगता

८वी आवृत्ती

# ढगाआडचे चांदणे

लेखक
वि. स. खांडेकर

किंमत - १२०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.




'...कथाबीजं दाही दिशांनी मनात येऊन पडतात – प्रत्यक्ष अनुभवलेल्या एखाद्या भावनेच्या छटेपासून, तो सहजगत्या कानांवर पडलेल्या एखाद्या चार-दोन ओळींच्या घटनेपर्यंत. अशा अनेक अनुभवांत कथाबीजं लपलेली असतात; पण ती सारीच फुलवण्याचं सामर्थ्य पुष्कळांच्या अंगी नसतं. मीही त्याला अपवाद नाही. झोपलेलं माणूस एकदम काही तरी टोचल्यामुळं जागं व्हावं, त्याप्रमाणं ज्या अनुभूतीनं संवेदना सचेतन होते आणि कल्पना-भावना-विचार यांच्या त्रिवेणी संगमानं न्हाऊ लागते, तीच पुढं स्वत:ला हवं तसं कथारूप धारण करू शकते.

अशा रीतीनं गेली पन्नास वर्षं मी कथापंढरीचा वारकरी राहिलो आहे. पहिल्या दहा-वीस वर्षांत मी तरुण वारकरी होतो. चालण्यात काय किंवा अभंग आळवण्यात काय, माझ्या ठिकाणी दुर्दम्य उत्साह होता. आता त्या उत्साहाची अपेक्षा करणं सृष्टिक्रमाला धरून होणार नाही. तथापि, गेल्या काही वर्षांत ज्यांचा कथारूपानं माझ्या हातून आविष्कार झाला, असे काही अनुभव या संग्रहात प्रतिबिंबित झाले आहेत....

या संग्रहातील कथांनी कुणाचं थोडंसं सात्त्विक रंजन केलं, कुणाला थोडा वाङ्मयीन आनंद दिला, एखाद्याला त्यात दिलासा सापडला, तर त्या लिहिताना मला जो आनंद झाला; तो केवळ वैयक्तिक नव्हता, या जाणिवेनं माझं लेखन सफल झालं, असं मी मानेन.'

होईल, असे नियोजन आहे.

अयोध्या रथयात्रेनंतरच भाजपला केंद्राचे तख्त आपल्या आवाक्यात असल्याचा साक्षात्कार झाला होता. गेली किमान अडीच दशके रथयात्रांसाठी प्रसिद्ध असलेल्या भारतीय जनता पक्षाचा यात्रा काढण्याचा सोस किंवा उत्साह केंद्रात स्वबळावर सत्ता आल्यावरही मावळलेला नाही. गेल्या काही काळात रथयात्रा म्हणजे लालकृष्ण अडवानी असे समीकरण बनून गेले, इतक्या यात्रा अडवानी यांनी काढल्या. या पार्श्वभूमीवर डॉ. आंबेडकरांनाच पुढे करून आणखी यात्रा काढण्याचे निमित्त भाजप साधणार आहे.

भाजपच्या पाठिंब्याने चालविल्या जाणाऱ्या मागासवर्गीय महासंघाच्या काही लोकप्रतिनिधींनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची संसदेत भेट घेतली. मोदी यांच्याशी चर्चेनंतर त्यांनी पत्रकारांच्या हाती मागासवर्गाच्या प्रलंबित मागण्यांचे एक जंबो निवेदन सोपविले. नरेंद्र मोदी यांच्याशी झालेल्या चर्चे वेळी इतर मागण्यांबरोबरच प्रस्तावित यात्रा व त्यांचा दिल्लीत समारोप यावर बराच खल झाला.

यात्रेसाठी एक संघनेता विशेष प्रयत्न करीत आहे. शिवाय या साऱ्या यात्रांच्या संचालनातील प्रमुख भूमिका एका मराठी खासदाराकडेच येणार असल्याचे बोलले जाते. बाबासाहेबांच्या जीवनातील महू, नागपूर, महाड, बडोदा व प्रसंगी येवला, पुणे, नाशिक, सिमला ठिकाणांहून या यात्रा निघण्याची शक्यता आहे.

## शरद जोशी यांचे मराठी, इंग्रजी चरित्र

शेतकऱ्यांच्या मनांमध्ये आर्थिक स्वातंत्र्याची पेरणी करणारे, त्यांच्या हक्कांसाठी कायम लढणारे, शेतकऱ्यांचा आवाज दिल्लीपर्यंत पोचविणारे शेतकरी नेते शरद जोशी आपल्यातून गेले असले तरी त्यांचे चरित्र लवकर वाचकांसमोर येणार असून, या माध्यमातून त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व समजून घेता येणार आहे.

शेतकऱ्यांचे नेते एवढीच शरद जोशी यांची ओळख नव्हती; तर ते राजकारणी, विचारवंत, लेखक अन् उत्तम वक्तेही होते. 'अंतर्नाद'चे संपादक भानू काळे यांनी त्यांच्या चरित्राचे लेखन केले आहे. शरदराव जेथे जेथे राहिले, त्या प्रत्येक ठिकाणी जाऊन काळे यांनी हे चरित्रलेखन केले असून, मराठी, इंग्रजी या दोन भाषांमधून ते प्रसिद्ध होईल.

ते म्हणाले, ''शरद जोशी यांना कोणी साहेब म्हणायचे, तर कोणी राव, काका किंवा नुसते शरद जोशी म्हणायचे. मी 'शरदराव' म्हणायचो. शेतकरी वर्गाकरिता देश ढवळून काढणारा तो नेता होता; पण बुद्धिजीवी वर्गाने सुरवातीपासूनच त्यांच्या कार्याची फारशी दखल घेतली नाही. शहरात होणाऱ्या लहान लहान सभा मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध व्हायच्या; पण ग्रामीण भागात होणाऱ्या शरदरावांच्या सभेला स्वखर्चाने लाखो शेतकरी उपस्थित राहूनही त्यांची फारशी दखल घेतली जात नसे. हे दुर्लक्ष कायम होते. पुढच्या पिढ्यांना हे व्यक्तिमत्त्व समजावे म्हणून मी चार वर्षांपूर्वीच हा चरित्र लेखनाचा प्रकल्प हाती घेतला.''

'भारत विरुद्ध इंडिया'पासून सुरू होणाऱ्या या चरित्रात जन्म, शिक्षण, नोकरी, स्वित्झर्लंडमधील वास्तव्य, चाकणला घेतलेली २७ एकर कोरडवाहू शेती, शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी उभारलेली आंदोलने... असा प्रवास वाचायला मिळेल, असेही त्यांनी सांगितले.

## कारदगा मराठी साहित्य संमेलन

कारदगा (ता. चिक्कोडी) येथील साहित्य विकास मंडळातर्फे २० वे मराठी ग्रामीण साहित्य संमेलन घेण्यात आले. पिंपरी-चिंचवड येथे होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्राचार्य श्रीपाल सबनीस (पुणे) यांच्या अध्यक्षतेखाली सहा सत्रे झाली. कोकण विभागाचे महसूल आयुक्त तानाजी सत्रे यांच्या हस्ते संमेलनाचे उद्‌घाटन झाले. ग्रामीण लेखकांनी लिहिलेल्या पुस्तकांचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक महादेव मोरे यांच्या हस्ते झाले. ग्रामीण लेखक अप्पासाहेब पवार लोकूर यांच्या 'पाऊलवाटा' काव्यसंग्रहाचे, तर साताप्पा सुतार (हुपरी) यांच्या 'बळक्याची वरात' या कथासंग्रहाचे प्रकाशनही झाले. 'नवी आशा, नवा उन्मेष, नवा आविष्कार', 'माती मातीशी बोलू काही' या विषयांवरील कविसंमेलनात कवी आबा पाटील, 'ख्वाडा' चित्रपटाचे गीतकार डॉ. विनायक पोवार, नारायण पुरी सहभागी झाले.

## साहित्य संमेलनात 'कथे'ला विशेष स्थान

मराठी कथेच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवानिमित्त पिंपरी-चिंचवड येथे होणाऱ्या ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात कथा या

साहित्य प्रकाराला विशेष स्थान देण्यात येणार आहे.

ह. ना. आपटे यांनी १८९० मध्ये पहिली स्वतंत्र कथा लिहिली होती. या घटनेला यंदा १२५ वर्षे पूर्ण झाली; मात्र, साहित्य विश्वाला त्याचा विसर पडल्याचे चित्र आहे. हे औचित्य लक्षात घेऊन कथालेखन कार्यशाळा, अभिवाचन, चर्चा-परिसंवाद आदी उपक्रम राबवण्याची अपेक्षा मान्यवर कथाकारांनी व्यक्त केली.

## अरणकल्ले यांच्या हस्ते 'डॉ. कलाम बुक बँके'चे उद्घाटन

''पुस्तकवाचन आपल्या आयुष्याला आकार देत जगाची सफर घडविते. साहित्य माहितीसोबतच मोठा आनंदही मिळवून देते. आयुष्य यशस्वी करायचे असेल किंवा त्याला योग्य आकार द्यायचा असेल, तर विद्यार्थ्यांनी पुस्तकांना जवळ केले पाहिजे,'' अशा शब्दांत 'सकाळ'चे संपादक मल्हार अरणकल्ले यांनी विद्यार्थ्यांना वाचनसंस्कृतीचे महत्त्व पटवून दिले.

सरस्वती मंदिर संस्था व पं. दीनदयाळ विकास वाहिनीने राबविलेल्या 'डॉ. अब्दुल कलाम बुक बँक' या उपक्रमाचे उद्घाटन अरणकल्ले यांच्या हस्ते झाले. या वेळी आमदार विजय काळे, लेखिका व कवयित्री डॉ. हेमा लेले, व्यावसायिक दादा गुजर, संस्थेचे अध्यक्ष ॲड. व्ही. व्ही. आंबेकर, रात्रशाळेचे पालक प्रसेनजीत फडणवीस, दीपक पाटील उपस्थित होते.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची वाचनाची आवड पूर्ण करण्यासाठी ही योजना राबवत असल्याबद्दल अरणकल्ले म्हणाले, ''बदलत्या काळानुसार अशा योजना आवश्यक आहेत. त्यासाठी संस्थेने चांगल्या पुस्तकांची निवड केली आहे. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्यासारख्या व्यक्तींची चरित्रे वाचल्यास आपल्या मनात देश व समाजासाठी काहीतरी करण्याची भावना निर्माण होईल. आपल्या आजूबाजूच्या विश्वाचा उलगडलेला पसारा वाचता येणे, हे संवेदनशील माणसाचे लक्षण आहे. माणूस वाचता आला नाही, तर आपल्यातील संवाद हरवेल.''

हेमा लेले म्हणाल्या, ''प्रसारमाध्यमांच्या उद्रेकामुळे वाचनसंस्कृतीवर धूळ बसली आहे. पुस्तकांबद्दलचा विश्वास निर्माण करण्यात आपण कमी पडत आहोत. आपली संस्कृती ग्रंथांना गुरू मानणारी आहे. जीवनविषयक तत्त्वज्ञान शिकविण्याचे काम हीच वाचनसंस्कृती करते.''

विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी, या उद्देशाने शहरी भागातील अल्प

उत्पन्न गट व ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी पुस्तक बँक सुरू केली आहे. १५ शाळांमध्ये १०० पुस्तकांची पेटी ठेवून तिची तीन महिन्यांनी अदलाबदल करण्यात येणार आहे. तंत्रज्ञान, गणित, शास्त्र, गोष्टी, संत-समाजसुधारकांची चरित्रे, पर्यावरण अशी पुस्तके आहेत.

## घुमान संमेलनाची 'नाममुद्रा'

संत नामदेवांच्या कर्मभूमीत रंगलेल्या साहित्य संमेलनाची 'नाममुद्रा' पुस्तक रूपाने वाचकांपुढे आली आहे.

साहित्य महामंडळाच्या सदस्य शुभदा फडणवीस यांनी त्यांच्या 'आधार' या संस्थेच्या माध्यमातून हे पुस्तक प्रकाशित केले आहे. नगर संमेलनानंतर अध्यक्षीय भाषणे वगळता, साहित्य संमेलनातील इतर भाषणे प्रथमच संग्रहित झाली आहेत. या पुस्तकात संमेलनाध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या अध्यक्षीय भाषणासह नरेंद्र लांजेवार, डॉ. अनुपमा उजगरे, डॉ. उमा कुलकर्णी, श्रीपाद अपराजित, प्रकाश दुबे, बाळ कुलकर्णी, वामन तेलंग, गुरमितसिंग बग्गा आदी मान्यवरांच्या भाषणांचा समावेश आहे.

'संमेलनात नामदेव सभागृहात काही व्याख्याने, परिसंवाद झाले होते. त्यांतील भाषणे खूपच चांगली होती. ती भाषणे साहित्यप्रेमींपुढे पुस्तकरूपाने आणण्याची कल्पना सुचली. त्यानंतर पाठपुरावा करून काही भाषणे मिळवली व त्याचे पुस्तके केले. हे पुस्तक करताना कोणताही व्यावसायिक विचार नव्हता.'

## घोरवडेश्वरला लाव्हारसापासून निर्मित भुयार

सोमाटणे फाट्याजवळील घोरवडेश्वर डोंगरात साडेसहा कोटी वर्षांपूर्वी लाव्हारसामुळे तयार झालेल्या तब्बल २० मीटर लांबीच्या नैसर्गिक भुयाराचा शोध पिंपरी-चिंचवडमधील काही संशोधकांनी लावला आहे, असा त्यांचा दावा आहे. त्याबाबत त्यांनी 'जेनेसिस ऑफ लाव्हा केव्ह डेक्कन प्लॅटू' हा शोधनिबंध तयार केला असून, तो अमेरिकेतील 'स्पिलॉलॉजी' या आंतरराष्ट्रीय नियतकालिकाने स्वीकारला आहे. भारतातील अशा प्रकारचे हे पहिले संशोधन असल्याचा निर्वाळाही नियतकालिकाने दिला आहे. या भुयाराची ब्रिटिशकालीन किंवा कोणत्याही प्रकारच्या शोधनिबंधात नोंद नाही.

भूगोलाचे अभ्यासक डॉ. निखिल पवार, डॉ. अमोद काटीकर, डॉ.

सुमित्रा शिंदे, प्रसिद्ध भूगर्भशास्त्रज्ञ डॉ. सुधा वड्डाडी, पुरातत्त्वशास्त्र अभ्यासक डॉ. सचिन जोशी आणि वनस्पती शास्त्रज्ञ डॉ. संजय एकसंबेकर यांनी याचा अभ्यास केला. त्यांना डेक्कन महाविद्यालयातील निवृत्त प्रा. डॉ. शरद राजगुरू यांचे मार्गदर्शन लाभले. घोरवडेश्वर डोंगरात समुद्रसपाटीपासून ७९० मीटर उंचीवर भुयार असून ते निमुळते आहे. त्याची लांबी २० मीटर असून, उंची १४८ सेंटिमीटर आहे. तिथे प्राण्यांच्या हाडांचे अवशेष सापडले, ते दोन हजार वर्षांपूर्वीचे आहेत.

भारतात जवळपास एक हजार ५५० लेण्या आहेत. त्यांपैकी एक हजार २०० लेण्या (७८ टक्के) महाराष्ट्रात आहेत. याचा अर्थ महाराष्ट्रातील खडक लेण्यांच्या निर्मितीच्या दृष्टीने योग्य असल्याचे पूर्वजांच्या लक्षात आले होते. त्यामुळेच ते नैसर्गिक भुयारांचा शोध घेऊन लेण्या कोरत असावेत. अशाच प्रकारे त्यांनी सध्याचे घोरवडेश्वर डोंगरावरील नैसर्गिक भुयार पाहून सध्याचे मंदिर असलेली लेणी कोरली असावी. कालांतराने लेणीचे रूपांतर मंदिरात झाले. त्यामुळे आजही डोंगरपायथ्याजवळील गावाला शेलारवाडी लेणी असे संबोधले जाते, अशी माहिती डॉ. राजगुरू यांनी दिली. डॉ. काटीकर यांना भटकंती करताना भुयाराचे मुख दिसले. कुतूहल वाटल्याने त्यांनी मित्र डॉ. पवार व एकसंबेकर यांना माहिती दिली. भुयार नैसर्गिक असल्याचे लक्षात आले. डॉ. राजगुरू यांनी पाहणी केल्यानंतर हे भुयार लाव्हारसामुळे (डेक्कन वॉल्कॅनिक प्रॉविन्स) तयार झाल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर सर्वांनी मिळून तब्बल चार वर्षे भूगर्भशास्त्र व भौगोलिक शास्त्रीयदृष्ट्या भुयाराचा अभ्यास केला. त्यातून हे भुयार साडेसहा कोटी वर्षे जुने व नैसर्गिक असल्याचे सिद्ध झाले.

## गुगलच्या 'स्ट्रीट व्ह्यू' मध्ये हवामानबदलाचे परिणाम!

जगभर हवामानबदलाचे भीषण दुष्परिणाम थोपविण्यावर चर्चा होत आहे. हवामानबदलामुळे धोक्यात आलेल्या जगभरातील दुर्गम भागातील वन्य जीवांचा अस्तित्वासाठीचा संघर्ष ऑनलाइन 'स्ट्रीट व्ह्यू' नावाचे फिचर गुगलने विनामूल्य उपलब्ध केले आहे.


या नव्या फीचरमुळे पर्यावरणावर हवामानबदलाचा होणारा परिणाम दाखविला आहे. यामध्ये तापमानवाढीमुळे बर्फ पडण्याची वाट पाहणाऱ्या अस्वलाची होणारी फरफट पाहता येते. मध्य कॅलिफोर्नियातील ओक वृक्षांवर हवामानबदलाचा होणारा परिणाम अनुभवता येतो. गुगल अर्थचे कार्यक्रम

६वी आवृत्ती

# प्रतीक्षा

लेखक
रणजित देसाई

किंमत - १४०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.




‘पाहिलंस, मिलिंद, माणूस अंतर्मुख होण्याला केवढा भितो, ते? दुसऱ्याच्या दु:खाकडे तो निर्विकारपणे पाहू शकतो. त्याच्या दु:खाची छाननी करू शकतो; पण स्वत:चं परीक्षण करताना मात्र तो व्याकूळ होतो. दुसऱ्याच्या जखमेवरची पट्टी चारचौघात त्याला बेदरकारपणे काढता येते; पण स्वत:च्या जखमेवरची पट्टी दूर करण्याच्या कल्पनेनंही तो कासावीस होतो...

‘याचं कारण?

‘कारण एकच... जीवनावरची अश्रद्धा. जीवन जगण्यात असलेला प्रामाणिकपणाचा अभाव. सारेच व्यवहार स्वार्थप्रेरित. मानव एकटाच जन्माला येतो आणि त्याला शेवटी एकटंच जावं लागतं, तरीही त्याला आयुष्यभर सोबतीची आवश्यकता असते. ही सोबत तो शोधीत असतो. आयुष्य क्षणभंगुर आहे, हे माहीत असूनही, चिरंतन, शाश्वत प्रेमाचं ठिकाण त्याला हवं असतं; पण हे सारं स्वत:ला सुरक्षित राखून...

‘दिल्याखेरीज काहीच मिळू शकत नाही. स्वत: हरवल्याखेरीज काही गवसत नाही. हे हरवणं जो शिकला, त्यालाच ती शांती, ते समाधान मिळू शकेल. मात्र ते ठिकाण प्रत्येकानं शोधायला हवं...’

संचालक करीन ट्युक्सेन बेट्टमन म्हणाले, ''जगभरात प्राणी, वनस्पती आणि मनुष्यालाही हवामानबदलाचे परिणाम जाणवत आहेत. 'स्ट्रीट व्ह्यू' हे फिचर जगातील बदलत्या पर्यावरणाकडे पाहण्याची एक प्रकारची खिडकी आहे. त्याचप्रमाणे काही स्वयंसेवी संस्था हवामानबदलाच्या संकटापासून पृथ्वी वाचविण्यासाठी करत असलेले कामही पाहता येते.

## इर्शाद फारुखी यांची सुलेखनाची जगभरारी

इर्शाद हुसेन फारुखी यांनी लाकडावर सुलेखनाद्वारा (कॅलिग्राफी) उतरवलेल्या कुराणातील रेखीव आयत सौंदर्याचा अनुभव देताहेत. सामान्यतः कागदावर उमटणारी ही वैविध्यपूर्ण कला लाकडावरही पाहता येईल. सुलेखनाच्या या नव्या प्रयोगाला जगभरातून प्रतिसाद मिळत आहे.

मूळचे राजस्थानातील असलेले इर्शाद सध्या दिल्लीचे रहिवासी आहेत. इर्शाद हे 'कॅलिफेस्ट'च्या निमित्ताने पुण्यात आले होते.

लाकडावर कॅलिग्राफी करणारे इर्शाद हे एकमेव भारतीय कलाकार आहेत. २१ वर्षांपासून ते ही कला देश-विदेशांत पोचवत आहेत. २००७ मध्ये त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. भाषांमधील सौंदर्य आणि वैविध्य लोकांपर्यंत पोचविणे, हा त्यांचा उद्देश आहे. एक कलाकृती साकारण्यासाठी त्यांना एका महिन्यापासून वर्षापर्यंतचा कालावधी लागतो. भारतातच नव्हे, तर आखाती देश, युरोप आणि अमेरिकेतही या कलाकृतींना मोठी मागणी असल्याचे ते सांगतात. इर्शाद म्हणाले, ''मी दिल्लीतील एका वृत्तपत्रात उपसंपादक म्हणून काम करत होतो; पण काहीतरी वेगळे करावे म्हणून ही कला आत्मसात केली. माझ्याबरोबर माझे विद्यार्थी, कुटुंबीयही कॅलिग्राफी करतात. अरबी व देवनागरीमध्ये ते सुलेखन करतात. या कलाकृती मागणीनुसार करतात व त्याची किंमत १५०० ते १० लाख रुपयांपर्यंत आहे. सुलेखनातून आपली संस्कृती आणि परंपरा इतर लोकांपर्यंत थेटपणे पोचते; मात्र, भारतात त्याचा योग्य प्रचार व प्रसार झालेला नाही. त्यासाठी पुढील पिढीने ही कला आत्मसात करायला हवी. त्यातून या कलेचे महत्त्व वाढेल.

## सुसज्ज 'जस्ट बुक्स'

जस्ट बुक्सची पुण्यात गेल्या कित्येक वर्षांपासून साखळी आहे. याच्या सर्वेसर्वा रुची आग्रवाल यांनी पुण्यात मोक्याच्या ठिकाणी ११ शाखा

काढल्या आहेत. ‘जस्ट बुक्स’ची कोथरूडमधली शाखा २०११ मध्ये नोव्हेंबर महिन्यात सुरू झाली. सिटी प्राईड-कोथरूडनजीक निंबाळकर चौकातून डावीकडे वळल्यावर एरंडवणे भागाकडे जाणाऱ्या रस्त्यावरच जस्ट बुक्स ही अवाढव्य लायब्ररी दिसते. गुरुवार सोडून आठवड्यात सकाळी १० ते ९ पर्यंत सुरू असणाऱ्या लायब्ररीचे कामकाज व्यवस्थापक महेश पाटील आणि नैना कुलकर्णी पाहतात.

लायब्ररीने आतापर्यंत साधारण बाराशे सभासद जोडले आहेत. इंग्रजीमधील विपुल साहित्याबरोबरच मराठी, हिंदी ते अगदी कन्नड, तमीळ, तेलुगू, पुस्तकेही विशेष करून इथे उपलब्ध आहेत. पुस्तकांची संख्या आता १२ हजारांपर्यंत गेली आहे. लहान मुलांसाठीसुद्धा एक वेगळा विभाग करण्यात आला आहे.

इथल्या सभासदांची सर्व खाती ही डिजिटलाइज आहेत. आपले लायब्ररी कार्ड मशिनवरून एकदा फिरवले, की आपल्या खात्यामधील सर्व माहिती स्क्रीनवर दिसते. आतापर्यंत घेतलेली पुस्तके, परत करायची राहून गेलेली पुस्तके, त्याचप्रमाणे आपल्याला पुढे जी पुस्तके वाचायची आहेत, त्यांची ‘विश लिस्ट’सुद्धा आपण इथे अपडेट करू शकतो. त्याचप्रमाणे स्क्रीनवरच आपल्याला हव्या असलेल्या पुस्तकाचे नाव टाईप करून ते पुस्तक या लायब्ररीत आहे की नाही, हे पडताळून पाहण्याची सोय करण्यात आली आहे. जर त्या पुस्तकाचे रेकॉर्ड नसेल तर सभासदांसाठी अशी पुस्तके दुसऱ्या शाखांमधून मागवली जातात. लहानग्यांपासून थोरामोठ्यांपर्यंत वाचनवेड रुजवणारी ‘जस्ट बुक्स’ ही लायब्ररी अधिकाधिक लोकप्रिय होत आहे.

## स्त्री साहित्य संमेलनाध्यक्ष- प्रतिमा रानडे

“स्त्री लेखकांनी कौटुंबिक नाती, स्त्री-पुरुष संबंधांपलीकडच्या अवकाशात शिरून लेखन केले पाहिजे. इरावती कर्वे, दुर्गा भागवत, विभावरी शिरूरकर, वसुंधरा पटवर्धन, कुसुमावती देशपांडे, कमल देसाई यांसारख्या लेखिकांनी जगण्याचे खरोखर भान आणणारे लेखन केले असून, असे लेखन होणे गरजेचे आहे,” असे मत स्त्री साहित्य संमेलनाध्यक्ष प्रतिमा रानडे यांनी उद्‌घाटनप्रसंगी व्यक्त केले.

साहित्यप्रेमी भगिनी मंडळाने याचे आयोजन केले होते. माजी कुलगुरू डॉ. द. ना. धनागरे, ज्येष्ठ समीक्षक डॉ. विलास गोखले, अखिल भारतीय

मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष श्रीपाल सबनीस, मंडळाच्या अध्यक्ष डॉ. ज्योत्स्ना आफळे, डॉ. कल्याणी दिवेकर, डॉ. मंदा खांडगे, यामिनी रानडे आदी या वेळी उपस्थित होते.

त्या म्हणाल्या, ''आज आपल्यासमोर जागतिकीकरण, दहशतवाद, जीवघेणी स्पर्धा आदी आव्हाने उभी आहेत. या विषयांवरही स्त्री साहित्यिकांकडून लेखन व्हावे.''

कलाकार व साहित्यिकांच्या पुरस्कारवापसीबद्दल बोलताना रानडे म्हणाल्या, ''असहिष्णुतेच्या मुद्द्यांवरून कलाकार व साहित्यिक पुरस्कार परत करत आहेत. प्रसारमाध्यमांमधून या विषयावर फार चर्चा झाली. मला वाटते पुरस्कार परत करण्यापेक्षा कलावंतांनी, लेखकांनी आपल्या कलेवर, लेखणीवर विश्वास ठेवायला हवा. कारण लेखन कायम असते आणि चर्चा विरून जाते.''

डॉ. धनागरे म्हणाले, ''स्त्री-साहित्यामध्ये पुरुषांनी स्त्रियांविषयी लिहिलेल्या साहित्याचा समावेश करावा. तसेच साहित्य हे कथा, कादंबऱ्या, कविता, नाटक आदी लोकप्रिय प्रकारापुरतेच मर्यादित न राहता, वैचारिक लेखनाची दखल घेण्यात यावी.'' डॉ. खोले म्हणाले, ''स्त्री-साहित्याकडे डोळसपणे पाहायला हवे. स्त्री-साहित्याचे समीक्षण करायचे झाल्यास स्त्रीवादी दृष्टी असायला हवी.'' मंडळातर्फे या वेळी 'स्त्री-साहित्याचा मागोवा' या पुस्तकाच्या चौथ्या खंडाचे प्रकाशन करण्यात आले.

## 'काश्मीरची ५००० वर्षे' या पुस्तकाचे प्रकाशन

''काश्मीर ही वेगवेगळ्या धर्मांची, तत्त्वज्ञानांची, परंपरांची प्रयोगशाळा आहे. सर्वांच्या समुच्चयातून तेथे वेगवेगळे रसायन घडते आहे; पण काहींना समन्वयाचा विचार पटत नाही. ही वृत्ती बदलून घेण्याची गरज आहे,'' असे मत डॉ. सदानंद मोरे यांनी व्यक्त केले. इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्राचा आणि काश्मीरचा संबंध फार जुना असल्याची पुष्टीही त्यांनी जोडली.

सरहद आणि 'चिनार पब्लिशर्स'च्या समारंभात संजय नहार अनुवादित 'काश्मीरची ५००० वर्षे' या पुस्तकाचे प्रकाशन 'सकाळ माध्यम समूहा'चे मुख्य संपादक श्रीराम पवार यांच्या हस्ते झाले. या वेळी ज्येष्ठ अभ्यासक डॉ. शरद हर्डीकर, 'सरहद'चे शैलेश वाडेकर, प्रशांत तळणीकर उपस्थित होते.

डॉ. मोरे म्हणाले, ''आपल्याकडे अनेकांना काश्मीर नीट कळलेला नाही. संगीत, भाषा अशा वेगवेगळ्या पातळ्यांवरील महाराष्ट्राचा आणि

काश्मीरचा संबंधही अनेकांना समजलेला नाही. त्याबाबत कोणी अभ्यासही केला नाही. त्यासाठी प्रथम आपल्याला इतिहास नीट समजून घ्यावा लागेल; पण इतिहास म्हटले की आपण या विषयांना युद्धभूमीचे स्वरूप प्राप्त करून देतो आणि एकमेकांत लढत बसतो. ही प्रवृत्तीसुद्धा आपण मोडून काढली पाहिजे. इतिहास समजून घेऊन पुढे गेले पाहिजे.''

पवार म्हणाले, ''काश्मीर समजून घेण्यासाठी अतिशय सोपा विषय आहे; पण त्याच्या गुंत्यात अडकलो तर त्यातून कधीच सुटका होणार नाही. बाहेरून येणारा माणूस आपले काहीतरी हिसकावून घेईल, ही वृत्ती काश्मीरमध्ये सातत्याने आहे. त्यालाही एक इतिहास आहे. त्यामुळे बाहेरच्यांचे वर्चस्व तेथे कधीच मानले गेले नाही. तेथे विविध प्रवाह आहेत. विविध पक्ष आहेत. एकमेकांना छेद देणारेही घटक आहेत. शासकीय अधिकारी, गुप्तचर यंत्रणा, सुरक्षा यंत्रणा, आंतरराष्ट्रीय संघटना, वेगवेगळे देश यांच्या भूमिका वेगवेगळ्या आहेत. त्यामुळे वेगवेगळ्या अंगाने काश्मीर समजून घ्यायला हवा. काश्मीर म्हणजे केवळ समस्या नव्हे.''

''महाराष्ट्राचा बराचसा इतिहास 'मिसिंग' आहे; पण काश्मीरचे तसे नाही, सलगपणे सांगता येईल असा लिखित आणि मौखिक स्वरूपातील इतिहास उपलब्ध आहे. त्यातून त्या काळाचे धागेदोरे सापडतात. ते खोलात जाऊन अभ्यासायला हवेत. त्यातले चांगले घटक आजच्या काळाशी जोडून घ्यायला हवेत. या दृष्टिकोनातन 'काश्मीरची ५०० वर्षे' हे पुस्तक मोलाचे ठरणार आहे,'' असेही पवार यांनी सांगितले. नहार म्हणाले, ''काश्मिरी मन आणि समाज समजून घेण्यासाठी दीर्घकालीन अभ्यास, संशोधन व्हायला पाहिजे. त्यासाठीच 'सरहद'ने दोन पावले पुढे टाकली आहेत. या अभ्यासातूनच हे पुस्तक वाचकांसमोर आणले आहे.'' झाहिद भट यांनी सूत्रसंचालन केले.

## महाराष्ट्र फाऊंडेशन पुरस्कार

स्त्रियांच्या हक्कांबद्दल जनजागृती केल्याबाबत महाराष्ट्र फाऊंडेशन (अमेरिका) आणि साधना ट्रस्ट यांच्या वतीने ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ यांना 'समाजकार्य जीवनगौरव' देण्यात येईल.

पुरोगामी, धर्मनिरपेक्ष विचारांच्या प्रसाराबद्दल 'सकाळ'चे संपादक-संचालक उत्तम कांबळे यांना 'डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती पुरस्कार' जाहीर करण्यात आला.

या पुरस्कारांचे वितरण ९ जानेवारी रोजी होईल. दाभोलकर पुरस्काराचे हे तिसरे वर्ष असून, एक लाख रुपये आणि स्मृतिचिन्ह असे त्याचे स्वरूप आहे.

यंदा 'साहित्यातील जीवनगौरव पुरस्कार' ज्येष्ठ पत्रकार सुरेश द्वादशीवार यांना जाहीर झाला आहे. साहित्य आणि समाजकार्य या दोन्ही विभागांतील जीवनगौरव पुरस्कारांचे स्वरूप प्रत्येकी दोन लाख रुपये आणि स्मृतिचिन्ह असे आहे.

साहित्य विभागात लेखक शरद बेडेकर (मुंबई) यांच्या 'समग्र निरीश्वरवाद' पुस्तकाला 'अपारंपरिक ग्रंथ', रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ (नागपूर) यांच्या 'खेळघर' कादंबरीला 'ललित ग्रंथ' आणि अजित देशमुख यांच्या 'सुस्साट' नाटकाला 'रा. शं. दातार नाट्य' असे पुरस्कार जाहीर झाले आहेत.

हे तीन ग्रंथ पुरस्कार आणि एक नाट्य पुरस्कार प्रत्येकी २५ हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह स्वरूपातील असतील. समाजकार्य विभागात 'महिला राजसत्ता आंदोलन' या संस्थेतील कार्याबद्दल पुण्यातील भीम रासकर यांना जातपंचायतीच्या विसर्जनाच्या कार्यासाठी नाशिकमधील कृष्णा चांदगुडे यांना (सामाजिक प्रश्न) आणि भटक्या-विमुक्तांसाठीच्या कार्याबद्दल मुंबईतील पल्लवी रेणके यांना (असंघटित कष्टकरी) 'कार्यकर्ता पुरस्कार' देण्यात येणार आहे. तिन्ही कार्यकर्ता पुरस्कारांचे स्वरूप प्रत्येकी ५० हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह असे राहील.

## ... आणि 'मुंबई-पुणे-मुंबई २' ची पायरसी

मंगळवारी संध्याकाळी यू ट्यूब आणि काही 'साइट्वर 'मुंबई पुणे मुंबई २' हा सिनेमा दिसायला लागला. अजूनही थिएटरमध्ये सुरू असलेला हा सिनेमा साइटवर पडलेला पाहून तिथे वर्दळ वाढली. ही बातमी सिनेमा दिग्दर्शक सतीश राजवाडे यांना समजली आणि अवघ्या चार तासांत हा सिनेमा सगळीकडून ब्लॉक झाला. पायरसीचा यशस्वी मुकाबला केला गेला.

'तुमचा सिनेमा पायरसी होऊन इंटरनेटवर आला आहे.' असा मित्राचा फोन आल्यानंतर सतीश राजवाडेनी लगेच निर्माते संजय छाब्रिया यांना कळवली. छाब्रिया यांनी लगेचच एक एजन्सी नेमून यू-ट्यूब आणि इतर साइटवरच्या लिंक ब्लॉक केल्या. छाब्रिया म्हणाले, ''यू ट्यूबवरील आणि इतर टोरेंट्सच्या लिंक आम्ही ब्लॉक केल्या. पायरसी रोखण्यासाठी आणखी

नवं कोरं


# ओन्ली टाइम विल टेल

द क्लिफ्टन क्रॉनिकल्स
खंड १

मूळ लेखक - जेफ्री आर्चर

अनुवाद - लीना सोहोनी

किंमत - ४८०/- रु.।पोस्टेज - ३०/- रु.




हॅरी क्लिफ्टनच्या जीवनाची ही लोकविलक्षण कहाणी १९२० मध्ये सुरू होते. तेव्हा हॅरीच्या तोंडचे शब्द असतात, ''माझ्या वडिलांना युद्धात लढताना मरण आलं, असं मला सांगण्यात आलं आहे.'' मात्र आपल्या वडिलांना प्रत्यक्षात कशाप्रकारे, कोणत्या परिस्थितीत मृत्यू आला, हे सत्य हॅरीला समजण्यासाठी तब्बल वीस वर्षांचा कालावधी जावा लागतो. त्यातून एक नवाच प्रश्न त्याच्यासमोर उपस्थित होतो– 'खरंच आपले वडील नक्की कोण होते?'

हॅरी हा ब्रिस्टॉलच्या बंदरात काम करणाऱ्या एका सामान्य गोदीकामगाराचा मुलगा आहे की वेस्ट कंट्रीमधल्या एका खानदानी, प्रतिष्ठित धनवंताच्या पोटी त्याचा जन्म झालेला आहे? खरंच तो बॅरिंग्टन शिपिंग लाइन्सच्या मालकाचा मुलगा असेल का?

'ओन्ली टाइम विल टेल' या पुस्तकात १९२० ते १९४० या कालावधीचा आढावा घेण्यात आला आहे. या कथानकातील व्यक्तिरेखा संस्मरणीय आहेत. या पहिल्या खंडात पहिल्या महायुद्धापासून ते दुसऱ्या महायुद्धाच्या आरंभापर्यंतचा कालखंड चित्रित करण्यात आला आहे. याच वेळी हॅरीपुढे दोन पर्याय उभे राहतात– एकतर उच्च शिक्षणासाठी ऑक्सफर्डला जाऊन राहायचे किंवा हिटलरच्या जर्मनी विरुद्ध युद्धात उतरायचे.

हे पुस्तक वाचकाला एका प्रदीर्घ प्रवासाला घेऊन जाते. हा प्रवास इतका रोमहर्षक आहे की, तो संपूच नये, असे वाटते. या अविस्मरणीय कहाणीचे शेवटचे पान वाचक जेव्हा वाचून संपवतो, तेव्हा एक भलेमोठ्ठे प्रश्नचिन्ह कथानायक हॅरी क्लिफ्टनच्या समोर आणि त्याचबरोबर वाचकांच्याही समोर उभे ठाकते...

एक उपाय केला जातो, तो म्हणजे एकापेक्षा अधिक 'फेक टॉरेंट' निर्माण करणे. म्हणजे सिनेमाचे नाव बरोबर टाकायचे. लिंक ओपन केल्यावर मात्र वेगळेच काहीतरी समोर येते. असे केल्यानं पाहणारा वैतागून ते सर्च करणे सोडून देतो. हे झाले तातडीचे उपाय. पायरसीचे प्रकार रोखण्यासाठी आता सरकारनेच पुढाकार घ्यायला हवा.'' सिनेमाचे पोस्ट-प्रॉडक्शन आणि साउंडचे काम एकाच स्टुडिओत करायला हवे, असा उपायही छाब्रियांनी सुचवला.

'पायरसी हा आज मोठा व्यवसाय झाला आहे. त्याचे मोठे रॅकेट आहे. कायदे आणखी कडक करून गुन्हेगारांना शिक्षा झाली, तरच जरब बसेल. महत्त्वाचे म्हणजे प्रेक्षकांचेही प्रबोधन करायला हवे. एका सिनेमाच्या निर्मितीमध्ये ३५० ते ४०० जण जोडलेले असतात. पायरसीमुळे या सगळ्यांच्या पोटावर पाय येतो. याशिवाय थिएटरशी जोडलेला स्टाफ वेगळाच. ती वेळीच रोखायला हवी,' असे मत राजवाडे यांनी मांडले.

## 'परतु' बनवण्यात हॉलिवूड निर्मात्यांचा सहभाग

वेगवेगळे विषय आणि आशयामुळे मराठी सिनेमा समृद्ध होत आहे. उत्तम विषय चांगल्या प्रकारे मांडले जाऊ लागले आहेत. मराठी सिनेमाच्या याच आशयसंपन्नतेची भुरळ अमराठी कलाप्रेमींना पडली आहे. निर्मितीसाठी एका हॉलिवूडच्या कंपनीने पुढाकार घेऊन 'परतु' या सत्यकथेवर आधारित मराठी सिनेमाची निर्मिती केली आहे.

डेरेल कॉक्स, क्लार्क मॅकमिलिअन, रूपेश महाजन आणि अनिवासी भारतीय नितीन अडसूळ या निर्मात्यांनी चांगली कलाकृती रसिकांपर्यंत पोहोचावी यासाठी देशाची, भाषेची भिंत ओलांडत मराठी सिनेमाची वाट चोखाळली. निर्मितीबरोबरच कथेपासून वितरणापर्यंत सगळी जबाबदारी घेत तसेच 'परतु' सिनेमा अधिक प्रभावीपणे रसिकांपर्यंत पोहोचावा यासाठी यापूर्वी कधीही न वापरलेला 'ग्राउंड वर्क मार्केटिंग' हा प्रमोशनचा अनोखा फंडा या निर्मात्यांनी अवलंबला. या तंत्रांतर्गत वेगवेगळ्या शहरांत जाऊन सिनेमाबद्दल माहिती सांगत रसिकांमध्ये सिनेमाविषयीची उत्सुकता निर्माण करण्यात आली. या निर्मात्यांनी आपल्या खास पद्धतीने हा सिनेमा प्रस्तुत करत आपले वेगळेपण दाखवून दिले आहे.

या निर्मात्यांनी मराठी सिनेमाची निर्मिती करत जोडलेला सिनेमा संस्कृतीचा नवा बंध मराठी सृष्टीला नवे वळण देणारा असेल, अशी अपेक्षा

करता येईल. ‘परतु’ या सिनेमाची कथा क्लार्क मॅकमिलिअन, नितीन अडसूळ आणि डेरेल कॉक्स यांनी लिहिली असून, याचे मराठी संवादलेखन मयूर देवल यांनी केले आहे. सिनेमाचे निर्माते म्हणून नितीन अडसूळ, सचिन अडसूळ, रूपेश महाजन, डेरेल कॉक्स, क्लार्क मॅकमिलिअन हे काम पाहत आहेत.

किशोर कदम, स्मिता तांबे, सौरभ गोखले, गायत्री सोहम, अंशुमन विचारे, नवनी परिहार, राजा बुंदेला, रवी भारतीय आणि बालकलाकार यश पांडे या कलाकारांच्या ‘परतु’ सिनेमात महत्त्वपूर्ण भूमिका आहेत.

## एक अब्ज लोक इंटरनेटपासून वंचित राहण्याची भीती

इंटरनेट डॉट ऑर्गसाठी समर्थक गोळा करण्याचे प्रयत्न यशस्वी ठरल्यानंतर फेसबुकने आता या मोहिमेचे नाव बदलून फ्री बेसिक ठेवले आहे. त्यासाठी प्रत्येक युजरच्या फेसबुक पेजवर सर्वांत वर या मोहिमेला पाठिंबा देणारी लिंक देण्यात आली आहे. यावर क्लिक केले, तर तुमचा या मोहिमेला पाठिंबा असून त्या आशयाचा ई-मेल दूरसंचार नियामक आयोगाला पाठविला जाईल, असा दावा केला आहे. मोहिमेला मंजुरी मिळाली नाही, तर एक अब्ज लोक इंटरनेटपासून वंचित राहतील, असा फेसबुकचा दावा आहे.

फ्री बेसिकमुळे परस्परांशी संपर्क साधणे, शिक्षण, रोजगार, आरोग्य सुविधा, शेती वगैरे गोष्टी मोफत उपलब्ध होत आहेत. ज्यांना इंटरनेटसाठी पैसा खर्च करणं परवडत नाही, त्यांना याचा लाभ होईल. देशातील सर्व नागरिक, ॲप डेव्हलपर आणि मोबाइल ऑपरेटर यामध्ये सहभागी होऊ शकतात. त्यामुळे देशात डिजिटल समानता यावी, यासाठी मी फ्री बेसिकला पाठिंबा देत आहे, असं या मेसेजमध्ये म्हटलं आहे.

काही युजरनी यावर टीका केली आहे. ‘मेंढीचं कातडं पांघरलेला हा लांडगा आहे’ इथपासून ‘ही अतिशय चुकीची मोहीम आहे,’ इथपर्यंत लोकांनी टीका केली आहे. लोकांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे, असे सॉफ्टवेअर फ्रीडम लॉ सेंटरच्या कायदा विभागाचे संचालक मिशी चौधरी सांगतात.

## योगासनांमुळे आरोग्यावरचा खर्च येतो निम्म्यावर!

जगभरात योगसाधनेचा प्रसार होत आहे. योग ही जीवनपद्धतीच असून, तिच्यामुळे शरीर व मन तंदुरुस्त राहते. योगसाधनेमुळे आरोग्यावरचा खर्चही कमी होतो. अमेरिकेतील मॅसेच्युसेट्स इन्स्टिटट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि बेन्सन हेन्री इन्स्टिटट्यूटने संयुक्तपणे यासंदर्भात संशोधन केले. २००६ ते २०१४ या काळात रिलॅक्सेशन, रिसपॉन्स, रेसिलन्सी प्रोग्रॅममध्ये (थ्री आरपी) भाग घेतलेल्या रुग्णांच्या नोंदी, तसेच त्यांच्यातील बदल तपासले. या रुग्णांमधील उपचार, विविध चाचण्या आदींवरील खर्च सरासरी ४३ टक्क्यांनी कमी झाल्याचे निदर्शनास आले. योगसाधनेच्या चार ते सहा महिन्यांमध्ये रुग्णांमध्ये फरक पडण्यास सुरुवात झाली. भारतीय प्राचीन परंपरेतील योगसाधना तसेच ध्यान यामुळे शिथिलीकरण होऊन ताण, चिंता आणि नैराश्य दूर जाते. त्याचप्रमाणे, मानसिक शांती अनुभवता येते. नियमित योगसाधनेमुळे ह्रदयाचे ठोके आणि रक्तदाबावरही चांगला परिणाम होतो. आजारी पडण्याची शक्यता घटून, आरोग्यावरचा खर्चही कमी होतो.

## ‘सेल्फी’ हा मानसिक आजार!


‘काढ सेल्फी आणि टाक सोशल मीडियावर,’ हा सध्याच्या तरुणाईचा नित्यनेमाचा टाइमपास. स्वत:च्याच प्रेमात पडून सतत सेल्फी काढण्याची ही सवय म्हणजे प्रत्यक्षात ‘सेल्फायटिस’ हा मानसिक आजार असल्याच्या निष्कर्षाप्रत वैद्यकशास्त्र आले आहे. या आजाराचे टप्पेही निश्चित करण्यात आले असून, दिवसभरात पाच-सहा सेल्फी काढून अपलोड करण्याच्या सवयीला व्यसन म्हणून घोषित करण्याचा ‘वर्ल्ड सायकियाट्रिक असोसिएशन’चा विचार आहे.

हे सर्व निष्कर्ष अमेरिकेतील सामाजिक व्यवस्थेवर आधारित असले तरी आपल्या देशातही परिस्थिती फारशी वेगळी नाही, असे डॉ. सागर मुंदडा म्हणाले.

‘सतत सेल्फी काढून सोशल मीडियावर अपलोड करणे हा विकार आहे; पण हा मानसिक आजार असू शकतो हे अनेकांना अजूनही समजलेले नाही. अनेकदा विद्यार्थ्यांच्यात सेल्फायटिसची लक्षणे असल्याचे समोर येते. पण हा आजार जडल्याचे कोणीही मान्य करीत नाही.

नवं कोरं

# द सिन्स ऑफ द फादर




द क्लिफ्टन क्रॉनिकल्स
खंड २

मूळ लेखक - जेफ्री आर्चर

अनुवाद - लीना सोहोनी

किंमत - ४००/- रु.।पोस्टेज - ३०/- रु.

न्यूयॉर्क १९३९. टॉम ब्रॅडशॉ याला खुनाच्या आरोपाखाली अटक होते. आपल्या सख्ख्या भावाचा खून केल्याचा आरोप त्याच्यावर असतो. सेफ्टन जेल्क्स हा न्यू यॉर्कमधील अत्यंत नावाजलेला वकील कोणताही मोबदला न घेता त्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पुढे येतो आणि अगदी कमीत कमी शिक्षा होण्याची हमी देतो. तेव्हा त्याचा हा प्रस्ताव स्वीकारण्यावाचून टॉम ब्रॅडशॉपाशी दुसरा काही पर्यायही नसतो. टॉमवर खटला चालवण्यात येऊन त्यात त्याला अपराधी ठरवण्यात येते. आणि जेव्हा शिक्षा भोगण्यासाठी त्याची रवानगी तुरुंगात करण्यात येते, तेव्हा मात्र आपले निर्दोषत्व सिद्ध करण्यासाठी त्याच्यासमोर केवळ एकच मार्ग असतो- तो म्हणजे, आपली खरी ओळख जगापुढे उघड करणे. पण त्याला स्वतःच्या प्राणाहूनही अधिक प्रिय असलेल्या एका स्त्रीला त्यामुळे काही त्रास होऊ नये म्हणून तसे कदापि न करण्याची शपथ त्याने घेतलेली असते.

दरम्यान ही तरुण स्त्री, त्या दोघांच्या प्रेमातून जन्माला आलेल्या त्यांच्या बाळाला घरी ठेवून न्यूयॉर्कला येते. आपल्या बाळाच्या पित्याला कसेही करून शोधून काढून त्याच्याशी लग्न करायचे, असा दृढनिश्चय तिने केलेला आहे. त्याचे समुद्रात बुडून अपघाती निधन झाल्याची ऐकीव बातमी खरी मानायला तिचे मन तयारच नाही. आपला प्रियकर जिवंत असण्याचा एकमेव पुरावा तिच्या डोळ्यांसमोर आहे, तो म्हणजे एक पत्र- कधी न उघडण्यात आलेले पत्र! ब्रिस्टॉलच्या एका घरातील टेबलावर गेले वर्षभर बंद पाकिटात असलेले ते पत्र!

जेफ्री आर्चर यांच्या या महाकादंबरीत जसजशी एक-एक करून कौटुंबिक रहस्ये उलगडत जातात, तशी-तशी त्या परिवाराच्या सदस्यांची निष्ठा पणाला लागते. या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या महान कादंबरीकाराबरोबर आता आपल्याला सर्वांना एका प्रदीर्घ प्रवासाला निघायचे आहे. या प्रवासात तुम्हाला कुठेही 'स्टॉप साइन्स...' 'वन वे रोड साइन्स...' किंवा 'डेड एंड साइन्स...' आढळणार नाहीत...!



# पुरस्कार

## ॲलेक पदमसी यांना 'तन्वीर सन्मान'

रूपवेध प्रतिष्ठानतर्फे 'तन्वीर सन्मान' यंदा अभिनेते, नाट्यदिग्दर्शक व 'द थिएटर ग्रुप मुंबई'चे ॲलेक पदमसी यांना, तर 'नाट्यधर्मी' पुरस्कार दिग्दर्शक प्रदीप मुळ्ये यांना देण्यात आला. सन्मानचिन्ह व एक लाख रुपये असे 'तन्वीर सन्मान' पुरस्काराचे तर सन्मानचिन्ह व तीस हजार रुपये, असे नाट्यधर्मी पुरस्काराचे स्वरूप आहे.

डॉ. श्रीराम लागू व दीपा लागू यांचा पुत्र तन्वीर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ रंगभूमीसाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना दर वर्षी हा पुरस्कार दिला जातो. मागील वर्षी पुरस्कार न देता त्याची रक्कम 'बिनकामाचे संवाद' या नाटकास देण्यात आली.

पदमसी यांनी आपल्या साठ वर्षांच्या कारकिर्दीत सत्तर नाटके, जाहिरात, चित्रपट अशा माध्यमांवर ठसा उमटविला. मुंबईच्या इंग्रजी नाट्यवर्तुळात काम करतानाच हिंदी नाटकेही त्यांनी केली. पर्ल पदमसी, कबीर बेदी, सबीरा मर्चंट, शॅरॉन प्रभाकर, दलिप ताहिल, स्मिता पाटील यांसारखे कलाकार त्यांच्या नाटकांनी घडविले. रिचर्ड ॲटेनबरोंच्या 'गांधी' चित्रपटातील जीनांची भूमिका पदमसी यांनी केली. इंग्रजी लेखकांसह विजय तेंडुलकर, गिरीश कार्नाड यांसारख्या भारतीय लेखकांची नाटके त्यांनी सादर केली. पद्मश्री, संगीत नाटक अकादमी आणि टागोर रत्न अशा पुरस्कारांचे ते मानकरी आहेत.

नेपथ्य आणि प्रकाशयोजनेतील दृश्यमानतेचे नवे मापदंड मुळ्ये यांनी निर्माण केले. 'सारे प्रवासी घडीचे', 'इंदू काळे-सरला भोळे', 'ड्राय डे, 'राजा सिंह' अशा नाटकांचे दिग्दर्शन त्यांनी केले. वेशभूषा, कलादिग्दर्शन, अभिनय अशी नानाविध कामे त्यांनी केली आहेत. त्यांनाही विविध पुरस्कारांनी सन्मानित केले आहे.

## तेजस चव्हाण यांना युवा संगीतकार संगीत साधना पुरस्कार

‘माझ्यावर दिग्गज कलाकारांपासून ते अगदी माझ्या मुलाचादेखील प्रभाव आहे. त्यांच्यातील गुणांमुळेच मी घडत गेलो आणि घडत आहे,’ अशी भावना प्रसिद्ध संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी यांनी व्यक्त केली.

श्री बालाजी प्रतिष्ठान ग्लोबल स्टार फाउंडेशन व इंडियन टॅलेंट सर्च ॲकॅडमी यांच्या वतीने डॉ. सलील कुलकर्णी यांच्या वाढदिवसानिमित्त ‘संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी संगीत साधना पुरस्कार’ युवा संगीतकार तेजस चव्हाण याला देण्यात आला. मुंबई येथील तबलावादक रुपक पवार व पुण्यातील संवादिनीवादक मिलिंद कुलकर्णी यांना कलाभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. श्याम देशपांडे, डी. जी. शिंदे, मोनिका कुलकर्णी, एन.पी. मित्रगोत्री, जगदीश महामुनी, ज्येष्ठ हार्मोनिअमवादक प्रमोद मराठे, रघुनाथ खंडाळकर, संस्थेच्या प्रमुख अनुराधा खटकर व धनंजय दीक्षित उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात रुपक पवार यांच्या बहारदार तबलावादनाने झाली. मिलिंद कुलकर्णी यांनी त्यांना संवादिनीवर सुरेख साथ केली. उत्तरार्धात डॉ. कुलकर्णी यांच्यासोबत गप्पागोष्टी आणि गाणी यांची मैफल रंगली. ‘माझ्यावर सर्व कलाकारांचा प्रभाव आहे. त्यात वयाने ज्येष्ठ व लहान कलाकारही आहेत. माझा मुलगा गायला लागला की मलाच काळजी वाटते, इतका तो चांगला गातो. आपल्यावर सर्वांचा प्रभाव असावा; लहान-मोठा असा भेद करू नये, कारण त्यातच एखादे गाणे सापडते किंवा कविता तयार होते,’ असे सांगत डॉ. कुलकर्णी यांनी बालगीते सादर केल्यानंतर पु. ल. देशपांडे व विजय तेंडुलकर यांनी दिलेली शाबासकी आजही आठवते, अशी भावना व्यक्त केली.

डॉ. कुलकर्णी यांनी या वेळी आपल्या गाजलेल्या गीतांसह प्रिय सखा भगवंता, तू तेव्हा तशी अशी उत्कट गीते सादर केली. विक्रांत देशमुख यांनी त्यांची मुलाखत घेतली, तर सूत्रसंचालन श्रीकांत चौगुले यांनी केले.

## जयश्री काळे यांना ‘बाया कर्वे पुरस्कार’ प्रदान

‘‘माणसाच्या मनात क्रौर्य, हिंसकवृत्ती, मत्सर असला तरीही तेवढीच सद्भावना आणि करुणा आहे; पण आताच्या समाजव्यवस्थेमुळे माणसातील सद्भावना दडपून गेली आहे. मध्यमवर्गीय माणसे कृत्रिमतेच्या आहारी गेली

आहेत. त्यामुळे त्यांच्या वागण्यातील खरे काय, खोटे काय, हे कळत नाही. त्यामुळे समाजच कृत्रिमतेच्या आहारी जात आहे,'' अशी खंत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अनिल अवचट यांनी व्यक्त केली.

महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेतर्फे या वर्षीचा 'बाया कर्वे पुरस्कार' जागृती सेवा संस्थेच्या संस्थापक जयश्री काळे यांना डॉ. अवचट यांच्या हस्ते देण्यात आला. संस्थेच्या अध्यक्ष स्मिता घैसास, कार्याध्यक्ष विश्वास देवल, उपकार्याध्यक्ष भालचंद्र भेडसगावकर, सचिव डॉ. पी. व्ही. एस. शास्त्री, विद्या देशपांडे, संध्या टाकसाळे, श्रीपाद जोशी उपस्थित होते.

डॉ. अवचट म्हणाले, ''लोकमान्य टिळक, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले आणि त्यानंतर महर्षी कर्वे, बाया कर्वे असा त्या वेळचा काळच रत्नांचा होता. स्वत:च्या पलीकडे पाहणारे, स्वत:चे संपूर्ण जीवन समाजासाठी झोकून देणारी माणसं त्या वेळी होती; परंतु आज तशी परिस्थिती राहिलेली नाही.''

काळे म्हणाल्या, ''या पुरस्काराचे माझ्या आयुष्यात अनन्यसाधारण महत्त्व आहे. या पुरस्काराने नवी ऊर्जा मिळाली आहे.''

कार्यक्रमाच्या पूर्वार्धात मृणालिनी चितळे यांनी काळे यांची मुलाखत घेतली. त्या वेळी काळे म्हणाल्या, ''सामाजिक जाणिवेचे भान लहानपणापासूनच होते. शिक्षण, आरोग्य आणि दारिद्र्य हे एकमेकांत गुंतल्यामुळे या क्षेत्रात काम करताना व्यापक विचाराची गरज असल्याचे अनुभवातून कळले. पीडित महिला आणि मुलांसाठी 'आनंदघर' तर परावलंबित्व आलेल्या लोकांसाठी 'आधारघर' हे प्रकल्प आम्ही सुरू केले. स्त्रियांना आपल्या पायांवर उभे राहण्यासाठी मदत करणे, याकडे आमचे सर्वाधिक लक्ष असते.'' देवल यांनी प्रास्ताविक, तर सुमित्रा भंडारी यांनी सूत्रसंचालन केले.

## कै. रमेश दामले पुरस्कार

'महाराष्ट्र मंडळ संस्था हेच माझे कुटुंब आहे. या कुटुंबाचा घटक असल्याचा सार्थ अभिमान आहे. या संस्थेने जीवनाला दिशा देतानाच जगण्याचे परिमाण दिले,' अशी भावना ज्येष्ठ बास्केटबॉल प्रशिक्षक सुरेश तळवलकर यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र मंडळातर्फे 'रमेश दामले स्मृती प्राइड ऑफ महाराष्ट्र मंडळ पुरस्कार सिम्बायोसिसचे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार यांच्या हस्ते

तळवलकर यांना प्रदान करण्यात आला. संस्थेच्या गुलटेकडी येथील संकुलात हा कार्यक्रम झाला.

संस्थेचे कार्यवाह धनंजय दामले, श्रीकांत बापट, एअर मार्शल (निवृत्त) भूषण गोखले या वेळी उपस्थित होते. मंगेश वाघमारे यांनी सूत्रसंचालन केले.

महाराष्ट्र मंडळ रोमारोमात भिनल्याचे सांगून तळवलकर म्हणाले, ''या संस्थेत शैक्षणिक धड्यांसह खेळाचेही धडे मिळाले. महाराष्ट्र मंडळ सर्व व्यायामप्रेमींचे श्रद्धास्थान व्हावे.''

डॉ. मुजुमदार म्हणाले, ''मानवी विकासामध्ये ईश्वर व बल या दोन्हींची उपासना महत्त्वाची आहे. बलोपासनेसाठी सुदृढशरीर व ईश्वर उपासनेसाठी आध्यात्मिक ज्ञान एकमेकांना पोषक ठरतात. महाराष्ट्र मंडळाचे विद्यापीठात रूपांतर व्हावे.''

### स्वतःच्या देशात अवहेलना, पण...

पूर्व युरोपातील बेलारुस या देशातील लेखिका स्वेतलाना ॲलेक्सीविच यांना यंदाचे साहित्याचे नोबेल देण्यात आले आहे. ६७ वर्षीच्या स्वेतलाना नोबेल सन्मान मिळवणाऱ्या पहिल्या पत्रकार ठरल्या आहेत. तसेच प्रामुख्याने 'नॉन-फिक्शन' प्रकारचे लेखन करणाऱ्या साहित्यिकाला स्वेतलाना यांच्या रूपाने जवळपास ५० वर्षांनी नोबेल मिळाले आहे.

'गेली ४० वर्षे स्वेतलाना पूर्वाश्रमीच्या सोव्हिएत युनियनमधील नागरिकांचा अभ्यास करत आहेत. त्यांचे लेखनकार्य म्हणजे केवळ इतिहास नव्हे, तर मानवी भावना-स्पंदनांचे अत्यंत काळजीपूर्वक केलेले कोलाज आहे. त्यांनी अवलंबलेल्या या असामान्य पद्धतीमुळे संपूर्ण कालखंड सखोलपणे जाणून घ्यायला मदत होते,' असे गौरवोद्गार नोबेल निवड समितीच्या अध्यक्ष सारा डॅनियस यांनी काढले.

यंदाच्या नोबेलविजेत्या साहित्यिक स्वेतलाना ॲलेक्सीविच यांचे 'बॉइज इन झिंक' हे पुस्तक पहिल्यांदा रशियात प्रकाशित झाले, त्या वेळी त्यावर प्रचंड टीका झाली होती. अत्यंत बदनामीकारक फँटसी, तसेच बेभानपणे केलेले लेखन अशी टिप्पणी त्यावर करण्यात आली होती. त्यांच्या स्वतःच्या देशातही त्यांना छळाला सामोरे जावे लागले होते. त्यांचा फोन टॅप

केला जात होता, तसेच सार्वजनिक ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी त्यांना मनाई होती. २००० पासून १० वर्षांच्या हद्दपारीच्या काळात त्या इटली, फ्रान्स, जर्मनी आणि स्वीडनमध्ये वास्तव्यास होत्या. त्यानंतर त्या पुन्हा मिन्स्क या बेलारुसच्या राजधानीच्या शहरात परतल्या.

युक्रेनमधील इव्हानो-फ्रँकीव्स्क (स्टॅनिस्लाव्ह) या शहरात ३१ मे १९४८ रोजी स्वेतलाना यांचा जन्म झाला. त्यांची आई युक्रेनची, तर वडील बेलारुसचे होते. वडिलांची लष्करातील सेवा पूर्ण झाल्यानंतर हे कुटुंब बेलारुसमध्ये परतले. त्यानंतर १९६७ ते १९७२ या कालावधीत स्वेतलाना यांनी 'युनिव्हर्सिटी ऑफ मिन्स्क'मध्ये पत्रकारितेचे शिक्षण घेतले. ग्रॅज्युएशननंतर त्यांनी बरीच वर्षे पत्रकार म्हणून काम केले.

१९८५मध्ये 'वॉर्स अनवुमनली फेम' हे त्यांचे पहिले पुस्तक प्रसिद्ध झाले. हे पुस्तक दुसऱ्या जागतिक महायुद्धात सहभागी झालेल्या शेकडो महिलांच्या मुलाखतींवर आधारित आहे. त्या पुस्तकाच्या २० लाखांहून अधिक प्रती विकल्या गेल्या आहेत. धैर्याचा सन्मान म्हणून त्यांना स्वीडनमधील प्रतिष्ठेचा 'पेन' पुरस्कारही मिळाला आहे.

'स्वेतलाना यांचे साहित्य म्हणजे आताच्या काळातील दुःख आणि धैर्याचे जणू स्मारकच आहे.' अशा शब्दांत निवड मंडळाने त्यांच्या साहित्याचा गौरव केला आहे. सहा लाख ९१ हजार पौंड रकमेचे हे पारितोषिक आहे.

स्वेतलाना यांनी रशियन भाषेत लेखन केले आहे. 'व्हॉइसेस फ्रॉम चेर्नोबिल : दि ओरल हिस्ट्री ऑफ ए न्यूक्लिअर डिझास्टर' आणि 'बॉइज इन झिंक' ही इंग्रजी भाषेत अनुवाद झालेली त्यांची पुस्तके खूप गाजली. चेर्नोबिल येथे १९८६ मध्ये झालेल्या अणुभट्टी दुर्घटनेनंतर १० वर्षांच्या कालावधीत ५००हून अधिक साक्षीदार, स्थानिक नागरिक, नेते, शास्त्रज्ञ आणि अन्य संबंधित घटकांशी बोलून स्वेतलाना यांनी 'व्हॉइसेस फ्रॉम चेर्नोबिल' हे पुस्तक शब्दबद्ध केले. सोव्हिएत आणि अफगाणिस्तानमधील युद्धासंबंधीचे अनुभव 'बॉइज इन झिंक'मध्ये आहेत.

साहित्याचे नोबेल मिळविणाऱ्या त्या १४ व्या महिला आहेत.

## प्रभाकर जोग यांना लता मंगेशकर पुरस्कार

''पुरस्कार देताना आता भीती वाटू लागली आहे. कारण, 'पुरस्कार

नवं कोरं



# अग्निदिव्य

नेताजी पालकर यांच्या जीवनावरील
ऐतिहासिक कादंबरी

लेखक
कल्याणीरमण बेन्नुरवार

किंमत - ४९५/- रु.।पोस्टेज - ३०/- रु.

हिंदवी स्वराज्याचे सरनोबत नेताजी पालकर यांचे मोगलांना सामील होणे, दुर्दैवाने धर्मांतरित होणे आणि प्रदीर्घ काळानंतर परत येणे; महाराजांनी त्यांना कौल देणे व शुद्ध करवून हिंदू धर्मात परत घेणे वगैरे मराठा इतिहासातील घटना अचानक किंवा दैवदुर्विलासाने घडून आलेल्या दुःखद घटना नाहीत, तर महाराजांनी गनिमी काव्याच्या राजकारणाचा एक भाग म्हणून खेळलेल्या एका धाडसी डावपेचाचा आणि सतत सावध राहून धूर्त, चपळ राजकीय खेळी करणाऱ्या औरंगजेब बादशहामुळे फसलेल्या व अंगलट आलेल्या राजकारणाचा अनिवार्य परिपाक होता, असा श्री. कल्याणीरमण बेन्नुरवार यांचा ठाम विश्वास आहे.

अनेक गुप्त मसलतींचे पुरावे कागदोपत्री नोंदवले जात नाहीत; त्यामुळे त्यांचा धांडोळा कागदपत्रांमध्ये घेणे शक्य नसते. परिस्थितीजन्य संदर्भ, पुसटसे उल्लेख व सूचक सूत्रे यांच्या मदतीने तर्कावर आधारित कल्पनेतून अशा मसलतींचा उलगडा करता येतो. इतिहासाचे लेखक अत्यंत क्लिष्ट व महत्त्वाच्या घटना किंवा प्रदीर्घ कालखंड केवळ एक-दोन वाक्यांमध्ये सांगतात पण त्या प्रसंगामध्ये अनेकांचे अपार कष्ट, भाव-भावना, इतकेच नव्हे तर आयुष्ये गुंतलेली असतात. उपलब्ध तुटपुंज्या साधनांचा वापर आणि तर्क यांच्या आधारावरच त्या रसिकांसमोर मांडता येतात. अशा प्रकारेच वास्तवांचा वेध घेण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला आहे. शिवरायांची स्वराज्यसाधनेवर आणि स्वधर्मावर असलेली अव्यभिचारी निष्ठा, साध्य व साधन याबाबतची स्पष्टता, सहकाऱ्यांबद्दल प्रेम आणि विश्वास यामुळे त्यांचे अनुयायी त्यांच्या इच्छेखातर, शब्दाखातर, एका इशाऱ्यासरशी मती गुंग करणारी अतर्क्य साहसे करून अवघडातील अवघड कामे लीलया पार पाडताना दिसतात. सर्वस्वावर निखारे ठेवण्यास सहज सिद्ध होतात.

वापसी’चे फॅड सुरू झाले आहे. या लोकांच्याही भावना सरकारने समजून घेतल्या पाहिजेत; परंतु पुरस्कार परत करून बदल घडणार नाही. समाजात बदल घडविण्याची ताकद साहित्य आणि कलेत आहे. समाजात वाईट काही घडत असेल, तर तुमच्या अभिव्यक्तीतून परिस्थिती बदला,’’ अशा शब्दांत पुरस्कार परत करणाऱ्यांना शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी टोला लगावला.

सांस्कृतिक कार्य मंत्रालयाने ज्येष्ठ व्हायोलिनवादक प्रभाकर जोग यांना गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्काराने सन्मानित केले. पाच लाख रुपये, मानपत्र, सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. ज्येष्ठ गायिका सुलोचना चव्हाण यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. आमदार योगेश टिळेकर, मंत्रालयाचे उपसचिव संजय भोकरे, संचालक अजय अंबेकर, अवर सचिव शैलेश जाधव व्यासपीठावर उपस्थित होते.

‘मराठी भाषेशी संबंधित बोलीभाषा, लोककला मरू देणार नाही. त्यांचे ‘डिजिटायझेशन’ सुरू आहे,’ असे सांगताना साहित्य संस्कृतीचा ठेवा पुढील पिढीपर्यंत पोचविण्यासाठी कसोशीने प्रयत्न करीन, असे तावडे यांनी स्पष्ट केले. ‘हात नका लावू माझ्या साडीला...’ हे गाणे शांता शेळके यांना हृदयनाथ मंगेशकर यांच्या घरात सुचले. याविषयीचा किस्सा सांगत, ‘‘कलाकारांच्या सादरीकरणापूर्वीचे किस्से, गाण्यांच्या निर्मितीच्या किश्श्यांचे ध्वनिमुद्रण सांस्कृतिक कार्य विभागाने केले पाहिजे; हादेखील संस्कृतीचा ठेवा आहे. तो पुढील पिढीपर्यंत पोचविण्याचे काम मंत्रालय करी,’’ असे तावडे यांनी स्पष्ट केले.

जोग म्हणाले, ‘‘वयाच्या दहाव्या वर्षांपासून अडचणींना तोंड देत संगीताची सेवा केली. सरकारचा पुरस्कार हे त्याचे फळ आहे. हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश करण्यासाठी मुंबईत एका चाळीच्या गॅलरीमध्ये राहिलो. मात्र, या काळात अनेक दिग्गज संगीतकारांबरोबर काम करता आले. याच कलाकारांनी मला मोठे केले. आतापर्यंत जगलेला प्रत्येक क्षण हा अद्वितीय आणि सुगंधी आहे.’’

‘‘पुण्यात पूर्वी महिन्याला पाच-पाच कार्यक्रम केले. पुणेकरांची पावती मिळाल्याशिवाय कलाकाराला नावलौकिक मिळत नाही, याचा अनुभव मला आहे. पुणे हे माझे माहेरघर आहे,’’ अशी भावना सुलोचना चव्हाण यांनी व्यक्त केली. तेरा-चौदा वर्षांची असताना जोग यांची गाणी गायली, असेही त्यांनी सांगितले.

## डॉ. जगन्नाथ वाणी यांचा सन्मान

‘देशातील भ्रष्टाचार, अत्याचार व हिंसाचार समूळ नष्ट होण्याची गरज आहे. यासाठी ध्येयाने प्रेरित होणाऱ्या तरुणांची पिढी निर्माण होण्याची आवश्यकता आहे,’’ अशी अपेक्षा सामाजिक कार्यकर्ते डॉ. प्रकाश आमटे यांनी व्यक्त केली.

जळगाव येथील दीपस्तंभ फाउंडेशनतर्फे आयोजित विशेष कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्ते डॉ. जगन्नाथ वाणी, मंदा आमटे, राज्याच्या माजी अपर मुख्य सचिव लीना मेहेंदळे, यजुर्वेद महाजन, रावसाहेब बडे, अभय केले आदी उपस्थित होते. डॉ. वाणी यांच्या जीवनावर आधारित ‘सातासमुद्रापलीकडे’ या पुस्तकाचे प्रकाशन झाले. हे पुस्तक महाजन आणि सुषमा शितोळे यांनी लिहिले आहे. कार्यक्रमात डॉ. वाणी यांचा सन्मान करण्यात आला. डॉ. वाणी यांची या वेळी मुलाखत घेण्यात आली. सूत्रसंचालन मंजिरी धामणकर यांनी केले.

## डॉ. प्रमोद तलगेरी यांना जर्मनीचा सर्वोच्च सन्मान

भारत आणि जर्मनीमधील नाते आणि दोन्ही देशांमधील सांस्कृतिक दुवा विविध उपक्रमांतून दृढ करणाऱ्या प्रा. डॉ. प्रमोद तलगेरी यांना जर्मनीचे अध्यक्ष ग्वॉकिम गॉक यांच्या हस्ते जर्मनीचा सर्वोच्च सन्मान देण्यात आला. डॉ. तलगेरी हे पुण्यातील इंडिया इंटरनॅशनल मल्टिव्हर्सिटीचे कुलगुरू असून, स्वतः जर्मन भाषेचे तज्ज्ञ आहेत.

## संतधर्म ग्रंथ हेच जीवन ग्रंथ

‘‘आपण इतिहास व धर्मवादामध्ये अधिक रमतो. त्यातून विचारांतील शुद्धतेऐवजी हिंसाचाराला बळकटी मिळते. त्यापेक्षा भविष्याचा वेध घेत, आपापसांतील प्रेमाची भावना वाढायला हवी, त्यामुळे देश एकसंध विचारांचा राहील, जगातही सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण होईल,’’ असे मत मुस्लिम विचारवंत सय्यद रशीद रिझवी यांनी विश्वशांती केंद्र (आळंदी) माईर्स एमआयटी व संत ज्ञानेश्वर-तुकाराम स्मृती व्याख्यानमालेत व्यक्त केले. डॉ. विश्वनाथ कराड, बंगळूर येथील स्टँडर्ड स्कील संस्थेचे संस्थापक सज्जू जैन, डॉ. संजय उपाध्ये, प्राचार्य डॉ. एल. के. क्षीरसागर, डॉ. मिलिंद पांडे, प्रा. गौतम बापट उपस्थित होते.

रिझवी म्हणाले, ''धर्मग्रंथांचा अर्थ समजून घेतल्यास माणसाला जीवनमार्ग सापडेल. पैसा व संपत्तीच्या जोरावर नव्हे, तर दुसऱ्यासाठी जगण्याच्या प्रवृत्तीवरून माणसाचा मोठेपणा ठरतो.''

सज्जू जैन म्हणाले, ''धर्माच्या नावाखाली हिंसाचाराच्या अनेक घटना घडत आहेत; परंतु कोणताही धर्म हिंसाचार शिकवीत नाही. प्रेमभावनेने कुटुंब सुधारले, तर समाज सुधारेल. समाज सुधारला तर नागरिकांमध्ये प्रेमभावना वाढीस लागेल.''

## गिरीश प्रभुणे यांना 'चतुरंग'चा जीवनगौरव

पारधी समाजात चार दशकांहून अधिक काळ कार्य करणाऱ्या गिरीश प्रभुणे यांना 'चतुरंग जीवनगौरव' पुरस्कार देण्यात आला. 'गेटवे ऑफ इंडिया' येथे हा भव्य समारंभ झाला. तीन लाख रुपये व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

''डोंबारी, वडार वगैरे प्रत्येक जाती-जमातीतील लोकांकडे स्वतःची कला, संस्कृती आहे. मात्र या सगळ्या जाती-जमाती नष्ट करून एक नवीन समाज निर्माण करण्याचे खूळ सध्या निघाले आहे. त्यामुळे या आदिम संस्कृतींचा लोप होत आहे. आज एकेका जमातीबरोबरच तिची कलाही नष्ट होत आहे. वैविध्यपूर्ण संस्कृती हीच समाजाची समृद्धी ठरेल,'' असे गिरीश प्रभुणे म्हणाले.

आज महाराष्ट्रातील ४०टक्के लोक गावकुसाबाहेर आहेत. कुणाच्याही खिसगणतीत नसलेला हा समाज आहे. त्यांच्या कौशल्यांना उत्तेजन देऊन त्यांच्यातल्या माणसाला माणूस म्हणून वागणूक दिली पाहिजे, असे कळकळीचे आवाहन प्रभुणे यांनी केले.

ज्या समाजाचे राजकीय स्थान, महत्त्व शून्य आहे, अशा पारधी समाजासाठी गिरीश प्रभुणे यांचे काम कौतुकास्पद आहे, असे न्या. नरेंद्र चपळगावकर म्हणाले. वीणा देव यांनी प्रभुणे यांची ओळख 'कोणत्याही विचारांच्या चौकटीत न बसणारा आणि डोळस कार्यकर्ता,' अशा शब्दांत करून दिली.

## शरद पवार यांना 'कृतज्ञता पुरस्कार'

पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन समितीतर्फे महाराष्ट्राच्या ऑलिंपिक

**नवं कोरं**

# संकरित

लेखक
डॉ. संजय ढोले

किंमत - १९५/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.




विज्ञानकथेत विविधांगी विषय हाताळलेले असून, एखादं विज्ञान, प्रयोग किंवा त्यांचे निष्कर्ष मानवाच्या जेवढ्या भल्यासाठी वापरता येऊ शकतात; तेवढाच त्या विनाशालाही कारणीभूत ठरू शकतात. 'परिवर्तन' ही कथा मूळपेशींवर आधारलेली आहे. 'कोळिष्टक' ही कथा 'स्पायडर फार्मिंग' व त्यांच्या जनुकावर आधारलेली आहे.
'संकरित' ही कथा जनुकांमध्ये हेतुपुरस्सर बदल घडवून आणल्यानंतरचे परिणाम दर्शविते तर 'अस्तित्व'मध्ये वैद्यकशास्त्रात मानवावरील विधायक प्रयोग दाखविलेला आहे. 'उद्ध्वस्त' ही कथा पदार्थाच्या 'दीपन' या गुणधर्मावर असून, 'अखेर तो परतला' ही कथा स्मृतिपटलांवर आधारित आहे. 'सॉकर' ही कथा फुटबॉलच्या रोमांचक खेळावर विज्ञानाच्या दृष्टिकोनातून भाष्य करणारी आहे. 'विचारवहन' हे मानवी मेंदूतील प्रक्षेपित होणाऱ्या क्षीण लहरींवर आधारलेले आहे. शिवाय 'दुर्गम्य' ही कथा भौतिकशास्त्रातील 'टॅनेलिंग इफेक्ट'वर आधारित आहे.

चळवळींसाठी योगदान देणाऱ्यांचा कृतज्ञता पुरस्काराने सन्मान करण्यात आला. अर्नवाझ दमानिया, माजी ऑलिंपियन बाळकृष्ण अकोटकर, आबा महाजन यांचा गौरव करण्यात आला. कृतज्ञता पुरस्कारासाठी निवडलेल्या प्रत्येक व्यक्तीचे क्रीडा क्षेत्रात स्वतंत्र असे स्थान आहे. त्यामुळेच ते या सन्मानाचे हकदार ठरतात. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेला सुवर्णकाळ मिळवून दिला. तसेच पुण्यातच महिला हॉकीचा श्रीगणेशा केलेल्या अर्नवाझ दमानिया यांनी महाराष्ट्र, भारतीय आणि आशियाई महिला हॉकी संघटनेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी पार पाडली. हॉकीचे ॲस्ट्रोटर्फ प्रथम पुण्यात उभारण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची ठरली होती. आंतरराष्ट्रीय महिला हॉकी पंच म्हणूनही त्यांनी काम पाहिले.

वयाच्या ९७व्या वर्षीदेखील तरुणांना लाजवेल असा उत्साह असणारे आबा महाजन यांनी हॉकी संघटनेचे अध्यक्षपद भूषविताना हॉकी तळागाळापर्यंत घेऊन जाण्यासाठी अपार मेहनत घेतली. भारतीय वेटलिफ्टिंग महासंघाचे सरचिटणीस म्हणून काम पाहिलेल्या राज गुलाटी यांनी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पंच म्हणूनही आपली छाप पाडली. 'खो-खो'चा देशात आणि परदेशात प्रसार करण्यासाठी मोलाचे योगदान देणारे मुकुंद आंबर्डेकर, महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेच्या खजिनदारपदाची धुरा सांभाळणारे आणि वॉटर स्पोर्टस रुजविण्यासाठी मेहनत घेणाऱ्या बाळकृष्ण अकोटकर यांनी टोकियो ऑलिंपिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले. ॲथलेटिक्स मार्गदर्शक राम भागवत यांचाही या वेळी सन्मान करण्यात आला.

## डॉ. प्रशांत देशमुख यांना ४७ लाख रुपयांचा संशोधननिधी

कर्करोगाचे निदान व उपचार यादरम्यान होणारा कालापव्यय, उपचारपद्धतीचे दुष्परिणाम या कर्करोगग्रस्त रुग्णांसमोरच्या प्रमुख समस्या आहेत. त्यावर अतिसूक्ष्म तंत्रज्ञानाद्वारे तयार केलेली औषधी प्रभावीपणे उपयोगात आणली जाऊ शकते. या संदर्भातील संशोधन करणाऱ्या एच. आर. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्चमधील विभागप्रमुख डॉ. प्रशांत देशमुख यांना केंद्र शासनाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाकडून 'नॅनो मिशन' अंतर्गत ४७ लाख रुपयांचा संशोधन निधी देण्यात आला आहे.

या निधीमधून महाविद्यालयात अत्याधुनिक उपकरणांनी युक्त अशी

अतिसूक्ष्म तंत्रज्ञान प्रयोगशाळा साकारली जात आहे. कर्करोगाचे निदान करण्यासाठी विविध पद्धतींचा अवलंब केला जातो. कर्करोगाचे स्वरूप निश्चित होईपर्यंत उपचाराचा महत्त्वपूर्ण कालावधी खर्ची पडतो. त्याचा परिणाम उपचाराच्या प्रभावावर होतो. कर्करोगाच्या उपचारासाठी सध्या केमोथेरपी ही पद्धत वापरली जाते. केमोथेरपीमुळे कर्करोगाच्या पेशी नष्ट होतात; मात्र त्यासोबतच सामान्य पेशीही क्षतिग्रस्त होऊन नष्ट होतात. परिणामी रुग्णांना इतर त्रासाला सामोरे जावे लागून ते उपचाराला कंटाळतात.

डॉ. देशमुख कर्करोगावर संशोधन करीत असून, अतिसूक्ष्म तंत्रज्ञानाच्या साह्याने औषधी विकसित करीत आहेत. ही औषधी केवळ कर्करोगाच्या पेशींवरच परिणाम करेल. तिचा सामान्य पेशींवर कोणताच अनिष्ट परिणाम होणार नाही. संशोधन निधीतून डॉ. देशमुख विकसित करीत असलेली उपचारपद्धती ही चुंबकीय तत्त्वावर आधारित आहे. त्यामुळे कर्करोगाचे निदान व उपचार एकाच वेळी करणे शक्य होणार आहे. कर्करोगाच्या रुग्णांसाठी हा आशेचा किरण ठरणार आहे.

## अमृता शेरगिल यांच्या चित्राला १६ लाख पौंड

आधुनिक भारतीय शैलीतील चित्रकर्ती अमृता शेरगिल यांच्या दुर्मिळ व्यक्तिचित्राला १७ लाख पौंड अशी विक्रमी किंमत मिळाली आहे. लंडनमधील लिलावात शेरगिल यांच्यासह राजेंद्रनाथ टागोर, प्रदोषदास गुप्ता, गीव्ह पटेल आणि नसरील मोहम्मदी या भारतीय चित्रकारांच्या कलाकृतींनाही मोठी किंमत मिळाली आहे.

शेरगिल यांनी काढलेले स्वव्यक्तिचित्र १९३१मधील आहे. त्या विसाव्या शतकातील महत्त्वाच्या भारतीय चित्रकार समजल्या जातात. अत्यंत अल्प आयुष्यात (वयाच्या २८व्या वर्षी मृत्यू) शेरगिल यांनी भारतीय संस्कृतीशी संबंधित अनेक कलाकृती रेखाटल्या. त्यांच्या साहसी आणि बंडखोर स्वभावाचे प्रतिबिंब त्यांच्या कलाकृतींतही दिसते.

## नारायण विद्वांस यांना पटवर्धन पुरस्कार

वैद्य खडीवाले वैद्यक संशोधन संस्थेतर्फे यंदाचा ‘महर्षी अण्णासाहेब पटवर्धन वैद्यकीय पुरस्कार’ वैद्य नारायण विद्वांस यांना देण्यात आला. ३१ हजार रुपये रोख, मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

अन्य पुरस्कारांसाठी वैद्य ज्योती मुंदर्गी, शिशिर पांडे, देवदत्त देशमुख, शैलेश माळी, घनश्याम कोडवानी, अरुण लखपती, सरोज पाटील, मोहन जोशी, सुश्मिता धोपेश्वरकर, रवींद्र गुंडलवार, अशोक साधले, आर. बी. गिरी आदींची निवड झाली आहे.

## संशोधक डॉ. श्रीकांत बहुलकर यांना अकादमीचा पुरस्कार

संस्कृत भाषा-वाङ्मय आणि बौद्ध संस्कृत तत्त्वज्ञानाचे ज्येष्ठ अभ्यासक व भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेचे मानद सचिव डॉ. श्रीकांत बहुलकर यांना साहित्य उकादमीचा 'भाषा सन्मान' पुरस्कार जाहीर झाला आहे. एक लाख रुपये आणि मानपत्र, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. वैदिक संस्कृत, अभिजात संस्कृत, बौद्ध संस्कृत (तंत्र मार्ग) या कार्यक्षेत्रातील भाषाविषयक योगदानासाठी बहुलकर यांची निवड करण्यात आली आहे.

या पुरस्कारासाठी मी अर्ज केला नव्हता, तसेच मला विचारणाही झाली नव्हती. माझ्या कामाची दखल घेऊन त्यांनी आपणहून पुरस्कार दिला आहे, याबद्दल साहित्य अकादमीच्या निवड समितीला धन्यवाद द्यायला हवेत, असे डॉ. बहुलकर म्हणाले.

गेली ४० वर्षे ते वैदिक ते आधुनिक संस्कृत यासाठी काम करीत आहेत. इ.स.पूर्व पाचवे शतक ते इ.स. पाचवे शतक अशा सुमारे एक हजार वर्षांच्या कालखंडातील बौद्ध संस्कृत वाङ्मयाचा अभ्यास सुरू आहे. या कालखंडाचा आणि त्या काळच्या भाषेचा अभ्यास ही खूप अवघड प्रक्रिया आहे.

बौद्ध संस्कृत हा विषय भारतामध्ये उपेक्षित राहिला आहे. बौद्ध धर्माची वचने संस्कृतमध्ये आहेत. पाली मिश्रित संस्कृत असे तिला म्हणता येईल.

काही प्रयत्न झाले आहेत. त्यातून अनेक अप्रकाशित ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत. मोठ्या प्रमाणावर संशोधनाची गरज आहे. पण भारतात संशोधनाला उतरती कळा लागली आहे. संशोधक घडवावे लागतात. ती प्रक्रिया सुरू आहे. पण यासाठी संस्कृत व तिबेटी भाषेचा अभ्यास हवा. लोक उत्सुक दिसून येत नाहीत. बौद्ध संस्कृत वाङ्मयाचा अभ्यास करणारे देशात हाताच्या बोटावर मोजण्याएवढे उरले आहेत. हे काम सोपे नाही. वर्षानुवर्षे त्यासाठी खर्ची घालावी लागतात.

नवं कोरं

# एकाकी बंड

मूळ लेखक
कॅथरीन बोल्कोव्हॅक आणि कॅरी लीन

अनुवाद
सिंधू जोशी


किंमत - २५०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.




नेब्रास्कातील पोलीस अधिकारी आणि मुलांची घटस्फोटित माता कॅथरीन बोल्कोव्हॅक खासगी लष्करी कंत्राटदार डीनकॉर्प इंटरनॅशनल या कंपनीची नोकरभरतीची जाहिरात बघते, अर्ज करते आणि भरती होते. चांगली कमाई, जगभर प्रवास आणि युद्धामुळे छिन्नभिन्न झालेल्या देशाची पुनर्बांधणी करण्याची कामगिरी म्हणजे तिच्यासाठी उत्कृष्ट संधी असते.

लवकरच ती बोस्नियात पोहोचते. युनोच्या शांतता प्रस्थापित करण्याच्या कामगिरीत मदत करण्यासाठी डीनकॉर्पला कंत्राट दिले जाते. तिच्याकडे मानवी हक्क अन्वेषक आणि लिंगविषयक विभागाची प्रमुख म्हणून काम सोपवण्यात येते. योग्य असे प्रशिक्षण दिले गेले नसल्याने तिच्या मनात धोक्याची घंटा वाजू लागते; परंतु साराजेव्होत आल्यानंतर तिला कल्पना नव्हती, इतक्या वाईट गोष्टींचा ती छडा लावते. जीव धोक्यात घालून कॅथी अत्यंत घृणास्पद गोष्टींचा शोध घेऊ लागते. खासगी भाडोत्री सैनिकांच्या कंत्राटदाराबरोबर, युनो व अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याबरोबर साटेलोटे असणाऱ्या मानवी व्यापारात गुंतलेल्या महिलांना जबरदस्तीने वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडणाऱ्या अधिकाऱ्यांची बिंगे ती फोडते. लवकरच तिची पदावनती करून तिला नोकरीवरून बडतर्फ केले जाते. जीवे मारले जाण्याच्या भीतीने ती बोस्निया सोडते. गोळा केलेले सर्व पुरावे सतत जवळ बाळगून ठेवल्यामुळे डीनकॉर्पविरुद्ध दाखल केलेला खटला ती जिंकते. डीनकॉर्पची काळी कृत्ये उजेडात आणण्यात यशस्वी होते.



# पारखा

**मूळ लेखक**
**एस. एल. भैरप्पा**

भैरप्पा यांनी तेरा वर्षांच्या लहान वयातच स्वातंत्र्यचळवळीत भाग घेतला होता. प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर उर्वरित शिक्षणासाठी मैसूर येथे जाण्याआधी त्यांच्या शालेय शिक्षणात खंड पडला, असे त्यांच्या ‘भित्ती’ या आत्मचरित्रात नमूद केले आहे. भैरप्पांनी भावाच्या सांगण्यावरून शाळा सोडली आणि त्याच्याबरोबर एक वर्षभर भ्रमंती केली. या भ्रमंतीत काही काळ मुंबई येथे ‘रेल्वे पोर्टर’ म्हणून काम केल्यावर, ते काही साधूंबरोबर आध्यात्मिक शांतीच्या शोधात फिरून पुढील शिक्षणासाठी मैसूरला परत आले. महाराजा सयाजीराव बडोदा विद्यापीठातून त्यांनी तत्त्वज्ञान विषयातील डॉक्टरेट मिळवली. हुबळी महाविद्यालय, सरदार पटेल विद्यापीठ, दिल्लीतील एनसीइआरटी अशा ठिकाणी प्राध्यापक म्हणून काम केले. मैसूरमधील ‘रिजनल कॉलेज ऑफ एज्युकेशन’ इथून ते १९९१ मध्ये निवृत्त झाले.

भैरप्पा यांनी १९५८ मध्ये कादंबरीलेखनास सुरुवात केली. १९६२ मध्ये त्यांची ‘वंशवृक्ष’ ही कादंबरी प्रसिद्ध झाली. तेव्हापासून ते लेखन करत आहेत. सर्वाधिक विक्री झालेल्या २२ कादंबऱ्यांचे ते लोकप्रिय लेखक

आहेत. ‘आवरण’च्या चार वर्षांत ३४ आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या. हा भारतीय कादंबरी विश्वातला विक्रम मानला जातो.

१९८७ मध्ये ‘वंशवृक्ष’चा मराठी अनुवाद प्रसिद्ध झाला. त्यानंतर मराठीतही ते लोकप्रिय झाले.

आजवर त्यांच्या १२ कादंबऱ्या मराठीत उपलब्ध आहेत. मराठीबरोबरच हिंदी, संस्कृत, इंग्रजी आणि इतर सर्व भारतीय भाषांमध्ये त्यांच्या कादंबऱ्या मोठ्या प्रमाणावर अनुवादित झाल्या आहेत.

**भैरप्पा यांना मिळालेले पुरस्कार –**

१९६६ : कन्नड साहित्य अकादमी पुरस्कार,

१९७५ : साहित्य अकादमी पुरस्कार,

२००५ : पंपा पुरस्कार,

२००७ : एनटीआर नॅशनल लिटररी ॲवॉर्ड,


कनकपूर येथे १९९९ मध्ये झालेल्या कन्नड साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद

२००७ मध्ये त्यांना गुलबर्गा विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट

२०११ मध्ये त्यांना ‘के. के. बिर्ला फाउंडेशन’तर्फे ‘मंद्र’ या पुस्तकासाठी

‘२०वा सरस्वती सन्मान’ पुरस्कार

कोलकाता येथील ‘भारतीय भाषा परिषदेचा’ पुरस्कार





**अनुवाद**

## उमा कुलकर्णी

ललित साहित्याची आवड असणाऱ्या सौ. उमा कुलकर्णी मराठी साहित्यक्षेत्रात विचक्षण अनुवादक म्हणून प्रसिद्ध आहेत.

त्यांचा जन्म बेळगाव येथे २ ऑक्टोबर १९५० रोजी झाला व शालेय तसेच महाविद्यालयीन शिक्षण बेळगावमध्ये झाल्यावर त्यांनी एस.एन.डी.टी. पुणे येथे पदव्युत्तर शिक्षण घेतले. १९८२मध्ये डॉ. शिवराम कारंत यांचे 'तनामनाच्या भोवऱ्यात' हे त्यांचे पहिले अनुवादित पुस्तक प्रकाशित झाले. प्रसिद्ध कन्नड लेखक डॉ. एस्. एल्. भैरप्पा यांच्या 'वंशवृक्ष' या कादंबरीचा त्यांनी अनुवाद केल्यानंतर त्या आणि भैरप्पा हे एक समीकरणच तयार झाले. त्यांनी भैरप्पा यांचे 'पर्व', 'मंद्र', 'जा ओलांडुनी', 'काठ', 'परिशोध', 'तंतू' आदी साहित्य अनुवादित केले आहे. भैरप्पा यांचे इतरही साहित्य त्या अनुवादित करत आहेत. याशिवाय त्यांनी पूर्णचंद्र तेजस्वी यांचे 'गूढ माणसं', 'चिदंबर रहस्य', 'मायामृग' इत्यादी, तर गिरीश कार्नाड यांचे 'नागमंडल', 'तेलदण्ड' आदी साहित्य अनुवादित केले आहे. कुलकर्णी यांना १९८९ मध्ये केंद्र साहित्य अकादमीचा पहिला अनुवाद पुरस्कार, १९९० मध्ये 'महाराष्ट्रगौरव पुरस्कार' ('वंशवृक्ष'साठी), 'स. ह. मोडक पुरस्कार' ('पर्व'साठी), पुणे ग्रंथालयाचा 'वर्धापन पुरस्कार' असे पुरस्कार मिळाले आहेत. अनुवाद कार्यासाठी त्यांना १९९७ मध्ये 'महाराष्ट्र फाउंडेशन'चा विशेष पुरस्कार, तर १९९९ मध्ये 'स. ह. मोडक पुरस्कार' मिळाला आहे. मराठी व कन्नड समाजातले साहित्यिक-सामाजिक बंधुत्व वाढवल्याबद्दल १९९५ मध्ये 'वरदराज आद्य पुरस्कार' मिळाला आहे.

# पुट्ट काळिंगा परदेशी मुलीशी लग्न करून, तिच्यासह कर्नाटकातील आपल्या गावी परत येतो तेव्हा...

अग्रहारातल्या शाळेत चार वर्षं काढल्यानंतर इंग्लिश शिकण्यासाठी पुट्ट काळिंगाला तालुक्याच्या गावी पाठवायचा सल्ला जोईसांनी दिला. पण एकुलत्या एक नातवाला तिथं पाठवायचा विचार गौडाला अजिबात पटला नाही. काय करायचंय याला इंग्लिश शिकून? अग्रहाराच्या शाळेत शिकल्यामुळे नातू आता 'नळ चरित्र' वाचू शकतोय. जैमिनी भारत तेवढं राहिलंय. तेवढं कुणाकडून तरी शिकवलं तर आणखी काय शिकायचं राहिलं? पण जोईसांनीच आग्रह केला, 'ते असू दे. पण आजच्या काळाच्या गरजेनुसार थोडं इंग्लिश आलं म्हणून काय बिघडलं?'

जोईसांचा मुलगा वेंकटरमणा पुट्ट काळिंगापेक्षा तीन वर्षांनी मोठा. तो तालुक्याच्या गावी तिसऱ्या वर्गात इंग्लिश शिकत होता. एव्हाना त्याची मुंज झाली होती. वडिलांकडून काही प्रमाणात वेदपाठही तो शिकला होता. जेवणासाठी भिक्षान्न मागून तो तिथल्या नरसिंहदेवाच्या देवळाच्या ओसरीवर मुक्काम करून होता. दरवाजाची व्यवस्था असलेल्या त्या ओसरीवर आणखी चार-सहा ब्राह्मण मुलंही राहायची. त्यांच्याबरोबर तो देवळात सकाळ-संध्याकाळी चालणाऱ्या संस्कृत पाठाचाही फायदा घ्यायचा. डोक्याच्या पुढच्या भागाचं क्षौर करून मागच्या जाड केसांची घट्ट गाठ बांधून, कपाळावर गोपीचंदन लावून डाव्या काखेत पांढरी झोळी लटकवून उजव्या हातात सारासाठी एक भांडं घेऊन तो भिक्षेसाठी निघाला, की मागच्या काळातल्या ऋषीकुमारासारखा दिसायचा.

जोईसांनी गौडाज्ज्याला सांगितलं, ‘हे बघ, तुझ्या मुलालाही तिथं पाठव. अलीकडे तिथं ओक्कलिग मुलांसाठीही वेगळं हॉस्टेल सुरू केलंय म्हणे. वर्षाला दोन पायली नाचणी, दोन शेर पावटे, पन्नास शेर तांदूळ आणि वर पंचवीस रुपये दिले की दोन्ही वेळेला चांगलं जेवण देतात तिथं! आमचा वेंकटरमणाही आहेच अडीनडीला! इथं जसा अडलेलं शिकवत होता, तसा तिथंही शिकवेल. तू काही विचार करू नकोस.’

मग मात्र गौडा नातवाला तालुक्याच्या गावी जाऊन तिथल्या माध्यमिक शाळेत घालून आला. तालुका म्हणजे काही साधीसुधी जागा नाही! अंमलदारांची कचेरी असलेली जागा! आधीचे अंमलदार आता निवृत्त होऊन आपल्या गावी श्रीरंगपट्टणला गेले होते. स्वतः गौडानं बैलगाडी जुंपली आणि नाचणी-पावटे-तांदूळ नेऊन नातवाची सारी व्यवस्था लावून आला.

आता गौडाला एकच चिंता राहिली होती. पुण्यकोटी ज्या स्थळी वाघाच्या तोंडी जाण्यासाठी गेली होती, त्या गुहेच्या तोंडाशी एक देऊळ बांधून त्याच्या समोर एक पुष्करणी बांधायला पाहिजे. पण यामध्ये शिवलिंगाचारी दुसऱ्या एका देवळाचं काम अंगावर घेऊन नंजनगुडच्या भागात निघून गेला होता. जाताना सांगून गेला होता, ‘कशाला काळजी करतासा? मी सांगितले तसले दगड आणून ठेव. बाकी सगळं मी बघून घेईन.’ तरीही तो स्वतः समोर येऊन उभा राहीपर्यंत गौडाला त्याची खात्री वाटत नव्हती.

पुट्ट काळिंग चांगल्या प्रकारे इंग्लिश शिकत होता. वेंकटरमणा अडलेल्या जागी मदत करत असल्यामुळे दुसऱ्या शिक्षकाची शिकवणी ठेवायची गरज नव्हती. नातवाची प्रगती बघून गौडाला कौतुकाबरोबरच अभिमानही वाटत होता. इंग्लिश म्हणजे काय चेष्टा आहे? अंमलदारी करायची असेल तर इंग्लिश यावं लागतं, म्हणतात! म्हणजे, कदाचित आमचा पुट्टाही उद्या अंमलदार होऊ शकेल. त्याहूनही मोठा साहेब होऊ शकेल. म्हणजे कुणीही गायरानाला हातही लावू शकणार नाही. भूमातेचा चारा केवळ गोमातेलाच मिळण्याचा काळही येईल तेव्हा!..गौडाचं अनेकदा स्वप्नरंजन चाले.

या स्वप्नरंजनामागेही एक कारण होतं. गायरान लागवडीखाली आणल्यानंतर गवताचे भाव आकाशाला भिडले होते. तो लहान असताना

त्या परिसरात कुणीही गवत विकायचं नाही. नंतर विकायला सुरुवात केली, तरी भाऱ्याला दोन रुपये दर होता. आता नाचणीचा चारा तर दहा-बारा रुपये झाला होता. गवताचे भाव वाढल्यामुळे शहरात दुधा-तुपाचे भावही वाढले होते. हे उत्तम झालंय! गायरान ठेवायला नको म्हणतात नाही काय! हीच माणसं तसा कायदा करा म्हणणारी. यांना खायला लोणीच मिळता कामा नये.

पुट्टा इंग्लिश शिकायला लागून दोन वर्षं झाली. आता तो काही इंग्लिश शब्द आज्ज्यापुढे बोलून दाखवत होता. काळिंगगौडाला कौतुकाचं भरतं यायचं. अंमलदार म्हणजे आणखी काय!

वेंकटरमणाची माध्यमिक शाळा संपून तो आता पुढच्या शिक्षणासाठी मैसूरला गेला होता. तिथल्या संस्कृत पाठशाळेत त्याचं वेदाध्ययन सुरू होतं. तिथं तो जोतिषशास्त्र आणि पौरोहित्य शिकत होता. शिवाय हायस्कूलचं शिक्षणही सुरू होतं. तो संस्कृत शिकत असल्यामुळे महाराजांच्या धर्मशाळेत त्याला फुकट जेवण मिळायचं.

आता पुट्टा तालुक्याच्या गावी चांगलाच रुळला होता. तो एकटा गावात कुठंही फिरू शकत होता. आजीनं कढवून दिलेली तुपाची बरणी तो सतत बाळगत असल्यामुळे दररोज जेवताना स्वतःच्या पानावर तो दोन चमचे तूप वाढून घेत होता. गावी आला, की तो स्वतः गाई हाकत चरायला घेऊन जायचा. आज्ज्याशी गप्पा मारत बसायचा. आजीशी गप्पा मारायचा. गडीमाणसांशीही बोलायचा. पण आईशी मात्र अजिबात बोलायचा नाही. तिच्या जवळही फिरकायचा नाही.

ही गोष्ट तायव्वाच्या मनाला फार लागायची. मुलगा आला की ती मोठ्या प्रेमानं त्याच्या शेजारी जाऊन उभी राहायची. तो मात्र तिची अजिबात दखल घ्यायचा नाही; मग तिच्या डोळ्यांत पाणी उभं राहायचं. हे बघून लक्ष्मम्मानं तिला कारण विचारलं, तेव्हा तिनं खुणेनं आपलं दुःख सांगितलं. तिनं ते गौडाच्या कानावर घातलं. गौडानं आधी 'पोरकटपणा!' म्हणून दुर्लक्ष केलं, तरी पुढच्या खेपेला मात्र तो म्हणाला, 'काय रे पोरा! घरी आल्यावर तुझ्या आईसंगं का नाही बोलत?'

'आज्ज्या! तिच्याबरोबर कसं बोलायचं?'

'कसं म्हणजे? आमच्यासंगं कसा बोलतोस? तसंच!'

'तू बोलतोस म्हणून मी बोलतो. पण मुक्याबरोबर कसं बोलायचं?'

गौडा निरुत्तर झाला. तो तसाच गुरं चारायला गेला. मनातला प्रश्न तसाच घोळत होता. मध्येच गुरं जवळच्या शेतात शिरायला लागली. ते पाहताच तो ओरडला, 'ए! कुठाय ध्यान?....'

हे ऐकताच गाई पुन्हा आपल्या जागी परतल्या. त्यातली एक गाय त्याच्या जवळ आली आणि त्याच्या डोक्यावर आपली मान घासू लागली. त्याच्याकडून मान खाजवून घ्यायची तिची रोजची सवय होती. तोही उद्गारला, 'अरेच्चा! विसरलो होतो की! तूच आलीस होय आठवण करून द्यायला!' दुसरीचीही मान खाजवून दिल्यावर त्या दोन्ही गाई त्याची पाठ चाटू लागल्या. त्या दोघींच्या माना खाजवत तो त्या दोघींशी गप्पा मारू लागला.

त्याला एकाएकी नंदीबैलवाल्या कोलेबसवाच्या राम-सीतेची आठवण झाली. ती दोघं किती छान बोलताता! रामदेवांना 'सीतम्मादेवींशी लग्न करणार काय?' म्हणून विचारलं तर छानपैकी मान हलवतो. पोपटांना जीभ नसते असं कोण तो शहाणा म्हणतो?...

सकाळपासून छळणाऱ्या प्रश्नाला आता उत्तर मिळालं होतं! त्याची सून तायव्वा मुकी असेलही; पण ती घरी आल्यापासून सगळे तिच्याशी बोलतात! तीही सगळ्यांशी बोलते. बोलायला जीभच पाहिजे, असं कुठं आहे? आपल्या पुट्टूला एवढंही कसं समजत नाही? इंग्लिश शाळेला जाणाऱ्या मुलाला एवढंही समजत नाही की काय?

गाईंशी बोलता बोलता त्याचे विचार सुरूच होते.

गाई त्याच्याबरोबर बोलायच्या. सून तायव्वाही त्याच्याशी बोलायची. ती मुकी आहे हे त्याच्या डोक्यातही कधी यायचं नाही. आता या नातवानं ही गोष्ट आपल्याला सांगून द्यायची काय?

त्या दिवशी संध्याकाळी घरी गेल्यावर त्यानं नातवाला जवळ बसवून विचारलं, 'पुट्टा, तुझ्या आईला मुकी म्हणतोस! मी नाही काय तिच्याशी बोलत?'

'तू बोलतोस. पण ती उत्तर देते काय?'

'मला तर देते बाबा! तुझ्या आजीपेक्षा तिची बुद्धी जास्त तरतरीत आहे! मला तिचं सगळं बोलणं समजतं!'

यावर पुट्ट काळिंगा काहीच बोलला नाही. आज्जाच म्हणाला, 'तिला मुकी म्हणू नकोस. तुझा बाप होता, तोही कधी तिला तसं म्हणाला नाही. तो तिच्यासंगं भरपूर गप्पा मारायचा. तीही बोलायची. तिला तिच्या नवऱ्यानं

**नवं कोरं**

# सूत्रे प्रभाव पाडण्याची




मूळ लेखक
डॉ. रॉब युंग

अनुवाद
सुदर्शन आठवले

किंमत - ३५०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.

मित्रांना जिंकून घ्यायला, लोकांवर प्रभाव पाडून त्यांचे मनपरिवर्तन करायला देहबोलीचा वापर नेमका कसा करायचा? ग्राहकांना खरेदीचे खूप पर्याय दिले तर प्रत्यक्ष खरेदीची शक्यता कमी का होते? मन वळवण्यासाठी ५० रुपयांपेक्षा १० रुपये कसे परिणामकारक ठरू शकतात?

काही लोक दुसऱ्यांवर सहज प्रभाव पाडू शकतात; त्यांचे मन सहजी वळवू शकतात. खरेतर ते पाळत असलेले नियम, वापर करत असलेली तंत्रे; कोणालाही आत्मसात करता येणारी असतात. या पुस्तकात शास्त्रीय संशोधनाच्या ज्ञानसागराचे मंथन करून त्यातील कपोलकल्पित कथा बाजूला काढून ‘खऱ्या सत्या’चे अमृत आपल्यासमोर सहजसोप्या शब्दांत ठेवले आहे.
हे पुस्तक लोकांचा विश्वास संपादन करून त्यांना लीलया कसे जिंकायचे याचे रहस्य सांगून थांबत नाही, तर आपल्याला अपेक्षित असणारी नोकरीतील बढती, उद्योगधंद्यातील-व्यवसायातील मोठी व महत्त्वाची कामे कशी मिळवायची, आपल्याला हवे ते, नीतिमत्तेची कास न सोडता पदरात कसे पाडून घ्यायचे, याबद्दलची हमखास यशस्वी होणारी आणि अनुभवाने सिद्ध झालेली तंत्रे शिकवते.

मुकी मानलं नाही, सासू-सासऱ्यानं मानलं नाही. तिच्या पोटी जन्मलास! तुला ती मुकी वाटते?'

यावर काय बोलायचं ते न सुचून नातू गप्प बसला.

'बावळट कुठचा! येवढासा आहेस तू! तुला या सगळ्या गोष्टी कुठून समजायला! जन्म देणारी माय आणि गोमाता, दोघीही सारख्याच. गोमातेला तरी कुठं बोलायला येतंय? समजलं? तुझी आई तेवढीच मुकी नाही!' आपण नेमकं काय सांगतोय, त्याचा पूर्ण अर्थ गौडज्जालाही समजत नव्हता.

असं त्याला कितीतरी वेळा व्हायचं. तो आपला बोलत राहायचा. नंतर स्वतःच त्याचा अर्थ काय, म्हणून विचार करत राहायचा. आता त्याच्या नातवालाही त्याचा अर्थ समजल्याचं काहीही लक्षण त्याच्या चेहऱ्यावर दिसत नव्हतं.

पुट्ट काळिंगनं आता माध्यमिक शाळेतली पाच रुपये देऊन द्यायची परीक्षाही दिली होती. आपणही आता वेंकटरमणासारखं मैसूरला जाऊन पुढं शिकायची त्याच्या मनात इच्छा होती. पण त्याच्या आज्जानं मात्र पुढचं शिक्षण घ्यायला नकार दिला. दुसरा विचार न सुचल्यामुळे पुट्ट काळिंग अग्रहाराकडे धावला. त्यानं जोईसांसमोर आपलं मन व्यक्त केलं. जोईसही गौडज्जाच्या घरी गेले. तेव्हा आज्जा म्हणाला, 'भाऊ! मी काय दिवसेंदिवस लहान होणाराय? माजी साठी उलटून दोन वर्सं झाली आता! गड्यांसंगं मी आणखी किती दिवस असाच राबत राहू? याला पुढं शिकून अंमलदार कशाला व्हायचंय? उगाच आपला गोठा राखून राहिला तरी खूप झालं!'

पुट्टानं डोळ्यांत पाणी आणलं. जोईसांनी पुन्हा त्याची शिफारस केली. वर सांगितलं, 'शिकणाऱ्या मुलांना शिकायला दिलं नाही तर सरस्वती रागावते...' हे मात्र गौडज्जाला पटलं. त्यांनी पुढं सांगितलं, 'मैसूरमध्ये वेंकटरमणाही आहे. यंदा त्याचं शेवटचं वर्ष. तो पुट्टाकडे लक्ष देईल. वक्कलिग हॉस्टेलवर पुट्टाची बाकीची व्यवस्था होईल...'

दिवसभर नाना प्रकारे समजावल्यावर गौडज्जानं मान्य केलं.

पुट्टा मैसूरला जायला निघाला. निघताना त्यानं तायव्वालाही, 'जाऊन येतो...' असं सांगून निरोप घेतला. तो आपल्याशी बोलला याचाच तायव्वाला कितीतरी आनंद झाला.

मैसूरला गेल्यानंतर तो नवरात्रीच्या सुट्टीतही गावी आला नाही. मैसूरची दसऱ्याची मिरवणूक बघायला गेल्यावर तो कसा गावाकडे येणार? एकेक वय असतं!... गौडज्जानं स्वतःची समजूत काढली.

उन्हाळ्याच्या दिवसांत तो सुट्टीवर गावी आला तेव्हा त्याचा सगळा अवतारच बदलला होता. तालुक्याच्या गावी राहिल्यामुळे त्याचा चेहरा तरतरीत दिसत होता. सगळं सोडून दिल्याचा भाव त्याच्या चेहऱ्यावर दिसू लागला होता.

आज्जानं त्याला विचारलं, 'इस्कूलात काय शिकवतात रे? तू कधी जैमिनी भारत वाचणार?'

'तिकडं काही जेमिनी भारत शिकवत नाहीत! आग कशी पेटते, हवेत काय-काय आहे, प्राणी कसे उत्पन्न झाले, कुठल्या-कुठल्या देशाचे लोक कसे असतात, हे सगळं शिकवतात!...'

'अरेच्चा! ते सगळं घेऊन तुला काय रं करायचं? जैमिनी भारत वाचायलाच येनार नसंल तर काय करायचंय तुजं शिक्षण? जोईसांचा वेंकटरमणा संस्कृत शिकतोय म्हणं! रामायण-महाभारत संस्कृतमध्ये वाचतोय म्हणं! ते सगळं तू केव्हा शिकनार?'

'तो जोईसांचा मुलगा! त्याला ते सगळं आलंच पाहिजे. मी काय करू ते सगळं शिकून? मी सायन्स शिकतोय'

'म्हणजे काय रे?'

'सांगितलं नाही काय? आग कशी पेटते...'

'चकमकीचे दगड घासले की आग पेटते. हे शिकायला शाळेत कशाला जायला पायजे?'

पुट्टा यावर काही बोलला नाही. तो विषय तिथंच थांबला.

पुट्टा चौदा वर्षांचा झाला होता. खरं तर आता याचं लग्न करायचं होतं. याचा बाप कृष्णा तर दहाव्या वर्षीच सगळी गुरं गावाबाहेरच्या पठारावर चरायला घेऊन जायचा. तेव्हा गावाबाहेरच्या कपारीत काही वेळा तरसं यायची. कृष्णा गेल्यानंतर त्यातलं एकही या भागात फिरकलं नव्हतं.

पण पुट्टा मैसूरला जाऊन आल्यावर एकदाही आपणहोऊन गुरं चरायला घेऊन गेला नव्हता. एकदा गौडज्जानं घेऊन जायला सांगितलं तेव्हा तो म्हणाला, 'मला तिकडं कंटाळा येतो. तिकडं कोण संध्याकाळपर्यंत एकटाच

राहणार? तिकडं कुणीही नसतं.'

'अरेच्चा! सोबत कशाला कोण पाहिजे? गुरं नसतात काय!'

'गुरं असली तर सोबत कशी होईल? गुरं काय माणसं असतात?'

गौडज्जाला लगेच उत्तर सुचलं नाही. अनुभवात खोलवर मुरलेल्या सत्याविषयी कुणी प्रश्न उपस्थित केला तर लगेच कसं उत्तर देणार? त्यात गौडज्जाला तर ते आणखी कठीण होतं. त्यानं वेगळ्या पद्धतीनं नातवाला समजावलं, 'कंटाळा आलाच तर तू स्वतःपुरता पावा वाजवायचा.'

'मला नाही वाजवता येत! आणि मला ते आवडतही नाही!'

काळिंगगौडाला हे ऐकून वाईट वाटलं. तो म्हणाला, 'बिघडलास लेकरा तू! गवळी आहेस आणि पावा वाजवायला येत नाही? वर आवडत नाही, म्हणतोस? काय समजतोस स्वतःला? सगळं विसरून गाईंसाठी पावा वाजवणाऱ्या गोपालाला मुक्ती मिळेल, असं स्वतः कृष्ण परमात्म्यानं सांगितलंय, तेही विसरलास?'

हे ऐकून तर हायस्कूलमध्ये शिकणाऱ्या नातवाला हसूच फुटलं. त्यानं सांगितलं, 'मी म्हैसूरला, वेंकटरमणाला भेटायला जात असतो ना, तेव्हा काही वेळा तो सुरात मंत्र म्हणत असतो. हे काय म्हणून विचारलं तर तो सांगतो, हे वेद आहेत! त्यांचा अर्थ समजून व्यवस्थित म्हटले, तर मुक्ती मिळते म्हणतोय तो! आणि तू म्हणतोस, नुसता पावा वाजवला तर मुक्ती मिळते! यातलं काय खरं? की दोन्ही खोटंच?'

'अरे, काय म्हणतोस तू? मूर्ख! वेंकटरमणाच्या जातीसाठी त्यानं सांगितलं ते खरं आणि आपल्या जातीसाठी पावाच खरा आहे! तुझा बाप काय पावा वाजवायचा, म्हणून सांगू! कोवळी विड्याची पानं खाऊन ओठ लालबुंद करायचा आणि हातात पावा घेऊन उभा राहिला तर प्रत्यक्ष कृष्णच उभा असल्यासारखा दिसायचा! त्याचा पावा ऐकला की, कितीही वांड गुरं असली तरी पाय दुमडून झोपी जायची. एवढा चांगला पावा वाजवायचा, म्हणूनच गाईला वाचवताना त्यानं जीव दिला! पावा वाजवायची ताकद नसेल तर जीव द्यायची छाती कुठून येणार? त्याच्या त्या भक्तीमुळेच भगवंतानं त्याला पायाशी बोलावून घेतलं!'

वडिलांची आठवण निघताच पुट्ट काळिंगच्या मनात विशाद आणि प्रेम अशा मिश्र भावना उमटल्या. ते तरसाच्या तोंडी पडून मरण पावल्याचं त्यालाही ठाऊक होतं. ते देवाच्या पायाशी कसे गेले, हे काही त्याला कळत

**नवं कोरं**

# हसाल तर वाचाल

लेखिका
मीरा सिरसमकर

किंमत - १००/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.




कोणाला, किती आणि कशा प्रमाणात उपहास, विनोद समजतो याचं प्रमाण वेगवेगळं असेल कदाचित, पण...
आपण स्वत:ला विनोदाचं पात्र केलं की, तो विनोद लोकांना लगेच समजतो. असा विनोद समजण्याचं प्रमाण १०० टक्के आहे. पण पुन्हा यातही एखाद्या स्त्रीनं स्वत:ला विनोदाचं पात्र करून, स्वत:वरच विनोद केला तर मात्र, तो विनोद ५० टक्के लोकांनाच कळतो!
बाकीचे ५० टक्के लोक त्या स्त्रीला समजावत असतात, ‘ताई असं नाही... तसं नाही... होतं असं कधीकधी! जाऊ द्या ना, वाईट वाटून घेऊ नका’... तेव्हा मात्र हसावं की रडावं ते कळत नाही. काही का असेना- हसण्याचा मार्ग मात्र फार सुखाचा असतो. आजच्या धकाधकीच्या जीवनात ‘हसाल तर वाचाल’!

नव्हतं. शिवाय केवळ पावा वाजवल्यामुळे असं धैर्य आलं, हा युक्तिवादही त्याला समजत नव्हता, पटतही नव्हता.

आज्ज्या सांगत होता, 'गाईला वाचवायला म्हणूनच तुझ्या बापानं जीव दिला तर काय! पावा वाजवत नसता, तर गाईचा जीव वाचवायची बुद्धी तरी कुठून सुचणार? आपला जीव वाचवायची तेवढी बुद्धी असते!'

'आज्ज्या! मला तर तुझं बोलणंच समजत नाही!'

गौडानं पुन्हा एकदा आपलं बोलणं आठवून पाहिलं. आता ते त्याचं त्यालाही समजलं नाही. तरीही आपण काहीतरी फार 'अर्थपूर्ण' बोलल्याचा त्याला भास झाला. हेच जोईसांना विचारलं, तर ते याचा अर्थही समजावून सांगतील. हा त्याचा कितीतरी वेळचा अनुभव होता. म्हातारा काळिंगगौडा काहीतरी बोलून जायचा आणि जोईस त्याच्या अर्थाचं विवरण करून 'ही फार मोठी गोष्ट आहे!' असं म्हणायचे. मग गौडज्जा मोठ्यानं हसायचा आणि म्हणायचा, 'मी आपला एक अडाणी गोपाल! मनात येईल ते बोलतो! त्यात काय आहे दगड?'

त्या दिवशी पुट्टा गुरांना घेऊन गेला खरा; पण दिवसभर तो अगदी कंटाळून गेला होता. त्यानं पावा वाजवायचा प्रयत्न केला, तरी त्यात त्याचं मन रमत नव्हतं. गाई जवळ आल्या तरी त्यांच्याशी संवाद साधण्याचं कुठलंही कौशल्य त्याच्यापाशी नव्हतं.

यंदा हायस्कूलचं पहिलं वर्ष संपलं होतं. सुट्टी संपल्यावर त्याला त्याचे ऐच्छिक विषय निवडायचे होते. कला शाखा निवडायची की विज्ञानशाखा? त्याचा कल विज्ञानाकडे होता. वेंकटरमणा सांगत होता, 'संस्कृत शीक. मी तुला शिकवीन!' पण त्याचा जीव जीवशास्त्र-रसायनशास्त्रात रमून गेला होता. संस्कृत शिकण्यातही त्याला अजिबात रस नव्हता.

पुट्ट काळिंगचा हायस्कूलचा निकाल लागला. पुढं कॉलेजला जाऊन शिकायला आज्जा परवानगी देणार नाही, याची आधीच कल्पना असल्यामुळे तो आधीच जोईसांकडे गेला. नेहमीसारखी आधी भरपूर चर्चा करून अखेर काळिंगगौडानं मान्यता दिली.

हायस्कूलचं शिक्षण संपल्यावर वेंकटरमणानं महा पाठशाळेत प्रवेश घेतला होता. पहाटे ब्राह्म मुहूर्तावर उठून तो प्रातर्विधी आटोपून स्नान-संध्या

करायचा. नंतर वेदोपनिषदाचा पाठ व्हायचा. त्यानंतर महा पाठशाळेचे वर्ग. एकूण, त्याला अजिबात वेळच नसायचा. सुट्टीच्या दिवशी जो असायचा तो वेळ मिळायचा. पण त्याच्या सुट्ट्या पुट्ट काळिंगच्या सुट्टीच्या दिवशी यायच्या नाहीत. त्यामुळे त्या दोघांच्या भेटी विरळ होत चालल्या होत्या. भेट झालीच तर गावाकडच्या पाऊसपाण्याव्यतिरिक्त त्यांच्याकडे विषय नसायचे. त्याच्या जीवशास्त्र-रसायनशास्त्रातलं याला काही कळायचं नाही आणि याच्या पुराणकथा-वेदांमध्ये त्याला रस नव्हता.

वेंकटरमणा आताही कमरेला मौंजी गुंडाळायचा. आत लंगोटी बांधून वर लुंगी गुंडाळायचा. नारळाएवढाली मोठी केसांची गाठ त्याच्या मानेवर रुळत असायची. बाहेर जायचं नसेल तर कमरेला धोतर आणि खांद्यावर केवळ एक पंचा टाकून असायचा. त्याला तेव्हा शर्टाची गरज भासत नसे.

काळिंगा सिटी ख्रिश्चन कॉलेजात शिकत होता. अभ्यासाबरोबरच त्याचा खेळातही बराच पुढाकार असे. इंटरच्या वर्गात पोहोचेपर्यंत तो कॉलेजचा उत्तम खेळाडू म्हणून प्रसिद्धी पावला होता. व्हॉलीबॉल-कब्बड्डीबरोबरच धावायच्या स्पर्धेत तो कॉलेजमध्ये पहिला आला होता. ज्युनियर बीएस.सी.त शिकत असताना तो मैसूरमधल्या सगळ्या कॉलेजांमध्ये चांगलाच चमकला होता. त्या वर्षीच्या एमजीएस टुर्नामेंट्समध्ये खेळण्यासाठी त्याला बेंगळुरुला पाठवण्यात आलं. तिथंही तो धावण्याच्या स्पर्धेत सर्वप्रथम आला. तसंच कबड्डी-व्हॉलीबॉलमध्येही तो उत्तम खेळाडू ठरला. अशा प्रकारे त्याचं नाव क्रीडाजगतात चांगलंच दुमदुमू लागलं.

कॉलेजच्या प्रिन्सिपॉलचाही तो लाडका झाला. इतरांना त्यांची भेट घ्यायची असेल तर आधी चिठ्ठी पाठवावी लागे; पण काळिंग मात्र थेट त्यांच्या केबिनमध्ये जाऊ शकायचा.

सिनिअर बी.एस्सीत शिकत असताना तो कॉलेजच्या व्हॉलीबॉलच्या टीमचा कॅप्टन झाला होता. बंगळुरूमधल्या एका कॉलेजशी एक मॅच ठरायची होती. त्या संदर्भात एका कागदावर प्रिन्सिपॉल साहेबांची सही व्हायची होती. काम अर्जंट होतं आणि प्रिन्सिपॉल अजून कॉलेजला आले नव्हते. शेवटी काळिंगाच सायकलवरून प्रिन्सिपॉल साहेबांच्या घरी गेला.

तो पोहोचला तेव्हा ते जेवायला बसायच्या तयारीत होते. सही करून झाल्यावर त्यांनी विचारलं, ‘बॉय! जेवण झालं का?’

‘नाही.’ त्यानं उत्तर दिलं.

त्यांनी त्याला आपल्याबरोबर जेवायचा आग्रह केला. सुरुवातीला त्यानं संकोचानं नकार दिला. पण त्यांनी फार आग्रह केल्यावर तो जेवायला तयार झाला. टेबलावर प्रिन्सिपॉल साहेबांशेजारी त्याच्यासाठीही चिनी मातीची प्लेट मांडण्यात आली. बटलरनं त्यात त्याच्यासाठी जेवण वाढलं. साहेब काट्या-चमच्यानं जेवू लागले. काटे-चमच्याची सवय नसल्यामुळे तो गडबडला. हे लक्षात येताच साहेब म्हणाले, 'तू हवं तर तुझ्या पद्धतीनं हातानं जेव.'

तो हातानं जेवू लागला. जेवण मांसाहारी होतं. काळिंगा काही शुद्ध शाकाहारी नव्हता. मारम्माच्या जत्रेच्यावेळी त्यांच्या घरीही बोकड कापला जाई. शिजवलाही जाई. पण बाहेरच्या न्हाणीघरात चुलाणावर हा स्वयंपाक केला जाई. त्यासाठी वेगळी भांडीही होती. आतल्या स्वयंपाकघरात त्याला प्रवेश नसायचा.

जेवण झाल्यावर प्रिन्सिपॉल कारमधून कॉलेजला गेले. काळिंगाही सायकलवरून पत्र पोस्टात देऊन आपल्या वर्गावर गेला. घरातलं मांसाहारी जेवण आणि इथल्या जेवणात त्याला काहीतरी फरक जाणवला होता. घरातल्या मांसाहारात घमघमणारा मसाला असायचा. लांबून वास घेतला, तर त्याची आजी बनवत असलेल्या पावट्याच्या घमघमणाऱ्या वासात आणि त्या तोंडीलावण्यात फारसा फरक जाणवायचा नाही. पण प्रिन्सिपॉलसाहेबांच्या घरातल्या मांसाला फारसा मसाला लावला नव्हता. ते पूर्णपणे शिजल्यासारखंही वाटत नव्हतं.

त्याला केवळ आठवणीनं कसंसंच झालं. पाठोपाठ मनात एक विचार तरळून गेला; प्रिन्सिपॉल ख्रिश्चन होते. गोरा माणूस. ते गाईचं मांस खातात. आपल्यालाही गाईचं मांस तर खाऊ घातलं नसेल?.....

हा विचार मनात येताच त्याच्या पोटात ढवळल्यासारखं झालं.

तास संपल्याची घंटा होताच तो बाहेर पडला. सायकलवरून तो प्रिन्सिपॉल-बंगल्याकडे आला. विश्रांतीसाठी आडव्या झालेल्या देशी बटलरनं बेलचा आवाज ऐकून दरवाजा उघडला. त्याला काळिंगानं स्पष्टच विचारलं, 'आज मला खाऊ घातलं ते कशाचं मांस होतं?'

त्यानं उत्तर दिलं, 'बीफ!'

'बीफ? गोमांस? मला का नाही सांगितलंस?'


'त्यात काय सांगायचं?'

नवं कोरं

# अंतराळातील मृत्यू

लेखक
डॉ. संजय ढोले

किंमत - १९५/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.




अंतराळशास्त्रासोबत किरण, भौतिकशास्त्र, अणुशास्त्र, पदार्थविज्ञान तसेच वनस्पतीशास्त्रांसारखे विषय या कथांमध्ये हाताळले आहेत. 'प्रतिशोध' ही कथा एका थरारक अनुभवातून भविष्यात बिकट होणाऱ्या ऊर्जेचा प्रश्न सोडविणारी आहे.

तर 'अंतराळातील मृत्यू', 'प्रतिघटना', 'अद्भुत प्रवास' या कथा कृष्णविवराच्या माध्यमातून प्रतिपृथ्वीचा व समांतर विश्वाच्या शोधाच्या कथा आहेत. 'प्रगाढ' ही कथा किरणशास्त्रावर आधारित असून, त्यातील शास्त्रज्ञ सुडापोटी विघातक प्रयोग करतो आणि समाजापुढे प्रश्न निर्माण करतो.

'प्रगल्भ' ही कथा भावनेच्या भरात यंत्रमानवाला जैविक मेंदूचा दर्जा मिळवून देताना, शास्त्रज्ञ भविष्यात मानवापुढे भयंकर प्रश्न निर्माण करत नाही ना, याची दखल घेते. शिवाय मानवसुद्धा जैविक अस्त्र म्हणून पुढे येऊ शकतो, हे 'आविष्कार' या कथेत प्रकर्षाने जाणवते. 'अंधारातील तीर' ही कथा मात्र शास्त्रज्ञाचा नकारात्मक दृष्टिकोन निसर्गालाच कसे वेठीस धरू शकतो, याची जाणीव करून देते.

काळिंगा निरुत्तर झाला. बटलरनं पुन्हा विचारलं, 'का? काय झालं?'

यावर काहीही न बोलता तो बाहेर आला. सायकलवरून कॉलेजकडे निघाला. दोन फर्लांग जाईपर्यंत पोटातली मळमळ पराकोटीला पोहोचली. सायकल बाजूला घेऊन शेजारच्या झाडाला टेकवून तो खाली बसला. त्याला भडभडून उलटी झाली. घशात बोट घालून त्यानं आणखी उलटी काढली. पोटातल्या गोमांसाबरोबरच त्या आधी हॉटेलमध्ये मसालाडोशाबरोबर खाल्लेली बटाट्याची भाजीही त्यातल्या कांद्यासह बाहेर पडली. त्याला काहीसं शांत वाटलं. चूळ भरल्याशिवाय पूर्णपणे बरं वाटणार नाही हे त्याला समजत होतं. त्यात सारं अंग घामेजल्यासारखं झालं होतं. आंघोळ केल्यावरच बरं वाटेल, असा विचार करून तो हॉस्टेलच्या दिशेनं वळला.

आंघोळ झाल्यावर त्याला बरं वाटलं. तरी मनातली अस्वस्थता तशीच होती. आपण काळिंगगौडाच्या घराण्यातले! गाय म्हणजे आपल्या दृष्टीनं देवच! असं असताना आज मी गोमांस खाल्लं! ख्रिश्चन लोक, त्यातही गोरे पाद्रीही गोमांस खातात. ही गोष्ट जेवताना मी कसा विसरलो? छे:! काय घडलं हे! पाप घडलंय माझ्या हातून!

किती वेळ लोळत पडलं तरी मनातला हा विचार मागं हटायला तयार नव्हता. काय पाप घडलं हे!

पाप म्हटल्यावर पाठोपाठ प्रायश्चित्ताचा विचार मनात आला. यावर काय प्रायश्चित्त? पाठोपाठ वेंकटरमणाची आठवण येणं अपरिहार्य होतं. काळिंगा या विचारासरशी ताडकन उठून सायकलसहित संस्कृत महा-पाठशालेपाशी आला.

वेंकटरमणा त्या दिवशी रिकामाच होता. आपल्या खोलीत बसून तो काही मंत्र दौत-टाकानं एका वहीत उतरवून घेत होता. त्यानं काळिंगाचं स्वागत करत म्हटलं, 'काय रे! तीन महिने झाले ना आपल्याला भेटून? काय रे, चेहरा का उतरलाय तुझा? काय झालं? बरं नाही काय?'

काळिंगानं घडलेली सगळी हकिगत त्याच्या कानावर घातली. नंतर म्हणाला, 'यावर जे काही प्रायश्चित्त असेल ते सांग. तूच करवून घे.'

वेकंटरमणानं क्षणभर विचार करून विचारलं, 'पण त्यांच्या घरात तू का जेवायला गेला होतास? परक्या जातीच्या घरी जेवू नये असं शास्त्र आहे ते काय खोटं आहे?'

'सांगितलं ना लक्षात आलं नाही म्हणून! लक्षात आलं असतं तर मी

का जेवलो असतो? व्हायचं ते घडून गेलंय. आता यावर प्रायश्चित काय, ते सांग.’

‘तू काही जाणीवपूर्वक हे पाप केलेलं नाहीस म्हणा! शिवाय तुला तुझ्या चुकीची जाणीवही झाली आहे. त्यामुळे त्यात फारसा दोष नाही. उद्या सकाळी पंचगव्य घे. तोवर तोंडात पाण्याचा थेंबही घेऊ नकोस.’

‘तूच दे ना! मी कुठं ते शोधत जाऊ? ते कसं करतात तेही मला ठाऊक नाही.’

‘राजवाड्याच्या गोशालेत गोदधी, गोक्षीर, गोमूत्र, गोशकृत, गोमय मिळतं. मी घेऊन येईन. उद्या पहाटे पहिल्या बसनं पश्चिमवाहिनी नदीपाशी जाऊ या. तिथं अंघोळ कर आणि ते घे.’

दुसऱ्या दिवशी दोघांनीही तसं केलं. दोघांची आंघोळ झाल्यावर वेंकटरमणानं संध्यावंदनही उरकलं. नंतर त्यानं काळिंगाला पंचगव्य प्राशन करायला दिलं. काळिंगानं वेंकटरमणाला चांदीचा रुपया दिला. नदीत पावली टाकल्यावर प्रायश्चित्त घेतल्याच्या समाधानात दोघंही माघारी वळले.



नवं कोरं

**वादळातील दीपस्तंभ**

मूळ लेखक
डॉ. क्रेफ्लो डॉलर

अनुवाद
गौरी गाडेकर

किंमत - २५०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.





# पुस्तक परिचय



## डेज् ऑफ गोल्ड ॲन्ड सीपिया

**मूळ लेखिका**
**यास्मिन प्रेमजी**

विप्रोचे संस्थापक अझीम प्रेमजी हे भारतातील एक अग्रगण्य सर्वाधिक श्रीमंत व्यक्तिमत्त्व.

त्यांच्या पत्नी यास्मिन प्रेमजी यांचा जन्म आणि लहानपण मुंबईमध्ये गेले. सेंट झेवियर्स कॉलेजमधून पदवीधर झाल्यानंतर त्यांनी अमेरिकेतील स्मिथ कॉलेजमधून पदव्युत्तर पदवी संपादित केली.

त्यांना लेखनाची नेहमीच आवड होती. त्यांची पहिली कथा त्या सतरा वर्षांच्या असताना प्रकाशित झाली होती. भारतातील डिझाइन मॅगेझिन 'इनसाइड आउटसाइड'च्या सहायक संपादक म्हणून त्यांनी बरीच वर्षे काम केले.

नंतर त्या त्यांचे पती अझीम प्रेमजी यांच्याबरोबर बंगळुरू या भारताच्या 'आयटी राजधानी'त स्थायिक झाल्या.

'डेज ऑफ गोल्ड ॲण्ड सिपिया' ही त्यांची कादंबरी कच्छमधील १०० वर्षांपूर्वीच्या समाज जीवनाचे दर्शन घडविते. लालजी हा आपल्या गावी परत आल्यानंतर पुन्हा आपले बस्तान बसवतो. त्यासाठी त्याला खूप संघर्ष करावा लागतो. त्यातले तपशील आजही आपल्याला चक्रावून सोडतात.



**अनुवाद**

## अंजनी नरवणे

शालेय शिक्षण वाई व सातारा येथे झाल्यानंतर नरवणे यांनी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला; परंतु तेव्हा त्यांना महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करता आले नाही. त्यानंतर १५ वर्षांनी त्यांनी शिवाजी विद्यापीठाची बी.ए. (ऑनर्स) पदवी संपादन केली. त्यानंतर बडोदा विद्यापीठातून रशियन भाषेची पदविका संपादन केली.

१९५३ ते १९९८ या कालावधीत त्या बडोदा येथे वास्तव्यास होत्या. त्या वेळी त्यांनी लेखन व समाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेतला. १९९८मध्ये त्यांनी बडोद्यात एक मोठी आधुनिक बेकरी सुरू करून स्थानिकांना रोजगार पुरवला. पुण्याला आल्यावर त्यांनी लेखन व अनुवाद यांवर लक्ष केंद्रित केले. 'स्त्री', 'किर्लोस्कर', 'माणूस', 'अमृत', 'माहेर', 'शब्दांगण', 'मिळून साऱ्याजणी' यांसारख्या नियतकालिकांमधून त्यांनी ललित, तसेच कथालेखन केले.

गुजराती साहित्याशी संपर्क आल्यावर त्यांनी तेथील साहित्य मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आजवर त्यांनी उत्तमोत्तम गुजराती साहित्य अनुवादित केले आहे. त्यांनी इंग्रजी पुस्तकांचाही अनुवाद केला आहे. त्यांची ललितलेखांची व पाककृतींचीही पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

त्यांना 'रणजित देसाई पुरस्कार' (२००१), महाराष्ट्र साहित्य परिषदेचा 'स्व.स.ह. मोडक पुरस्कार' (२००१) आदी पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

**या पुस्तकातील काही भाग येथे देत आहोत.**




**त्याला** कळून चुकलं होतं की, ती बरी होणार नव्हती.

तीन दिवस अन् तीन रात्री फणफणलेल्या तापानं गुंगी येऊन जवळ जवळ बेहोश असलेल्या तिला त्या फाटक्यातुटक्या गादीवर तडफडताना तो पाहत होता. लहानशा दिवलीच्या अंधूक प्रकाशात तो तिच्याजवळ बसून होता, हळुवारपणे तापानं धगधगणाऱ्या कपाळावरचा घाम पुसत होता, तिचा चेहरा कुरवाळत होता. तिचं दुखणं, यातना कमी करायला त्याचं प्रेम किती अपुरं होतं, या अतिशय केविलवाण्या दुःखाची जाणीव त्याला होती. मधून मधून ती कण्हायची, तेव्हा त्याच्या चिमुकल्या हातांनी तिचं तापलेलं डोकं हळूच उचलून धरून तो पाण्याचा लोटा तिच्या ओठांशी धरायचा आणि पाण्याचे दोन-चार थेंब तिच्या कोरड पडलेल्या घशात उतरतील असा प्रयत्न करायचा.

झोपडीच्या बाहेर रात्र होती – दयामाया नसलेली, निर्दय, वैरिणीसारखी. कच्छच्या त्या विस्तीर्ण पसरलेल्या रणावर मोठ्ठं काळं कफन घातलं असावं तशी ती सर्वदूर पसरली होती. इतकी निर्जन उदासीनता, इतक्या स्वर्गीय सौंदर्यानं नटून स्वच्छ चमचमणाऱ्या चांदण्यांच्या छताखाली असावी, ही तर विधीची वक्रताच म्हणायची! अजिबात हालचालच न करू शकणाऱ्या जमिनीवरून निर्दय धसमुसळा हिवाळी वारा जोरात वाहत होता, त्याच्या त्या वेगामुळे वेड्यासारखी गिरक्या घेत उडणारी वाळू झोपडीच्या मातीच्या भिंतींना पडलेल्या फटींमध्ये आणि झोपडीच्या जीर्ण झालेल्या, शकारलेल्या छपरांमध्ये शिरून बसत होती.

तेल संपत आलेल्या दिव्याची ज्योत फडफडली. मृत्यूच्या तांडवनृत्यासारखी पुढे-मागे होत राहिली. तिच्या सावल्यांचे भीतिदायक असे वेडेवाकडे आकार त्या खोलीतल्या घोर शांततेत नाचत होते. त्या छोट्या मुलाची उदास नजर त्या आकारांकडे बघत राहिली. त्याचा कोवळा चेहरा गोंधळून, बावरून गेला होता. त्याची आई वाचणार नाही, या शक्यतेची जाणीव असल्याने प्रचंड निराशेनं त्याला घेरलं होतं. त्याचं सारं जगच त्याच्या सभोवती कोसळून पडत होतं.

त्या प्रदेशात या भयंकर आजाराची ही जी साथ पसरली होती, त्यातून फारच थोडी कुटुंबं वाचली होती. प्रवासात सिद्धपूर ज्यांच्या वाटेवर पडत असे, ते इतरही गावांमधल्या आजाराच्या आणि मृत्यूंच्या अशाच करुण कहाण्या सांगायचे. इतके लोक मृत्युमुखी पडत असल्याची माहिती कच्छच्या महारावांपर्यंत पोचली, तेव्हा ते स्वत:देखील त्यांच्या जनतेची ही दैना बघायला आले होते.

अगदी प्रथम आजाराला बळी पडलं होतं सर्वात छोटं बाळ. त्याला वाचवता आलं नव्हतं, तसंच लालजीच्या लाडक्या बहिणीलाही. बाने अथक परिश्रम करूनही ती तिच्या मुलीला, तसंच त्याच्या वडिलांनाही वाचवू शकली नव्हती.

लालजीच्या डोळ्यांसमोर त्याचे उंच देखणे वडील उभे राहिले. पांढरा चोळणा, त्यावर घेरदार केडियु. पांढुरक्या रंगाच्या मलमलच्या त्या केडियुवर त्याच्या बाने केलेलं भरतकाम, आणि लखलखीत रंगांच्या बांधणीचा डोक्यावरचा फेटा. त्यांच्या मजबूत हातांमध्ये सांभाळत उचलून घेत त्याचे वडील त्याला बाहेर फिरायला घेऊन जायचे, आणि गंमत वाटून बघणाऱ्या गावकऱ्यांना अभिमानाने सांगायचे, ''माझा मुलगा – लालजी! माझा पहिला मुलगा – म्हातारपणाचा आधार – साऱ्या जन्माचं सुख माझ्या!'' खेडोपाडींच्या जत्रांमध्ये आणि वर्षातून एकदा भरणाऱ्या मेळ्याच्या वेळीही बापा त्याला खांद्यावर बसवून ऐटीत फिरायचे. मग लालजीला सगळं उंचावरून बघायला मिळायचं. तऱ्हतऱ्हेच्या आवाजांची आणि वेगवेगळ्या रंगांची ती जादुई दुनिया त्याला मोहून टाकायची.

त्याचे बापा आजारी पडले तेव्हा कितीतरी दिवस बा झोपलीच नव्हती. स्वत:च्या खाण्या-पिण्याकडेही तिचं दुर्लक्ष करू लागली. मग शेजारच्या

प्रेमळ काकी आपुलकीनं काहीतरी खायला-प्यायला घेऊन आल्या आणि तिला दटावत म्हणाल्या, ''तूही आजारी पडलीस तर नाही ना चालणार?'' त्याचं काही महत्त्व नसल्यासारखे बाने खांदे उडवले. ''मूर्खासारखं करू नको!'' काकींनी पुन्हा दटावलं. ''तूही आजारी पडलीस तर या दोघांना कोण सांभाळेल?'' – कोपऱ्यात झोपलेल्या लालजी न् जप्पूकडे बोट दाखवत त्या म्हणाल्या होत्या, ''तू नीटपणे खाऊन स्वत:ची काळजी घेतलीच पाहिजे, या दोघांसाठी न् मुख्य तर याच्यासाठी!'' खाटेवर पडून असलेलया लालजीच्या बापांजवळ जाऊन काकी म्हणाल्या, ''आज कालच्यापेक्षा बरा दिसतोय बघ हा! मी सांगते बघ, उद्या सकाळपर्यंत अगदी बरा होऊन जाईल तो!''

पण दुसऱ्या दिवशीची सकाळ बापांनी बघितली नाही! बा त्यांना मिठी मारून रात्रभर बसली होती – जणू ती त्यांना कधीच जाऊ देणार नव्हती.

आणि मग तिलाही त्याच तापाची लागण झाली.

''बाला नको नेऊ देवा!'' तो काकुळतीला येऊन देवाला विनवत होता. डोळ्यांमधले अश्रू खाली वाहू नयेत म्हणून आणि ज्या सर्वशक्तिमान देवाची त्यांच्या छोट्या छोट्या आयुष्यांवर सत्ता होती, तो डोळे मिटून तरी नीट दिसतोय का, हे बघायला तो डोळे मिटून बसला होता. पण देवाची इतकी प्रार्थना करत असतानाही त्याला मनातून प्रचंड भीती वाटत होतीच, की त्याचं बावरचं इतकं प्रेम, त्याला तिची असलेली इतकी गरज, कशामुळेही ती वाचणार नव्हती — जसे कितीतरी इतर लोकही वाचू शकले नव्हते. त्याचं लहानसं अशक्त शरीर थंडीनं कुडकुडायचं, जवळ असलेली बांधणीची फाटकी शाल तो अंगाभोवती घट्ट गुंडाळून घ्यायचा आणि जीवघेण्या थंडीपासून बचाव करू बघायचा. तो इतका थकून गेला होता, की जागं राहण्याचा कितीही प्रयत्न केला तरी डोळे मिटायला लागायचे. बा अजून आहे, आपल्याजवळ आहे, असा स्वत:ला भरवसा देण्यासाठी त्यानं आपला छोटासा हात शालीतून बाहेर काढून हळूच बाच्या हातावर ठेवला.

बाची किंचितशी हालचाल जाणवली आणि लालजी दचकून जागा झाला. तेलाची दिवली विझून गेली होती, पण पौर्णिमेच्या चंद्राच्या उजेडानं छपराच्या फटींमधून आत यायला वाटा शोधल्या होत्या. लालजीनं धडधडणाऱ्या छातीनं शेजारी पडून असलेल्या बाकडे बघितलं.

बाचे डोळे उघडे होते, पण आधी तर असं वाटलं की, तिला दिसतच नव्हतं; पण मग तिची नजर हलली आणि हळूहळू फिरत त्याच्यावर येऊन स्थिरावली. खूपच वेळानं तिनं डोळे उघडले होते, त्यामुळे त्याला जरा नवलच वाटलं. मग वाटलं, म्हणजे तिला बरं वाटत असणार, धोका टळला असणार. तिचा श्वासोच्छ्वासही आधीपेक्षा बरा वाटत होता. आनंदाचं भरतं येऊन त्यानं त्याचे छोटेसे हात तिच्या गळ्याभोवती टाकून तिला कवटाळलं. काही क्षण मायलेक एकमेकांच्या मिठीत तसेच पडून राहिले.

तेवढ्यात हसऱ्या चेहऱ्यानं काहीतरी बोलत बोलत काकी लगबगीनं आत आल्या. ''वा! उठलीस का? कसं वाटतंय आता? झोप लागली का चांगली? आज खूपच बरी दिसतेयस तू!'' बाच्या कपाळावर हात ठेवून बघत प्रसन्न स्मित करत काकी म्हणाल्या, ''देवाच्या दयेनं ताप उतरलेला दिसतोय एकदाचा! म्हटलंवतं ना मी तुला, की तू नक्की बरी होशील म्हणून? हे बघ, काय आणलंय तुयासाठी! गरम आहे तोवर पिऊन घे बरं, ताकद येईल याने जरा.'' मग लालजीकडे बघत काकी म्हणाल्या, ''बिच्चारा यवढासा जीव! थकला असशील रे! हे घे, तुला खायला आणलंय थोडंसं; खा बरं, आणि झोप जरासा. मी बसते इथं, आणि बघते तुझ्या बाकडं, हं?''

काकींच्या आपुलकीच्या, प्रेमाच्या बोलण्या-वागण्यानं लालजीला खूप बरं वाटलं. त्याला पूर्वीचे दिवस आठवले. काकी केव्हाही येऊन धडकायच्या आणि त्याचे बा-बापा गालातल्या गालात हसायचे. 'आल्या काकी!' अशा अर्थाचे दृष्टिक्षेप एकमेकांकडे टाकायचे. सगळ्यांच्याच चेहऱ्यांवर हसू उमटायचं. त्याला त्या चांगल्या दिवसांची आठवण झाली. पण तरी बापासून दूर जायला मात्र तो लगेच तयार नव्हता. त्यानं नकारार्थी मान हलवत हटलं, ''मी दमलो नाहीये काकी!'' एवढं बोलतानाही त्याचा आवाज थकलेला, क्षीण वाटत होता. ''तुम्ही गेलात तरी चालेल, मी भरवतो बाला.''

काकींनी नापसंतीदर्शक 'च्चक्' केलं. त्यांना दिसत होतं, की त्या एवढ्याशा मुलाला विश्रांतीची खूप आवश्यकता होती. पण मग लालजीच्या बाचे केस, कपडे, अंथरूण-पांघरूण सगळं जरा नीटनेटकं करून, आणलेल्या लापशीचं भांडं ठेवून, 'थोड्या वेळानं येते हं' असं सांगून त्या गेल्या.

बानं उगीच एवढंसं खाल्लं, मग ती पुन्हा आडवी पडली आणि तिनं लालजीला जवळ बोलावलं. तिला मोठ्यानं बोलवतही नव्हतं, लालजी पुढे वाकून बसला.

''लालजी माझ्या सोन्या!'' कपाळावर आलेले त्याचे केस हातानं मागे सारत ती हळूहळू सांगू लागली. ''नीट ऐक हं! तूच आता पुरूष आहेस या घरातला. मला काही... झालं, तर छोट्या जप्पूला पोटच्या पोरासारखं सांभाळ...'' धाप लागली म्हणून जरा थांबून ती पुढे म्हणाली, ''आणि – तू – तू बेटा, गेलंच पाहिजेस इथून.'' मग वळचणीजवळ एका कोपऱ्यात ठेवलेल्या एका लहानशा डबीकडे बोट दाखवत ती काढून आणायला तिनं खुणावलं.

लालजीनं एक लहान बाजलं त्या कोपऱ्यात सरकवलं आणि त्यावर उभं राहिल्यावर कसाबसा त्याचा हात त्या डबीपर्यंत पोचला. ती डबी तिथं होती हे घरात सगळ्यांना माहीत होतं, पण कोणीच ती कधी उघडलेली बघितली नव्हती. डबीवर बसलेला बारीक वाळूचा थर हातानं नीट पुसून त्यानं ती बाला दिली.

आत एक चांदीचं लॉकेट होतं आणि एक पिवळट पडलेला कागद होता. ''हा घे.'' थरथरत्या हातांनी तिनं तो कागद त्याला दिला. ''गोघाला जा. गुल्लू मदत करेल तुला तिथे पोचायला. यावर लिहिलंय ते घर शोधून काढअन् मालकांना सांग तू कोण आहेस ते. घाबरू नको मुळीच. त्यांना म्हणावं मला काहीतरी काम द्या. त्यांना सांग की, फुकटचा दानधर्म म्हणून काही नकोय मला. हे त्यांना दाखव – '' लालजीच्या छोट्याशा हातावर ते चांदीचं लॉकेट ठेवून तिने त्याची मूठ बंद केली. ''म्हणजे त्यांना समजेल तू माझा मुलगा आहेस असं.'' तिनं लालजीला जवळ घेतलं. मग श्रमांमुळे खूप थकून ती निपचित पडली.

जरा वेळानं ती या कुशीवरून त्या कुशीवर तडफडायला लागली. तिच्याकडे बघत बसलेल्या लालजीला मघाशी जरा बरी दिसत असणाऱ्या बाची तब्येत एकदम पुन्हा का बिघडली, हे समजेना. मग तर ती कण्हायला न् थरथर कापायला लागली. घाबरून लालजी काकींना बोलवायला गेला.

काकींनी येऊन बाकडे एकदा बघितलं न् त्या लालजीला लगेच


**५वी आवृत्ती**

# सुंदर मन

मूळ लेखक
एडवर्ड डी बोनो

अनुवाद
सुभाष जोशी

किंमत - १७०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.




आपण स्वत:ला आकर्षक करण्यासाठी कपड्यांवर, सौंदर्यप्रसाधनांवर, आहारावर, व्यायामावर अमाप पैसा खर्च करतो.
पण सर्वांचं लक्ष वेधून घेणाऱ्या, बिनखर्चाच्या एका गोष्टीकडे मात्र आपण साफ दुर्लक्ष करतो. ते घडवायला फारसा वेळही लागत नाही.
ते आहे सुंदर मन.
मन घडवायला ढीगभर ज्ञानाची गरज नाही किंवा उत्तम व्यक्तिमत्त्वाचीही गरज नाही. फक्त तुमच्यापाशी सर्जनशीलता, कल्पकता व स्पष्टपणा असला म्हणजे झालं.
लोकांची विचारप्रक्रिया बदलू शकणारे जगप्रसिद्ध, Edward de Bono यांनी आपल्या संभाषणकौशल्यांनी लोकांना कसं प्रभावित करायचं ते सरळसोप्या भाषेत पुस्तकात मांडलं आहे.
हे पुस्तक वाचून संपेपर्यंत तुमचं आयुष्य कसं बदलून गेलं आहे,
हे तुमच्या लक्षातही येणार नाही.

घाईघाईनं म्हणाल्या, ''पळत जाऊन मुन्नीला घेऊन ये.''

मुन्नी जप्पूला कडेवर घेऊन धावतच आली, पाठोपाठ गुल्लूही. काकींनी तोंडावर बोट ठेवून त्यांनी काही विचारायच्या आधीच गंभीरपणे मान हलवली; आणि बाच्या तापानं फणफणणाऱ्या कपाळावर हात ठेवून त्या हळूच म्हणाल्या, ''मुन्नी आलीय बघ, न् गुल्लू.''

तडफडणारा तो देह हळूहळू शांत झाला. बानं डोळे उघडले आणि तिच्या भोवतालच्या चेहऱ्यांवर नजर स्थिरावयाचा प्रयत्न केला. खूप प्रयत्नांनी तिनं हात उचलला. मुन्नीनं दोन्ही हातात तो घट्ट धरून ठेवला. ''बा! बरी होशील गं तू!'' ती मृदू आवाजात म्हणाली, ''ठीक होईल सगळं...''

बानं मान हलवली. फार वेळ उरला नव्हता घालवायला. तिनं मुन्नीचे न् गुल्लूचे हात एकत्र धरले न् म्हणाली, ''माझ्या मागं छोट्या जप्पूला तुम्ही सांभाळा.'' तिचा आवाज जेमतेम ऐकू येत होता.

अश्रू आवरून धरत त्या दोघांनी होकारार्थी माना डोलावल्या. ''आम्ही त्याला छान सांभाळू बा, तू पडून रहा शांत.''

पण तरी ती बोलत राहिली – ''आणि कसंही करून लालजीला गोघाला पोचवून द्या. त्याला पत्ता दिलाय मी. मला वचन द्या, त्याला तिथं पोचवाल असं. नेहमी एकमेकांना धरून रहा. कुटुंबातले तुम्हीच बाकी राहिलायत आता...'' मग तिने मान वळवली न् शांत पडून राहिली. तिचा श्वास आता धपापत नव्हता आणि देहही तडफडत नव्हता, जणू त्या देहाचे हाल आता संपले होते.

''पडून राहू दे तिला आता.'' काकींनी मुन्नीला सुचवलं. ''तुला आता तुझ्या बाळाला न् छोट्या जप्पूलाही सांभाळायचंय, तर जा तू. वेळ येईल तेव्हा परत हाक मारीन तुला.''

लालजीनं मात्र बा जवळून उठायचं साफ नाकारलं. त्याला जणू भीती वाटत होती, की तो क्षणभर जरी हलला, तरी तेवढ्यात तो तिला कायमची गमावून बसेल. तिथंच अंधारात अंगाचं मुटकुळं करून तो बसून राहिला, आणि शेवटी अतिशय थकल्यानं त्याला झोप लागली.

बाच्या खाटेच्या बाजूनं आलेल्या आवाजाने तो जागा झाला. काकी

खाटेवर वाकून बाला जरा बसती करू बघत होत्या. बाला श्वास घेता येत नव्हता. मग काही वेळ प्राणांतिक अवस्थेतला घरघर लागलेला आवाज येत राहिला आणि मग एक दीर्घ स्तब्धता.

त्या थकल्या चेहऱ्यावरच्या यातना नाहीशा होत जाताना काकी बघत राहिल्या. त्यांचा घागरा मागून कोणीतरी ओढत होतं, त्यांना लालजीचा थोडी वेळ विसरच पडला होता. त्यांनी त्याला उचलून घेतलं आणि त्याच्या घाबरलेल्या चेहऱ्यावरच्या आढ्यांच्या सुरकुत्या हलक्या हातांनी पुसत त्याच्या डबडबलेल्या डोळ्यांमधले अश्रू ओठांनी टिपून घेतले. ''बाला ना, आता आराम मिळालाय एकदाचा, खूप खूप जास्त चांगल्या जागी!'' त्या हळूच त्याला म्हणाल्या.

बाच्या शांत चेहऱ्याकडे तो पाहत राहिला. किती सुंदर दिसत होती ती! तो काकींच्या कडेवरून उतरून बाजूला सरकला. काकींनी बाचा देह झाकला. लालजी बाहेरच्या उघड्या दाराशी जाऊन उभा राहिला. त्याची बा म्हणाली होती, ते बरोबर होतं. तो आता मोठा मुलगा झाला होता – सहा वर्षांचा, आणि त्याच्या कुटुंबातला मुख्य पुरुष. म्हणून मग तो जरा जास्त ताठ, जरा जास्त उंच, असा उभा राहिला. बाहेरच्या केवढ्यातरी दूर-दूरपर्यंत पसरलेल्या वाळवंटाकडे आणि स्वच्छ निरभ्र आकाशाकडे बघताना १८६६ सालच्या हिवाळ्यातल्या त्या गारठलेल्या सकाळी लालजी लखा हे समजून चुकल की, तो आता पुढच्या वाटचालीसाठी तयार होता.

**गावातले** लोक बाचा मृतदेह गावाच्या बाहेर सामायिक अग्निक्रियेसाठी घेऊन गेले. आजाराची साथ खूपच पसरली होती, त्यामुळे इतके लोक मृत्यू पावत होते, की एकेकट्याचं दफन करणं, हीदेखील चैनीची गोष्ट झाली होती. चितेच्या शेवटच्या ज्वाला विझून मग निघणारा धूर आकाशात जाऊ लागला तोपर्यंत लालजी तिथे उभा राहून बघत राहिला.

आता इथून जाण्याची वेळ आली होती. जेव्हा शेवटचा निरोप घेण्याचा क्षण आला, आणि वियोगाचं वास्तव त्याच्या खरं-खरं लक्षात आलं, तेव्हा लालजी त्याची बहीण मुन्नी आणि दोन वर्षांचा भाऊ जप्पू यांना कवटाळून बसला. अभूतपूर्व अशा या सर्व उलथापालथीच्या दिवसांमध्ये प्रथमच तो

खूप रडला – ज्या 'त्याच्या आपल्या' अशा सगळ्या माणसांना गमावलं होतं त्यांच्यासाठी, 'त्याचं जग' कायमचं नाहीसं झालं होतं त्याच्यासाठी आणि आता जे दिवस कधीही परत येणार नव्हते हे त्याला आता जाणवत होतं त्या दिवसांसाठी!

जप्पूला सोडून जाण्याचं दु:ख फार मोठं होतं. कारण लालजीचा त्याच्या छोट्या भावावर फार जीव होता. त्या मुलालाही लालजीचा अतिशय लळा होता. जप्पू लडखडत पावलं टाकायला लागला, तेव्हापासून तो जणू लालजीची दुसरी सावलीच झाला होता. लालजी हसला की जप्पू हसायचा, लालजी रडला की जप्पूही रडायचा! जणू त्यांच्या दोन हृदयांची कंपनं एकच होती.

लालजीनं दोन्ही हातांनी जप्पूला जवळ घेतलं आणि अश्रूभरल्या डोळ्यांनी; पण चेहरा मात्र मोठ्या हिमतीने हसतमुख ठेवत तो म्हणाला, ''जपू, मी तुला घेऊन जायला परत येईन हं नक्की, वचन देतो तुला!''

''चल आता लालजी,'' हळुवार आवाजात गुल्लू म्हणाला, ''सामान उचल तुझं, वेळ झालीय निघायची –'' मग तो लालजीला वाट बघत थांबलेल्या बैलगाडीकडे घेऊन गेला.

लालजीनं त्याचा हात घट्ट पकडला आणि बावरून जाऊन विचारलं, ''तुम्ही – तुम्ही नाही येणार?'' गुल्लूने त्याला उचललं आणि बैलगाडीत बसवून बाजूला झाला.

''नाही रे,'' त्याच्या गालावर थोपटत गुल्लू म्हणाला. ''पण तुझं सगळं ठीक होईल. चंदूकाका थेट भुजपर्यंत जातायत, तिथून ते कोणाबरोबर तरी तुला गोघाला पोचवायची व्यवस्था करतील.'' लालजीचा चेहरा निश्चिंत दिसेना म्हणून गुल्लू पुढे म्हणाला, ''अरे काळजी करू नकोस, सगळं काही व्यवस्थित होईल.'' आणि तो प्रेमानं, आश्वासक हसला. गुल्लूच्या बाबतीत हे उगाच पोकळ शब्द नव्हते. स्वभावानं मुळातच आशावादी आणि आनंदी स्वभावाच्या गुल्लूचा खरोखरीच या गोष्टीवर विश्वास होता, की कितीही प्रचंड दुर्दैवी घटना घडली, तरी शेवटी सगळं काही ठीकच होतं.

लालजीनं बैलगाडीतून पुढे झुकून गुल्लूला एकदा शेवटचं कवटाळलं. गुल्लूनं त्याच्या केसांमधून हात फिरवला. गुल्लू मग चंदूकाकांशी थोडंसं

बोलला, चंदूकाका गाडीत चढले आणि त्यांच्या भरघोस मिशांना पीळ देत लांबच्या प्रवासासाठी आवरून-सावरून बसले. निरोपाचे हात हलत होते तेव्हा चंदूकाकांनी बैलांच्या वेसणी खेचून त्यांना इशारा दिला, तसे जरा नाइलाजानंच बैल जागचे हलले आणि प्रवास सुरू झाला.

चंदू हलवाई खूपच थोराड माणूस होता – मोठं डोकं, मोठाली पावलं, बरंच सुटलेलं पोट आणि दिलदार, मोठं मन! त्या खेड्यातलं एकही मूल असं नव्हतं, जे चंदूकाकांच्या दुकानात छान लावून ठेवलेल्या तऱ्हेतऱ्हेच्या मिठायांकडे आ वासून बघत उभं राहत नसे. चंदूकाकांची रागीट बायको जवळपास नसेल तेव्हा त्या मुलाला कसला ना कसला मिठाईचा तुकडा मिळाला नाही असंही होत नसे! विशेष सणावारांच्या दिवशी बुंदीचे लाडू असायचे. ते तर इतके चविष्ट असायचे, की आसपासच्या पंचक्रोशीतले व्यापारीसुद्धा म्हणायचे, की जगात इतके छान लाडू दुसरीकडे कुठ्ठेच त्यांनी खाल्ले नव्हते! चंदू हलवाई हे ऐकून खूप खूश व्हायचा आणि मिशांना आणखी ऐटीत पीळ भरायचा.

बैलगाडी गावाबाहेरच्या कच्च्या रस्त्यावरून चालली होती. अजून तांबडं फुटलं नव्हतं. गार वाऱ्याने लालजीला हुडहुडी भरत होती. त्याला खूप छोटं, असुरक्षित आणि घाबरल्यासारखं वाटायला लागलं. चंदूकाकांनी काही न बोलता त्यांच्या पाठीवरची झाल काढली आणि मुटकुळं करून पडलेल्या त्या पोराच्या अंगावर टाकली. थंडीपासून बचाव झाल्यानं आणि एका लयीत जाणाऱ्या बैलगाडीच्या हलण्यामुळं लालजीला झोप लागून गेली.

भोवताली अफाट मोठ्या उजाड वाळवंटाचा विस्तार होता, फक्त मिठागरं तेवढी वर साठलेल्या मिठाच्या थरानं हिवाळ्यातल्या चंद्राच्या चंदेरी चांदण्याच्या प्रकाशात गूढरम्य अशी चमकत होती... मग रात्रीचा बुरखा दूर करून सूर्य बाहेर आला तेव्हा निरभ्र आकाशाला सुंदर, नितळ म्हणता येत असेल, तर ते तसं होतं. पण वाळवंटातल्या होरपळून काढणाऱ्या उन्हात जे राहतात, ते एखाद्या ढगाची सावलीही आतुरतेनं शोधत असतात. सुदैवानं तेव्हा हिवाळा असल्यानं उजाडतानाचं ते ऊन रात्रीच्या जीवघेण्या थंडीनंतर खूपच हवंहवंसं वाटलं.

लालजी आकाशाकडे बघत होता तेवढ्यात देशांतर करणाऱ्या रोहित

(ईर्ल्स्हुद) पक्ष्यांचा एक थवा त्यांचे मोठाले पंख पसरून आकर्षक डौलात उडत जाताना त्याला दिसला. त्याचं गाव तर केव्हाच दिसेनासं झालं होतं आणि नंतर दिसल्या होत्या त्या काळ्या टेकड्याही खूप मागे राहिल्या होत्या.

इतरही प्रवासी बैलगाडीत चढत-उतरत होते, त्यामुळे लालजीचं मन गुंतलेलं राहत होतं. एकदा एक म्हातारी आजी, कलकलाट करत असणाऱ्या कोंबडे आणि कोंबड्यांची झाकण लावलेली दुरडी घेऊन आत चढली. आजी त्यांच्यावर मोठ्यानं खूप रागानं ओरडली, तेव्हा कुठे ते गप्प झाले. एकदा एक बराच जाडजूड माणूस एका बकरीला घेऊन वर चढला. त्या बकरीची स्थिती अशी दिसत होती, की कुठल्याही क्षणी तिला पिल्लं होतील! मग आणखी एक खूप खूप म्हातारा माणूस गाडीत चढला, त्याची खूप लांब पांढरी शुभ्र दाढी होती आणि त्याच्या तोंडावर, हातांवर इतक्या सुरकुत्या होत्या, की तितक्या सुरकुत्या लालजीनं कधी कोणाच्या अंगावर बघितल्याच नव्हत्या! तो एक शब्दही न बोलता गाडीत चढला, तंद्री लागून बसल्यासारखा बराच वेळ बसला आणि मग उतरून गेला!

चंदूकाकाच काय ते सबंध वेळ त्याच्याबरोबर होते, आणि त्यांचं तसं असणं खूप धीर देणारं होतं. हळूहळू लालजी गाढ झोपून गेला.

दोन-एक तास झाले असतील, चंदूकाकांनी हलकेच त्याला उठवलं. ''ऊठ बाळ. जरा उतरून पाय मोकळे करू या, काहीतरी खाऊनही घेऊ या.'' त्यांनी लालजीला उचलून जमिनीवर ठेवलं.

दिवस असाच गेला, संध्याकाळ झाली, तशी रात्रीची जीवघेणी गोठून टाकणारी थंडी पुन्हा पडली. लालजी चंदूकाकांजवळ आणखी सरकून, चिकटून बसत होता – थंडीपासून जरा ऊब मिळवायला. त्यामुळे त्याच्या मनातल्या एकटं एकटं वाटण्याचाही जरा विसर पडत होता. खडबडीत रस्त्यावरून जाऊन जाऊन आता बैलही थकले होते. शेवटी एकदाचे सरत्या संध्याकाळच्या संधिप्रकाशात हळूहळू घरांचे आकार दिसू लागले. ''आलं बघ भुज!'' चंदूकाका आनंदानं मोठ्यानं म्हणाले, ''आलं एकदाचं भुज!''

चंदूकाकांच्या एका नातेवाइकाच्या घरी चंदूकाकांबरोबर लालजीही त्या रात्री राहिला. बाजरीची भाकरी, चटणी आणि ताक असं जेवून तो झोपून गेला.


**९वी आवृत्ती**

# शेतकऱ्याचा असूड

मूळ लेखक
महात्मा जोतीराव फुले

संपादन व प्रस्तावना
डॉ. नागनाथ कोत्तापल्ले

किंमत - १२०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.




'शेतकऱ्याचा असूड' हे महात्मा जोतीराव फुले यांनी निर्मिलेले फार सुंदर रूपक आहे. शेतकऱ्याच्या खांद्यावर असणारा हा असूड केवळ शेतकीत साहाय्य करणाऱ्या जनावरांसाठीच वापरला जातो असे त्यांना वाटत नाही. सर्व प्रकारच्या शोषणाविरुद्ध आणि शोषकांविरुद्धही हा असूड वापरला पाहिजे. दुष्टांच्या निर्दालनासाठी आणि सत्याच्या प्रस्थापनेसाठी या असूडाशिवाय दुसरे कोणते समर्थ साधन शेतकऱ्यांच्या हाती आहे?

एवढेच नाही, तर इथल्या सोवळ्याओवळ्याला कंटाळून आणि शेतकऱ्याच्या घरात खाण्यापिण्यास काही उरले नाही म्हणून लक्ष्मी सातासमुद्रापलीकडे तिच्या पित्याच्या घरी गेली. एकदा लक्ष्मी अंतरली की, दु:ख आणि दारिद्र्याशिवाय शेतकऱ्याच्या घरी उरणार तरी काय? तेव्हा तिला परत आपल्या देशात नांदावयास आणावयाचे असेल, तर शेतकऱ्यास सर्व प्रकारच्या विद्या शिकविल्या पाहिजेत. एकदा शेतकरी विद्वान झाला की, तो खांद्यावर असूड टाकून लक्ष्मीला पुढे घालून आपल्या घरी नांदावयास घेऊन आल्याशिवाय राहणार नाही!

हळूहळू भव्य होत जाणारे हे सुंदर रूपक असंख्य अर्थांची प्रतीती देऊन आपणास नवेच भान आणते.



# स्मरण



## कुसुमाग्रज

मराठी कवितेवर आपल्या नावाची सुवर्णमोहोर उमटवणारे कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांचे नाव अग्रक्रमाने तसेच मराठी साहित्यातील सर्वोत्तम नाटककार म्हणून त्यांचे नाव मराठी रंगभूमीवर अक्षरशः दुमदुमत होते. त्यांच्या कथा आणि कादंबऱ्यांनीसुद्धा मराठी वाचकांवर मोहिनी घातली होती. कुसुमाग्रजांनी एकांकिका लिहिल्या. आजपर्यंत मराठीत कुसुमाग्रजांवर अनेकांनी लेखन केले.

१९९९ मध्ये कवी वसंत बापट हे ७२व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते, तेव्हा त्यांच्या निवडक कवितांचा 'शततारका' हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. तो संग्रह वसंत बापट यांनी कुसुमाग्रजांना अर्पण करताना ज्या चार ओळी लिहिल्या होत्या, त्या ओळींमधून बापट यांनी कुसुमाग्रज यांच्याविषयीचे अवघ्या मराठी मनाचे दर्शन घडवले होते.

हे कुसुमाग्रज! तुम्ही रहिवासी गगनाचे
तरी कृतार्थ केली तुम्ही मराठी माती;
या मातीमधल्या अगण्य अणुरेणूंची;
जोडलीत साऱ्या नक्षत्रांशी नाती...

कुसुमाग्रज म्हटले की, 'विशाखा' हा कवितासंग्रह आणि नटसम्राट हे नाटक, कलाकृतींचे स्मरण या झाल्याशिवाय राहत नाही.

मार्च १९४२ मध्ये 'विशाखा' हा कवितासंग्रह  वि. स. खांडेकर यांनी स्वतः प्रकाशित केला. आपल्या प्रस्तावनेत वि. स. खांडेकर यांनी आशीर्वादाच्या मंगलमय भाषेत म्हटले होते की, ''टिळक, तांबे किंवा यशंवत यांच्या काव्यात जीवनातल्या अनुभवांची जेवढी विविध प्रतिबिंबे पडली आहेत, तेवढी या संग्रहात आज आढळणार नाहीत हे खरे; पण ही उणीव स्वभाविकच आहे. अजून कुसुमाग्रज जीवनाच्या उंबरठ्यावरच उभे आहेत. ते जसजसे त्याच्या अंतरंगात प्रवेश करतील, तसतसे त्यांच्या काव्य विषयांचे वैचित्र्य वाढेल. त्यांची प्रतिमा ही लुकलुक करणारी चांदणी नाही; ती चमचम करणारी बिजली आहे. जीवनाच्या आकाशाचा कोपरा न् कोपरा ती उद्या उजळू शकेल. आपली कविता मुरली नाही; ती तलवार आहे, याची योग्य जाणीवही त्यांना आहे. या तलवारीला कल्पकतेच्या सुंदर आणि बळकट मुठीची जोडही सुदैवाने मिळालेली आहे. त्यामुळे अनुभूतीच्या कुठल्याही प्रदेशात त्यांची प्रतिभा रणरागिणीच होईल.

'विशाखा'चे दिवस या लेखात पु. ल. देशपांडे म्हणतात, ''गडकरी, बालकवी आणि केशवसुत या तिन्ही कविश्रेष्ठांच्या संस्काराचे सौष्ठव घेतलेली; परंतु पस्तीस ते पंचेचाळीस या कालखंडातल्या तरुणांच्या मनावरचे नवे संस्कार शोधून फुललेली ही कविता होती. तिची जवळीक तत्कालीन तरुण मनांना अधिक वाटली. कारण ती वाचताना मला कविप्रतिभा असती तर मी हेच आणि असेच मांडले असते. मग सांगण्याची ती ऊर्मी पारतंत्र्याविषयक वाटणाऱ्या संतापाची असो, की प्रेयसीविषयी वाटणाऱ्या ओढीची असो.''

कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांचा कालखंड आहे, २७ फेब्रुवारी १९१२ ते १० मार्च १९९९. त्यांना सत्याऐंशी वर्षांचे प्रदीर्घ आयुष्य लाभले. 'महाराष्ट्र टाइम्स'चे संपादक गोविंद तळवलकर यांनी आपल्या 'जननांतर सुहृद' या लेखात कुसुमाग्रजांविषयी लिहिताना म्हटले,''तात्यासाहेबांच्या भोवती नेहमी गराडा पडलेला असतो; पण सगळ्यांची योग्य व आवश्यक ती विचारपूस होत असते. स्वतःचे व इतरांचे भान असणे, ही मोठ्या व थोड्या लोकांच्या ठिकाणी देणगी असते. तात्यासाहेबांना तशी ती आहे. यामुळे त्यांच्या बैठकीतील कोणालाही असे वाटत नाही की, आपण मागे टाकले गेलो. तात्यासाहेबांचे हे वागणे स्वाभाविक आहे. यांच्याकडे कोणालाही जाता येते; आपले मन मोकळे करता येते. प्रा. शंकर वैद्य यांनी 'प्रवासी पक्षी' हा कुसुमाग्रज यांच्या निवडक कवितांचा संग्रह संपादित केला होता. आपल्या संपादकीयात त्यांनी

कुसुमाग्रजांच्या एकूणच कवितेचे मूल्यमापन करताना म्हटले होते की, कुसुमाग्रजांच्या मनाला जीवनातल्या विविध घटकांतले सौंदर्य बारकाईने जाणवत आलेले आहे. यात निसर्गाचा समावेश आवर्जून करावयास हवा. केवळ फुला-फळांचे, वृक्ष-वेलींचे, नद्या-निर्झरांचे नव्हे, तर विश्वातल्या पंचमहाभूतांतल्या भूमी, अग्नी, पाणी, आकाश अशा प्रत्येक महाभूताच्या चैतन्यदायी विलासाचे त्यांना अनावर आकर्षण आहे, हे त्यांच्या अनेक कवितांमधून प्रत्ययास येते. निसर्गातल्या सुंदर अवस्थांचे आणि सुंदर घटकांचे सुरेख वर्णन त्यांनी केलेच आहे, शिवाय त्या निसर्गाच्या आधारेच त्यांच्या 'स्वप्नांची समाप्ती', 'स्मृती'सारख्या उत्कृष्ट कविता साकार झाल्या आहेत. 'पृथ्वीचे प्रेमगीत'चेही इथे स्मरण व्हावे. असे निसर्ग व सृष्टीतील विविध घटक त्यांच्या कवितांत एकजीव मिसळून गेले आहेत. कुसुमाग्रजांच्या कवितांवर आणि 'नटसम्राट'सारख्या श्रेष्ठ नाटकांवर आजपर्यंत विपुल लेखन प्रसिद्ध झालेले आहे. कुसुमाग्रजांवर रसिक वाचकांनी भरभरून प्रेम केले आहे. असा लोकोत्तर कवी या मराठी मातीत जन्माला आला, हे मराठी भाषेचे परमभाग्य आहे.

मनात विचार येतो की, कुसुमाग्रजांच्या समग्र कवितांचा एक खंड प्रसिद्ध व्हावा. असा एक प्रयत्न २१वर्षांपूर्वी 'विशाखा'; 'अर्घ्यदान' संपादक डॉ. उषा देशमुख यांनी केला होता. अंमळनेरच्या चेतश्री प्रकाशनाने हा ग्रंथ प्रसिद्ध केला होता. १९९४मध्ये त्या ग्रंथात केवळ 'विशाखा'या संग्रहावरचे निवडक लेख/समीक्षा एकत्र केली होती. १९९२ मध्ये 'विशाखा' कवितासंग्रह प्रसिद्ध झाल्याला ५० वर्षे पूर्ण झाली म्हणून हा प्रयोग चेतश्री प्रकाशनाने केला होता. आपल्या संपादकीयात डॉ. उषा देशमुख यांनी आपली भूमिका मांडताना म्हटले होते की, ''विशाखा' ५० वर्षांची झाली, तशी तिची समीक्षाही ५० वर्षांची झाली आहे. समीक्षेचे बदलते प्रवाह आणि वाटा आणि वळणे आमच्या या प्रयत्नांतून रसिकांना आणि जाणकारांना समजू शकतील; त्यासाठी हा प्रयत्न.''

'विशाखा'मधले धकधकते कवितेचे रूप हे स्वातंत्र्यपूर्व कवितेचे महत्त्वाचे स्फूर्तिकेंद्र होते. संपूर्ण २०व्या शतकातल्या एकूण कवितेचा विचार केला तर, 'विशाखा' हा संग्रह सर्वश्रेष्ठ ठरेल, असे वाटते.

वामन देशपांडे
डोंबिवली (पू.)
९३२४६१५०७७

**६वी आवृत्ती**


# धीरुभाईझम

मूळ इंग्रजी लेखक - ए.जी. कृष्णमूर्ती

प्रस्तावना - मुकेश अम्बानी

अनुवाद - सुप्रिया वकील


किंमत - ९०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.




गुजरातमधील छोट्या खेड्यापासून ते ‘रिलायन्स’च्या साम्राज्यापर्यंतचा अतिभव्य विस्तार हा विलक्षण टप्पा सर करणाऱ्या धीरुभाई अम्बानींच्या कार्यकर्तृत्वाची वेगळी ओळख करून द्यायची गरज नाही. फारसं औपचारिक शिक्षण नसलेले धीरुभाई स्वत:च एक चालतंबोलतं विद्यापीठ होते.
त्यांनी स्वत:चं असं एक कार्यविषयक तत्त्वज्ञान व संस्कृती जोपासली होती.
भव्य स्वप्नं, खडतर परिश्रमांची तयारी, निश्चयाचं बळ यांच्या जोडीला त्यांनी काही साधी-सोपी तत्त्वं अनुसरली होती. अशक्य कोटीतल्या वाटणाऱ्या स्वप्नपूर्तीसाठी त्यांनी याच तत्त्वांच्या साथीनं मार्गक्रमण केलं आणि त्यात नेत्रदीपक यशही मिळवलं.
त्यांची हीच तत्त्वं सर्वसामान्यांच्या जीवनातही आशा जागवतील व मार्गदर्शक ठरतील.




## 'पद्मभूषण' विजेते जेष्ठ कवी मंगेश पाडगांवकर अनंतात विलीन



ज्येष्ठ कवी मंगेश पाडगांवकर यांचं निधन झालंय. वयाच्या ८६ व्या वर्षी पाडगावकर यांनी जगाचा निरोप घेतला.

मराठीतला नवकवितांचा बादशाहा काळाच्या पडद्याआड गेल्याची भावना व्यक्त केली जातेय. महाराष्ट्राला प्रेम शिकवणाऱ्या पाडगावकरांनी गेली अनेक वर्षे महाराष्ट्राच्या साहित्य रसिकांच्या मनावर अधिराज्य केलंय. २०१३ साली त्यांना 'पद्मभूषण' या पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं होतं.

मंगेश पाडगांवकर यांचा जन्म १० मार्च १९२९ रोजी महाराष्ट्रात वेंगुर्ला येथे झाला. पुढे त्यांनी मुंबई विद्यापीठातून मराठी व संस्कृत या विषयात पदव्युत्तर शिक्षण प्राप्त व काही काळ येथील रामनारायण रूईया महाविद्यालयात मराठीचं अध्यापनही केलं. 'कविता' या वाङ्मयप्रकारात त्यांनी लक्षणीय कार्य केलंय. १९५० पासून त्यांचे सुमारे ३० काव्यसंग्रह प्रकाशित झालेत. यापैकी प्रत्येक काव्यसंग्रहाच्या सुमारे पाच -पाच आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत.

वयाच्या १४व्या वर्षांपासून गेली सात दशकं मराठी कविता आणि साहित्य समृद्ध करणाऱ्या मंगेश पाडगांवकर यांचा 'धारानृत्य' हा कवितासंग्रह १९५०मध्ये प्रसिद्ध झाला होता. त्यानंतर प्रकाशित झालेले त्यांचे जिप्सी, निंबोणीच्या झाडामागे, छोरी, शर्मिष्ठा, उत्सव, वात्रटिका, मीरा, सलाम, गझल, भटके पक्षी, तुझे गीत गाण्यासाठी, बोलगाणी, चांदोमामा, सुट्टी एके सुट्टी, सूरदास, उदासबोध, त्रिवेणी, कबीर, राधा, गिरकी हे काव्यसंग्रह विशेष लोकप्रिय ठरले. त्यांच्या कवितांमध्ये चिंतनशील कविता, बालकविता, प्रेमकविता, निसर्गकविता असे वैविध्यपूर्ण विषय हाताळलेले आढळतात.

मराठी साहित्यविश्वात कविता हा गाऊन सादर करण्याचा प्रकार असताना पाडगावकर-बापट-करंदीकर या त्रिकुटाने काव्य सादरीकरण हा नवा प्रकार

मराठी विश्वात रूजू केला व जगभर त्याचे यशस्वी प्रयोगही केले. कवितेसह त्यांचे लेखसंग्रहही प्रकाशित झाला. त्यांच्या कर्तृत्वासाठी त्यांना १९८० साली ‘साहित्य अकादमी’ पुरस्काराने तसेच ‘महाराष्ट्र भूषण’ पुरस्काराने गौरविण्यात आलंय.

## शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी



शेतकरी, शेतमजूर यांच्या हक्कांसाठी जन्मभर लढलेले शेतकरी संघटनेचे नेते, माजी खासदार शरद जोशी यांचे १२ डिसेंबर रोजी पुण्यातील राहत्या घरी निधन झाले. ते ८१ वर्षांचे होते.

निधनाचे वृत्त समजताच शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या बोपोडी येथील निवासस्थानी गर्दी केली होती. शेतकऱ्यांशी समरस होण्यासाठी त्यांनी पुणे जिल्ह्यातील आंबेठाण येथे जमीन घेऊन शेती करण्यास सुरुवात केली. शिकलेला आणि परदेशात राहिलेला पांढरपेशा माणूस काय शेती करणार आणि शेतीचे काय प्रश्न सोडविणार? असे सुरुवातीला त्यांच्याविषयी बोलले जात होते. जोशी यांनी १९७९ मध्ये शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढणारी शेतकरी संघटना स्थापन केली. ‘शेतमालाला रास्त भाव’ हा एककलमी कार्यक्रम घेऊन त्यांनी चाकण येथे सर्वप्रथम कांदा उत्पादकांचे आंदोलन उभारले. त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला.

कांदा, ऊस, तंबाखू, दूध, भात, कापूस इत्यादी पिकांसाठी त्यांनी राज्यभरात विविध ठिकाणी आंदोलने केली. त्यासाठी उपोषणे, मेळावे, तुरुंगवास, शिबिरे या मार्गांनी अनेक मागण्या मान्य करून घेतल्या. शेती आणि शेतकरी यांचा अभ्यास असणारे अनेक नेते त्यांनी घडविले. शेतकऱ्यांच्या दुरवस्थेचे वर्णन करणारी ‘इंडिया विरुद्ध भारत’ ही संकल्पना क्रांतिकारी ठरली. विकसित देशांत शेतकऱ्यांना सबसिडी दिली जाते, तर भारतात शेतकऱ्यांना उणे सबसिडी दिली जात असल्याचे त्यांनी दाखवून दिले. केवळ राज्यातच नाही, तर संपूर्ण भारतातील विविध शेतकरी संघटनांना एकत्र करण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

शेतकऱ्यांबरोबरच शेतमजूर, शेतकरी महिला यांच्यासाठीही काम केले. शेतमालावरील सर्व निर्बंध उठविण्याची मागणी त्यांनी लावून धरली होती. आपली ही भूमिका मांडण्यासाठी त्यांनी १९९४ मध्ये स्वतंत्र भारत पक्षाची स्थापना केली होती.




## स्त्रीमुक्ती, स्त्रीवादी यांची वाटचाल मानवमुक्ती, मानवतावाद यांच्यापर्यंत व्हायला हवी - प्रतिभा रानडे

साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे
सुवर्ण महोत्सवी संमेलन अध्यक्षीय भाषण

सर्व प्रथम मी साहित्यप्रेमी भगिनी मंडळाचे आभार मानते. मंडळाला ५० वर्षे पूर्ण झाली, या निमित्ताने भरविल्या गेलेल्या या साहित्य संमेलनाला अध्यक्ष म्हणून मला बोलावलेत त्याबद्दल मनापासून आभार. मला आनंद वाटला आणि तेवढेच आश्चर्यही वाटले, खरं सांगते. आता या निमित्ताने एका मजेदार योगायोगाचा उल्लेख करावासा वाटतोय. मी माझ्या 'स्त्री प्रश्नांची चर्चा १९ वे शतक : महाराष्ट्र' या पुस्तकासाठी तयारी करताना, त्या काळातील वृत्तपत्रे पाहत होते. इंदूप्रकाश, ज्ञानप्रकाश, ज्ञानोदय, दर्पण हे मराठीतले पहिले नियतकालिक आणि पूरक म्हणजे आगरकरांचा सुधारक आणि टिळकांचा केसरी पाहत होते. सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे एक केसरी सोडून इतर वृत्तपत्रांचे काही मोजकेच अंक मला मिळाले; पण केसरीचा पहिल्या अंकापासूनचा संपूर्ण संचच मला मिळाला. कारण त्यामागे 'केसरी' ही मातब्बर संस्था होती; इतरांना तो लाभ नव्हता. म्हणून तुमच्या ५० वर्षांच्या वाढदिवसाचे कौतुक वाटते मला. तर केसरीचे अंक पाहता पाहता सहज मनात आले की आपल्या जन्मदिवशीच्या अंकात २० ऑगस्ट १९३७ काय काय आलेय तेही पाहावे. तर त्या दिवशी इतर राजकीय बातम्या तर होत्याच; पण विशेष म्हणजे त्या वर्षांच्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष दत्तो वामन पोतदार यांच्या अध्यक्षीय भाषणाचा वृत्तान्त! आणि आज तुमच्या या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद तुम्ही मला

दिलेत.

अध्यक्ष आणि एक लेखिका या नात्याने मी तुमचे अगदी मनापासून अभिनंदन करते. एखादी संस्था तीदेखील वाचकांनी चालवलेली पन्नास वर्षे चालू राहते, ही साधी-सोपी गोष्ट नाही. निव्वळ चालूच नाही तर ती वर्धिष्णू आहे. वेळोवेळी तुम्ही साहित्यिक उपक्रम राबवलेत; पण सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्त्रीसाहित्याचा गेल्या दीडशे वर्षांचा मागोवा घेणारे ग्रंथ तयार केले हे अत्यंत महत्त्वाचे काम आहे. केवळ आत्ताच त्याचं महत्त्व नाही, तर पुढच्या पिढ्यांना त्याचा उपयोग होणार आहे. आत्ताच मी म्हटलं तसं मला केसरीचे सगळे अंक मिळाले कारण त्यामागे एक समर्थ संस्था होती. तेवढेच महत्त्वाचे तुमचे काम आहे. अर्थात संपादकांनी म्हटल्याप्रमाणे त्यात काही त्रुटी असतीलही; पण या ग्रंथांच्या पुढील आवृत्त्या निघतील तेव्हा त्या दुरुस्त करता येतील. एक दस्तावेज तयार झाला हे फार मोठे काम तुम्ही केले आहे. खूप कष्ट घेतलेत, पाठपुरावा केलात. स्त्रीसाहित्यबद्दलचा झपाटलेपणा असल्याशिवाय हे झालेच नसते. त्यासाठी काम करणाऱ्या तुम्हा सगळ्यांचेच, विशेषत: मंदा खांडगे यांचे आभार मानते. हे झपाटलेपण असेच राहू दे.

'स्त्रियांना शिकवू नका, शिकल्यातर त्या बिघडतील' या वायफळ समजुतीने, कित्येक शतके स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवले होते. त्यामागचे कारण देताना म्हटले होते की, रुक्मिणीने कृष्णाला पत्र लिहून आपल्या स्वयंवरांच्या आधीच बोलावून घेतले आणि देवीच्या दर्शनाला जाते या निमित्ताने घराबाहेर पडून रुक्मिणी कृष्णाबरोबर पळून गेली होती. तसेच बायका लिहायला शिकल्या तर आपल्या प्रियकराला बोलावून घेतील आणि पळून जातील! जणू काही अशिक्षित स्त्रिया पळून जातच नव्हत्या.

सुशिक्षित नव्हे तर विद्वान स्त्रियांची आपली परंपरा फार प्राचीन आहे. ऋग्वेदामधील काही ऋचा रचणाऱ्या महिला ऋषी होत्या. 'वाग्देवीचे सामर्थ्य, सौंदर्याचे वर्णन करून आम्हाला प्रसन्न हो' अशी प्रार्थना केली आहे; तर काही ऋचा या नाटकीय संवादात्मक आहेत. गार्गी-मैत्रेयीची नावे तर आपण नेहमीच घेतो. त्यानंतरच्या काळात बोद्ध भिक्षुणींनी म्हणजेच अतिशय भेदक अशा गाथा रचल्या होत्या. आपल्या आध्यात्मिक अनुभवांबद्दल तर त्यांनी लिहिलेच, पण त्याहीपेक्षा पुढे जाऊन समाजात, संघातदेखील स्त्री म्हणून आपल्याला किती अपमान, छळ सोसावा लागतो याबद्दलही लिहिले आहे,

जाब विचारला आहे. त्यातील काही गाथा तर आजच्या स्त्रीवादी भूमिकेशी मिळताजुळताच आहेत.

स्त्रियांच्या रचनांची मौखिक परंपरा विसरून कसे चालेल? अत्यंत नेटक्या सुंदर शब्दांत या अनामिक स्त्रियांनी, सासर-माहेर, फुलं, सुख-दुखं, आशा-निराशा, मान-अपमान हे सगळं व्यक्त केलंय. त्यांच्या या रचना लिहिल्या गेल्या नव्हत्या; पण घरकाम करताना, जात्यावर दळण दळताना, लग्नसमारंभ, बारसे अशा प्रसंगी म्हणून त्यांनी आपला हा साहित्यिक ठेवा पिढ्यान्‌पिढ्या जिवंत ठेवला होता. सरोजिनी बाबर आणि आता तारा भवाळकरांनी त्यांना शोधून काढून त्यांचं संकलन करून ठेवलं आहे.

मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई, वेणाबाई, नरदाईसा यासारख्या कित्येक स्त्रियांनीदेखील आपल्या काव्यातून एकतऱ्हेचं बंडच केलं होतं. स्त्री म्हणून ईश्वराजवळ जाणं, मोक्ष मिळवणं यावर बंदीच होती जणू. पण या स्त्रियांनी स्वत:चा ईश्वरभक्तीचा मार्ग निवडला, तो काव्यातून व्यक्त केला. स्त्रियांचे सगळे शारीरिक, मानसिक भोग भोगावे लागले तरी मी मनाने मुक्त आहे; कारण मला विठ्ठलाची साथ आहे. मायबाप, भाऊ, रक्षणकर्ताच नव्हे तर जिवलग सखा म्हणून त्यांनी विठ्ठलाशी नातं जोडलं. त्यांच्या या काव्यरचना एवढ्या जीवघेण्या सुंदर आहेत की त्यांना संतपद दिलं. विठ्ठलाशी असं नातं जोडून त्यांनी संसारतापातून मुक्ती मागितली. आजच्या स्त्रियांनाही तेच हवं आहे. संसारातून मुक्ती नाही तर संसाराच्या तापातून मुक्ती हवी आहे. त्यांचे हे काव्य विलक्षण ताकदीचं आहे. विठाबाई या फारशा माहीत नसलेल्या संत स्त्रीनं नवऱ्याला उद्देशून म्हटलेय - ''तुझी सत्ता आहे देहावरी समज । माझेवरी तुझी किंचित नाही.'' शेकडो वर्षांनंतरच्या आजच्या स्त्रीने तर तिच्या देहावरची सत्तादेखील नाकारली आहे.

या भक्तिमार्गापेक्षा अगदी वेगळ्या मार्गानं १९ व्या शतकातील स्त्रिया जाताना दिसतात. संत कवयित्रींच्या मागे आधार होता तो त्यांचा भाऊ गुरु यांचा. १९ व्या शतकातील स्त्रियांच्या मागे आधारस्तंभ होते समाजसुधारक, काही जणींचे नवरे, वडीलदेखील. स्त्रियांची बंधनातून सुटका करण्यासाठी पुढाकार घेतला तो पुरुष समाजसुधारकांनी. त्यासाठी छळ सोसला, अपरंपार कष्ट घेतले. पण त्याही पुढे जाऊन त्यांनी स्त्रियांना लिहिते केले. ज्ञानोदय, इंदूप्रकाश, ज्ञानप्रकाश, सुधारक सारख्या वृत्तपत्रांतून स्त्रिया पत्रे लिहून आपल्या मनातल्या भावना, विचार व्यक्त करू लागल्या. त्यांची संख्या

थोडीच होती. एखादीचं पत्र पुन्हा आलं नाही तर संपादक त्यांना वृत्तपत्रातूनच पत्रानं विचारायचे, 'ताई तुम्ही गप्प का?' पण ही सगळी पत्रं 'अनामिक' या नावानंच येत. आपली नावं घरच्यांना कळली तर काय काय सोसावं लागेल याची पूर्ण कल्पना त्यांना होती. म्हणूनच आपली खरी नावं न देण्याचा हा खटाटोप. हाच अनुभव मलाही आला होता. १९८५-८६ साली मी 'बुरख्याआडच्या स्त्रिया' हे पुस्तक लिहिण्यासाठी अडीचशे मुस्लिम स्त्रियांच्या मुलाखती घेतल्या होत्या. त्यामध्ये तत्कालीन राज्यसभेच्या अध्यक्षा, काँग्रेसपक्षाच्या नेत्या नजमा हेपतुल्लांपासून ते सहा वर्षांत तीन लग्नं, तीन तलाक आणि दोन मुलं पदरात घेऊन, बापाकडे झोपडपट्टीत राहाणाऱ्या २३ वर्षांच्या मदीना मुल्लांपर्यंतच्या स्त्रिया होत्या. त्यामध्ये एक डॉक्टर, दायी, प्राध्यापिका, एक पणजी येथील ॲडव्होकेट यांनीदेखील 'आमचं नाव देऊ नका' या अटीवरच मुलाखती दिल्या होत्या. ज्यांनी तलाक मुक्ती मोर्चात भाग घेतला होता त्यांनी मात्र आपली नावं दिली होती. नाव न देण्याचं कारण, 'अगर हमारे घरमे पता चल गया तो हमारी खैरियत नही' हे त्यांनी स्पष्टपणानं मला सांगितलं होतं. ज्यांनी नावं दिली त्यांना मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा आधार होता. तसाच आधार १९ व्या शतकातील पत्रं लिहिणाऱ्या स्त्रियांना सुधारकांचा वाटला होता. एका 'अनामिक भगिनी'नं आगरकरांच्या मृत्यूनंतर आपल्या मनातल्या भावना व्यक्त करणारी १८ कडव्यांची कविता 'सुधारक'कडे पाठवून दिली होती. ती प्रसिद्धही झाली होती. त्यात तिनं म्हटलं होतं. ''हा! हा! भ्रमण हृदय माझे, ये अंतरी कालदूत। वत्सा शोके, बघून रडते त्वगुणां आठवून।'' पण हे सगळे अनामिक राहूनच. त्यानंतर अनेक वर्षांनंतर बाळूताई खरे यांनादेखील विभावरी शिरूरकर हे नाव घेऊनच लिहावं लागलं होतं.

१८७३ मध्ये साळूबाई भ्रतार भाऊसाहेब सांगवेकर या बाईनं 'चंद्रप्रभा विरहवर्णन' नावाची रोमँटिक कादंबरी लिहिली होती, हे विशेषच. पण याची जाणीव असल्यामुळेच साळूबाईंनी आपल्या मनोगतात म्हटलं होतं, 'हे पुस्तक तू केलंस असं कोणी म्हणणार नाही. एखाद्या विद्वान गृहस्थानं करून तू निमित्तमात्र पुढे झालीस. कारण एक तर मी स्त्री, दुसरे असे ही पुस्तक करण्यास जी सामग्री पाहिजे ती मुळीच मजजवळ नाही!'' पण या प्रेमकथेच्या कादंबरीनंतर अकरा वर्षांनी ताराबाई शिंदे यांनी 'स्त्रीपुरुष तुलना' हे निव्वळ ३८ पानाचे पुस्तक लिहून खळबळ उडवून दिली होती. ताराबाईंचे 'स्त्री-पुरुष

तुलना’ हे पुस्तक म्हणजे आजच्या स्त्रीवादाचा जाहीरनामाच होता. अत्यंत खडखडीत भाषेत स्त्रियांच्या दयनीय परिस्थितीचा लेखजोखा मांडतानाच, ‘तुम्ही कसले रे देव’ असा प्रश्न करून रामकृष्णालाही खडसावून जाब विचारायला कमी केले नव्हते.

१९ व्या शतकातील लेखिकांच्या लेखनातील हा विरोधाभास २० व्या शतकातदेखील दिसून आलाच. एका बाजूला अत्यंत भपकेदार प्रेमकथांबरोबरच विविध प्रकारचे सशक्त लेखनही होतच राहिले. प्रेमकथा हा आदिम कथाप्रकार लोकांना सर्वाधिक आवडणारा. या प्रकाराला झळाळ दिला तो फडके-खांडेकरांनी! त्यांची भाषा, शैली, कथावस्तूतील पेच, तोंडी लावण्यापुरतं देशप्रेम, स्वातंत्र्याची चळवळ यांची प्रचंड मोहिनी लोकमानसावर पडली. मग त्यांच्याच कित्ता गिरवला जाऊ लागला होता. मग लेखिकाही मागे कशा राहणार? पाठोपाठ आलेल्या महिलांसाठीच्या मासिकांचा त्यांना भक्कम पाठिंबा मिळाला होता. कौटुंबिक नाती, स्त्री-पुरुष संबंध यांच्याभोवतीच त्यांचं लेखन घोटाळत राहिलं होतं. पण त्याच वेळी विभावरी शिरुरकर, वसुंधरा पटवर्धन, कुसुमावती देशपांडे, कमल देसाई, दुर्गाबाई भागवत, इरावती कर्वे, गीता साने सारख्या लेखिकांच्या लेखनानं जगण्याचं खरोखरचं भान आणलं.

यानंतर लेखिकांच्या लेखनाला एक मोठ्ठं वळण मिळाले ते १९७५ साली संयुक्त राष्ट्र संघाने स्त्रीमुक्ती दशक जाहीर केले तेव्हा! भारतानेही त्याचा औपचारिक स्वीकार केला. वस्तुत: प्राचीन काळापासूनच आपल्याकडे स्त्रीमताचा हुंकार व्यक्त होत आलेलाच होता. त्यामुळेच आपल्या घटनेने, कायदा करून स्त्रियांना अनेक हक्क दिले होतेच. पण आता स्त्रीजीवनाच्या अभ्यासाला, त्यांच्या हुंकारांना शास्त्रीय बैठक मिळाली, बळ मिळाले. परंतु त्यातला घोळ असा की स्त्रीमुक्तीच्या भूमिकेचा विचार, पाश्चात्त्य स्त्रियांनी त्यांच्या तिथल्या वास्तवाला, त्यांच्या धर्म, संस्कृती, परंपरा यांना अनुलक्षूनच मांडला होता. तोच आपण उचलला. आपला वास्तवाचा विचार मागे पडला. त्याचा परिणाम म्हणजे स्त्रीसाहित्यामध्ये आक्रस्ताळेपणा आला. स्त्रीस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्याची सांगड घातली गेली, पण त्यामध्ये दुसऱ्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले जातेय याचा विसर पडला. स्त्रीकेंद्री साहित्याला बहर आला. कौटुंबिक नातेसंबंध, स्त्रीपुरुष संबंधांचा धांडोळा घेतला जाऊ लागला. त्याची भाषा, शैली, मांडणी ही उत्तमच. ते लेखन धीट, धाडसी,

म्हणून भरपूर कौतुक झाले. त्याशिवाय बहुतेक स्त्री वाचकांना आपल्याला असे जगायला आवडले पण तसे जगता येत नाही, पण या पुस्तकातील नायिका तसे जगतेय म्हणून तर ज्या स्त्रिया तसलेच जीवन जगत होत्या. त्यांना या प्रकारच्या साहित्यामुळे अधिकृतता मिळाली, अशा सगळ्यानाच असे साहित्य वाचून आनंद वाटला, त्यांच्याकडून कौतुक, प्रतिष्ठा मिळाली. स्त्री-पुरुष नाते, प्रेम ही गोष्ट तर मानवी जीवनाचा पायाच आहे. ते नाते गूढरम्य आहे. त्याचे सादरीकरण देखील तसेच गूढरम्य असेल तर ते सुंदर होते. नाहीतर ते बटबटीतच होते. त्यालाच बोल्ड, धाडसी म्हणून गौरविले गेले. त्याचाच मोह पडला. आणि पाठोपाठ तोच कित्ता अनेकींनी गिरवायला सुरुवात केली. पण त्यांची साहित्यिक गुणवत्ता कमी पडत होती. तरी तो स्त्रीकेंद्री साहित्याचा प्रवाह चालून राहिला.

पण त्याचवेळी स्त्री जीवनाबद्दल अर्थपूर्ण, सशक्त लेखन करणाऱ्या लेखिकाही आहेतच. त्यापैकी बहुतेकींची दखल स्त्री साहित्याच्या चौथ्या खंडात तुम्ही घेतलीच आहे. त्याहीपेक्षा मधूनमधून उल्लेख करावासा वाटतो तो म्हणजे साहित्यप्रेमी मंडळाच्या दिवाळी अंकासाठी तुम्ही स्पर्धा लावून नवोदित लेखिकांना लिहिते केलेत. त्यामध्ये वैविध्यही आहेत. ही गोष्ट स्वागतार्हच आहे.

उत्कृष्ट साहित्याची कसोटी कोणती? मला वाटते साहित्य; मग ते साहित्य कोणत्याही प्रकारचे असो, कथा-कादंबरी काव्यच नव्हे तर अगदी शास्त्रीय विषयावरचे देखील **साहित्य वाचल्यावर वाचक अस्वस्थ झाला पाहिजे.** हा अस्वस्थपणा नकारात्मकतेचाच नाही तर आनंदाने देखील अस्वस्थच व्हायला हवे. **भावनिक संवेदनशीलता आणि त्याच बरोबरीने वैचारिक तारतम्य ही उत्कृष्ट साहित्याची आणखी एक कसोटी असते.** लेखन करणे ही एक तारेवरची कसरत असते. लेखकाला आपल्या विषयाबद्दलचं झपाटलेपण असणं ही पहिली अट. सगळी तयारी करून तो विषय स्वत:मध्ये पूर्णपणे मुरवून घ्यावा लागतो. आणि लिहिताना मात्र स्वत:ला त्यातून बाहेर काढून, वाहवत न जाता, तटस्थ वृत्तीने लिहावे लागते. तेव्हाच ते एकांगी, वाहवत न जाणारे, आक्रस्ताळे होत नाही, उत्तम साहित्याच्या कसोटीला उतरते. हेदेखील सांगते की अगदी कथा, कादंबरी, ललित लेखन जरी असले तरी त्या त्या मुद्द्याबद्दलचे संशोधन असायलाच हवे; तर लेखनाचा पाया मजबूत होतो. मी एक सुचविते, तुम्ही एवढे प्रकल्प

राबवता आहात, तेव्हा लेखनासाठीच्या कार्यशाळा घ्याव्यात. कित्येकींना लिहावेसे वाटते, त्यांच्याजवळ सांगण्यासारखेदेखील खूप असते; पण लेखन कसे करावे हे माहीत नसते.

आज आपल्यासमोर अक्राळविक्राळ अशी आव्हाने उभी आहेत. जागतिकीकरण आणि दहशतवाद आज आपल्यासाठी ओळखीचा झालेलाच आहे. पण त्याचे आजचे स्वरूप भयावह झाले आहे. वाढत्या धर्मवादाने तर आपल्यालाच नाही तर जगाला मगरमिठी घातली आहे. त्याचबरोबर माहिती तंत्रज्ञानाने संपूर्ण जगाची माहिती आपल्या तर्जनीच्या एका नाजूक ठोक्याने आपल्यासमोर येते आहे. त्याने माहिती मिळते, पण त्या माहितीचे विश्लेषण आपल्याला करायला हवे, याचा विसर पडलाय की काय असे वाटते. विविध शास्त्रीय क्षेत्रांतील रोजच्या नव्या आविष्कारांनी आपल्या जीवनावर, विशेषत: स्त्रीजीवनावर फार मोठे परिणाम होत आहेत. विशेषत: जेनेटिक सायन्स या शाखेतील 'क्लोनिंग'पासून ते आज हार्ट ट्रान्सप्लांटसारखे स्त्रियांची गर्भाशयेदेखील ट्रान्सप्लांट करण्यापर्यंत मजल गाठली आहे. अर्थात त्याचा फायदा अनेक बायकांना होणार आहेच. पण त्याच वेळी हेदेखील लक्षात घ्यायला हवे की आजची जीवघेणी स्पर्धा आणि वाढता भोगवाद, भौतिक सुखासाठी शोषण स्वीकारावे लागणे, या सगळ्यांचा परिणाम म्हणून आजच्या अनेक तरुणींना मातृत्वच नकोसे झालेय. एवढेच नाही, तर लग्न, संसारही नकोसा झालाय. या सगळ्या वेगाने बदलत जाणाऱ्या वातावरणाची प्रगल्भ जाणीव कितपत आहे आपल्याला?

अशा कित्येक मानवनिर्मित आणि निसर्गनिर्मित आव्हानांनी, समस्यांनी मानवी जीवनाला विळखा घातला आहे. त्यामुळे जगण्याची निरर्थकता वाटू लागली. तुटलेपणाची भावना बळावली. या भावनेत वाहत जाणारे मुख्यत्वे पुरुषच दिसतात. स्त्रियांना ही निरर्थकता, तुटलेपणा हा जाणवतच नसेल का? पण त्या त्याला बळी जात नाहीत. दुष्काळाने हतबल झालेले शेतकरीच आत्महत्या करताना दिसतात. शेतकऱ्यांच्या बायकोने आत्महत्या केल्याचे उदाहरण क्वचितच दिसते. नवरा गेल्यावर मुलांचा गाडा हाकणारी बाईच आहे. एका अनामिकेच्या स्त्रीगीतात, वैकुंठाला निघालेल्या तुकारामाचे अतिशय हृद्य वर्णन करून अखेरीस म्हटले आहे–

तुका निघाले वैकुंठी, वस्त्रे ठेविली भिंतीवरी ।
जिजा निघाली माघारी, सोताच्या हिमतीवरी ।

वैकुंठाला जाण्यापेक्षा तिला तिला आपल्या सांसारिक जबाबदाऱ्या पार पाडण्याचे कर्तव्य बजावयाचे होते. शेतकऱ्यांच्या बायकांची हिंमत, जिजाची हिंमत बाळगून, केविलवाणं किंवा आक्रस्ताळं न होता लेखिकांनी लेखन करावे असे वाटते.

एकूणच भरपूर प्रमाणात लेखन होऊ लागलेय ही आनंदाची गोष्ट आहे. त्या दिशेने लेखन करणाऱ्या लेखिकांची संख्या वाढत आहे, ही चांगली गोष्ट आहे. कौटुंबिक नाते, स्त्री-पुरुष संबंध याहीपलीकडे खूप विशाल जग आहे आणि ते प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे स्त्री-जीवनाशी जोडले गेले आहे. **स्त्रीमुक्ती, स्त्रीवादाकडे होणारी वाटचाल मानवमुक्ती, मानवतावादापर्यंत पोहोचायला हवी. मानव म्हटले की त्यामध्ये स्त्रिया आहेतच.**

त्या दिशेनं लेखन करणाऱ्या स्त्रिया, थोड्या प्रमाणात का होईना पण आहेतच, ही फार समाधानाची गोष्ट वाटते. मला लेखक म्हणून, वाचक म्हणूनही जेव्हा असं काही भोवताली घडताना दिसतं तेव्हा वाटतं की माझं आयुष्य समृद्ध झालंय. मी नेहमी सांगत असते तेच आत्ताही सांगते- तीन अतिमहत्त्वाच्या घटना घडल्या आहेत माझ्या आयुष्यात. सरहद्द गांधी म्हणून ओळखले जाणारे खान अब्दुल गफारखान काबुलात माझ्या घरी आले होते. अर्धा-पाऊण तास चर्चा केली तेव्हा त्यांच्या मनातील खंत मोकळेपणाने मला सांगून, हे असंच लिहा तुम्ही, असं ते मला म्हणाले होते तो प्रसंग. त्यानंतर दुर्गाबाई भागवतांचा सहवास आणि त्यांचं प्रेम मला मिळालं. आणि १८५७चं स्वातंत्र्ययुद्ध सुरू होण्याआधी दोन महिने राणी लक्ष्मीबाईने शेजारच्या बाणपूरच्या राजाला पत्र लिहून 'विदेसियों का राज नही चाहिए' असं म्हणून आपण त्यासाठी तयारीला लागू या असे कळवले होते, ती पत्रे बाणपूरच्या राजाच्या वंशजाकडून मला प्रथमच मराठीत आणता आली होती. या अशा प्रसंगांनी फक्त लेखिका म्हणूनच नव्हे तर माणूस म्हणूनही मी श्रीमंत झाले. तुम्हा सगळ्यांनाच अशी श्रीमंती लाभो अशी इच्छा, प्रार्थना करून थांबते.

**(संपादित)**




# गोष्टी पानोपानी

## भोपळ्याचा वेल

राजा धर्मसेन खूप चांगला होता. तो प्रजेची खूप काळजी घ्यायचा. त्यामुळे त्याचं राज्य समृद्ध बनलं होतं.

तो बऱ्याचदा वेष पालटून राज्यात फिरायचा. त्या वेळी त्याला प्रजेचं जीवन जवळून पाहायला मिळायचं. त्यांच्या बोलण्याचा उपयोग त्याला राज्यकारभार करताना व्हायचा.

एके दिवशी तो असाच किल्ल्यातून बाहेर पडला. तो घोड्यावरून खूप लांब गेला. जवळ जवळ त्याच्या राज्याच्या सीमेपर्यंत.

रात्र झाली. अंधार पडला. त्याला एक झोपडी दिसली. तो थांबला. आतून एक माणूस बाहेर आला. तो गरीब लाकूडतोड्या होता. त्याच्याबरोबर त्याची छोटी मुलगी होती. तिचं नाव होतं आशा. राजानं त्याला रात्रीपुरता आसरा मागितला.

लाकूडतोड्यानं राजाला ओळखलं नाही. तो गरीब असला तरी स्वभावानं चांगला होता. त्यानं राजाला आसरा दिला. जेवू घातलं. जेवताना त्यानं राजाला विचारलं, ‘‘तुम्ही मोठ्या घरातले दिसता?’’

‘‘नाही. मी राजाच्या सैन्यात आहे.’’

‘‘बरं झालं. देवाची कृपा. मी जंगलात लाकूड तोडताना तिथल्या सैनिकांचं बोलणं ऐकलं. शेजारचा राजा सैन्याची जमवाजमव करतोय. आपल्यावर स्वारी करणार आहे.’’



"अस्सं? बरं झालं तू सांगितलंस. मी महाराजांना सांगतो," राजा म्हणाला.

थोड्या वेळानं सगळे झोपी गेले.

सकाळी उठल्यावर राजानं अंगणात पाहिलं. शेतकऱ्याच्या मुलीनं भोपळ्याचा वेल लावला होता. त्याची एक फांदी ती माठात घालत होती.

"हे काय आशा?" राजानं विचारलं.

"ही माझी गंमत आहे. वाढलेला लाल भोपळा माठात घालता येणार नाही. पण आत्ताच त्याची फांदी आत घातली तर तो भोपळा माठाच्या आत वाढेल, मोठा होईल."

राजाला तिच्या गमतीचं आश्चर्य वाटलं. त्याला हसू आलं, पण मग तो गंभीर झाला. कशामुळे?...

तो निघाला. त्याआधी त्यानं आशाला घोड्यावरून चक्कर मारली. त्या शेतकऱ्याचे आभार मानले. त्याला सुवर्णमुद्रा दिल्या. शेतकरी आनंदला. परत जाताना राजा काहीतरी विचार करत होता.

नंतर आठवडाभर तो रोज वेष पालटून त्याच्या मोठ्या किल्ल्यात फिरत होता.

मग एके दिवशी ...

दरबार भरला होता. राजानं अचानक हुकूम सोडला, "सेनापती, सरदार इंद्रजित आणि सरदार विरुपाक्ष यांना कैद करा."

दरबारात खूप गडबड उडाली.

मग महाराज म्हणाले, "शेजारचा राजा आपल्यावर स्वारी करणार आहे. त्याचा समाचार आपण घेऊच. पण आपले हे सरदार!... हल्ल्याच्या वेळी त्याला व त्याच्या सैन्याला किल्ल्याचं दार उघडून आत घेणार होते."

दोन्ही सरदार शेजारच्या राजाला फितूर झालेले होते. धर्मसेनाच्या सावधतेमुळे त्याला ही गोष्ट कळली होती. त्या सरदारांना त्यांची चूक कळली. त्यांनी महाराजांच्या पायावर लोळण घेतली.

महाराज म्हणाले, ‘‘ही फंदफितुरी आत्ता रोखली नाही, तर पुढे त्याचे गंभीर परिणाम होतील. माठाच्या आत वाढलेला भोपळा घालता येणार नाही. पण माठाच्या आत भोपळ्याची फांदी घालून ठेवली तर? तर त्या फांदीला आलेला भोपळा माठाच्या आत वाढू शकेल.’’



दरबाऱ्यांना हे बोलणं कळलं नाही. मग महाराजांनी समजावून सांगितलं.

‘‘त्या भोपळ्यासारखंच, आपल्या बळकट किल्ल्यात शत्रू शिरू शकणार नाही. आपल्या किल्ल्याला खिंडार पाडू शकणार नाही. पण त्याच्या शिरण्याची व्यवस्था आतमध्ये, आधीच करून ठेवली तर? तर किल्ला भेदणं शक्य आहे. शेजारच्या राजानं तेच केलं. त्यानं या दोघांना फितवलं. हा फितुरीच्या भोपळ्याचा वेल वेळीच उपटला पाहिजे.’’

महाराजांनी त्या सरदारांची गय केली नाही. त्यांना तुरुंगात टाकण्याची आज्ञा केली.

दरबाऱ्यांनी महाराजांचा जयजयकार केला. राजाला मात्र आशाची आठवण आली. तिच्या छोट्याशा गमतीदार कृतीनं राज्यावरचं मोठं संकट टळलं होतं.


THE POCKET PSYCHOLOGIST
THE POCKET PSYCHOLOGIST
A HAPPY MARRIAGE
THE POCKET PSYCHOLOGIST
A POSITIVE RETIREMENT
THE POCKET PSYCHOLOGIST
ACHIEVE YOUR GOALS
THE POCKET PSYCHOLOGIST
BE HAPPY
THE POCKET PSYCHOLOGIST
CONFIDENCE
THE POCKET PSYCHOLOGIST
GET MOTIVATED
Available Only in a Set of 8 Books
₹ 720 /-
THE POCKET PSYCHOLOGIST
GET OVER A BREAK UP!
THE POCKET PSYCHOLOGIST
POSITIVE PREGNANCY
THE POCKET PSYCHOLOGIST
BOOK YOURSELF IN FOR A SESSION

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PCW/086/2015-2017/ Posted at Marketyard Pso, Pune
Publishing Date : 11 January, 2015. Posting Date : 11 January, 2015.

# आमची नवीन पुस्तके



















BOOK POST
Printed Matter

**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति, ______________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.